बीज अंकुरे अंकुरे

लेखक : विजयकुमार मोरे

विश्लेषा प्रिंटर्स अँड पब्लिशर्स, कान्हे, ता. मावळ, जि. पुणे

बीज अंकुरे अंकुरे

लेखक : विजयकुमार मोरे
आय,४४, इलाईट ग्रीन एकर्स, महिंद्रा कंपनीसमोर, जांभूळ,
ता. मावळ, जि. पुणे ४१२१०६, संपर्क: ७९७२८१६१८०

प्रकाशक

विजयकुमार रामचंद्र मोरे
आय,४४, इलाईट ग्रीन एकर्स, महिंद्रा कंपनीसमोर, जांभूळ,
ता. मावळ, जि. पुणे ४१२१०६, संपर्क: ७९७२८१६१८०

मुद्रक

विश्लेषा प्रिंटर्स अँड पब्लिशर्स
गट नं. ४४५, शनि मंदिराजवळ, टाकवे रोड, कान्हे,
ता. मावळ, जि. पुणे ४१२१०६

टाइप सेटींग

सक्षम ग्राफिक्स, कान्हे, ता. मावळ, जि. पुणे

मुखपृष्ठ

अविष्कार तिप्पेहळीकर

किंमत ३५० रु.

मा. श्री कैलाश परशराम मोते

संचालक : फलोत्पादन,कृषि आयुक्तालय

महाराष्ट्र राज्य, पुणे - ५

प्रस्तावना

सामाजिक भान ठेवून काम करणारा

राज्याच्या प्रशासकीय सेवेमध्ये काम करीत असताना अनेक सहकारी अधिकारी, कर्मचारी आणि जनतेमधील वेगवेगळ्या समाज घटकातील लोकांचा संपर्क येत असतो. त्या प्रत्येकांची ओळख कायम राहणे अवघड असते. परंतु त्यापैकी काही असे असतात की काम करण्याच्या आपल्या वैशिष्ट्यपुर्ण शैलीमुळे कायम स्मरणात रहात असतात. महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील असे एक अधिकारी म्हणजे कृषि खात्यात फलोत्पादन संचालक पदावर कार्यरत असलेले कैलाश परशराम मोते हे होत. मी जेव्हा बीड जिल्हा परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी असताना याच जिल्हा परिषदेच्या अंतर्गत जिल्हा कृषि अधिकारी या पदावर कैलाश परशराम मोते कार्यरत होते. बगळ्यांच्या थव्यांमध्ये हंस जसा चटकन लक्षात येतो तसे श्री मोते यांची कार्यशैली चटकन नजरेत भरणारी होती. आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून आणि सामाजिक भान ठेवून काम करणारा अधिकारी असल्यामुळे कामातील वेगळेपण आणि कामाची गती त्वरीत दिसून येत होती.

बीड जिल्ह्यात आम्ही काम करीत असताना एक चांगली टीम तयार झाली होती. त्यामुळे जिल्ह्यातील विकास कामे वेगाने मार्गी लागत होती. प्रशासकीय अधिकारी, जिल्ह्यातील शासकीय यंत्रणा आणि लोक प्रतिनिधी जर ध्येयाने प्रेरित होऊन

एकाच दिशेने काम करीत असतील तर निश्चितच विकास कामांना गती प्राप्त होते. त्यावेळचे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रशासनाला विश्वासात घेऊन काम करीत असल्याने अधिकारीदेखील जोमाने करीत होते. त्यातूनच काहीसे ऋणानुबंध तयार झाले होते. त्यापैकी एक कैलाश मोते यांच्यावर जिल्हा परिषद अध्यक्षांचा विशेष लोभ होता. कुठल्याही राजकीय दबावाला बळी न पडता काम करणारा अधिकारी म्हणून श्री मोते यांनी आपली प्रतिमा तयार केली असल्यामुळे राजकीय नेतेमंडळीदेखील त्यांच्याशी सौजन्याने वागत असत. श्री मोते यांनी आपला कार्यकाल पुर्ण केल्यानंतर नियमानुसार त्यांची बदली झाली होती. परंतु तात्कालिन जिल्हा परिषद अध्यक्षांनी त्यांची बदली रद्द करुन आणली होती. सांगण्याचे तात्पर्य असे की लोकाभिमुख होऊन काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर लोकही तितकेच प्रेम करीत असतात.

बीड जिल्हा कृषि विकास अधिकारी पदाबरोबरच बी बियाणे आणि खते परवाना अधिकारी म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी होती. त्यावेळी जिल्ह्यात बोगस बियाणे वितरीत करणाऱ्या आणि राजकीय लागेबांधक असलेल्या वितरकांवर त्यांनी कठोर कारवाई केली होती.   त्यानंतर जिल्हाभरात त्यांच्याबद्दल कौतुकाने बोलले जात होते. सहाजिकच असा लोकप्रिय अधिकारी आपल्याकडे असावा असे मलाही वाटत होते. त्यामुळे आमचा संपर्क कायम राहिला. श्री मोते यांनी बीड जिल्ह्यातील पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासकीय योजनांचा लाभ मिळवून देत वेगळे काम केले होते. सामाजिक बांधिलकीचे भान असलेला अधिकारीच अशा प्रकारे स्वतः पुढाकार घेऊन काम करीत असतो. अनेक पारधी कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देऊन जमिनी दिल्या होत्या.तसेच शेतीसाठी लागणारी अवजारे, पाण्यासाठी विहीरी,

पाईपलाईन यासारख्या सुविधा उपलब्ध करुन देऊन त्यांना सन्मानाने जगण्याचा मार्ग उपलब्ध करुन दिला होता. त्यांच्या या कार्याचे सर्व वरिष्ठांनी कौतुक केले होते.

पुढे मी जेव्हा नाशिक येथे आदिवासी विकास आयुक्त म्हणून आलो त्यावेळी श्री कैलाश मोते हेदेखील योगायोगाने जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी म्हणून नाशिक येथेच कार्यरत होते. त्यांच्या कामाची पध्दत मला माहित असल्याने मी त्यांना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी म्हणून रुजू होण्यास सांगितले. बदलीतील तांत्रिक अडथळे दूर करुन दिल्यानंतर ते प्रकल्प अधिकारी म्हणून रुजू झाले. या ठिकाणी देखील त्यानी स्वतःला झोकून देऊन काम केले. श्री मोते यांच्या कार्यशैलीबद्दल थोडेसे विस्ताराने सांगायचे झाल्यास ते केवळ सांगकाम्या अधिकारी नसून स्वतःचे शहाणपण वापरुन काम करणारा अधिकारी आहे. एकादी जबाबदारी त्यांच्यावर सोपविली की नियोजनापासून ते अंमलबजावणीपर्यंत प्रत्येकवेळी वेगळ्या नाविन्यासह काम पुर्णत्वास नेण्याची खात्री असायची. तक्रारींचा पाढा वाचत रडत बसणारा अधिकारी नव्हे! नाशिक येथे प्रकल्प अधिकारी म्हणून त्यांनी केंलेले काम निश्चितच वाखाणण्यासारखे आहे. अशा ठिकाणी काम करणारा अधिकारी ध्येयाने प्रेरित झालेलाच असला पाहिजे. तर आणि तरच खऱ्या अर्थाने आदिवासी समाजाचा विकास होऊ शकतो. श्री मोते यांनी केलेल्या कामाची दखल राज्य शासनाने घेतली तात्कालिन आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावीत यांनी शाबासकीची थाप त्यांच्या पाठीवर मारत अशाच प्रकारचे आदिवासी विभागाचे कार्य प्रत्येक जिल्ह्यात झाले पाहिजे अशा सुचना विभागाच्या अधिकाऱ्याना केल्या होत्या. त्याप्रमाणे कार्यवाहीदेखील झाली. अशा प्रकारे श्री मोते यांनी जेथे जेथे अधिकारी म्हणून सेवा केली त्या त्या ठिकाणी त्यांनी आपले

सर्वस्व पणाला लावून काम केले. केवळ शासकीय कर्तव्य पार पाडायचे म्हणून त्यानी कधीच नोकरी केली नाही तर सामाजिक जाणिव ठेवून लोकांचे भले व्हावे यासाठी काम केले आहे. एक प्रामाणिक आणि शिस्तबध्द रितीने काम करणारा अधिकारी म्हणून त्यांनी सेवा बजावली आहे.

प्रकरण १ ले

सुरुवातीचे दिवस

महाराष्ट्रातील नंदूरबार जिल्हा तसा आदिवासी बहूल जिल्हा म्हणून ओळखला जातो. नंदूरबार हा जिल्हा राज्यातील पहिल्या क्रमांकाचा लोकसभा मतदारसंघ असला तरी म्हणावा तसा विकास अजूनही या भागाचा झालेला नाही. परंतु म्हणतात ना गरज ही शोधाची जननी आहे. त्याप्रमाणे या भागातील आदिवासी मुलांनी जेव्हा गरिबीचे चटके सोसणारे आपले आईवडील बघितले आणि स्वत:देखील त्याच मार्गाने जात आहोत याची जाणीव झाल्यानंतर मात्र त्यांनी स्वत:चे मार्ग स्वत: शोधायला सुरुवात केली. शाळेचा रस्ता स्वत: शोधायला सुरुवात केली. शिक्षण घेऊन आदिवासी समाजातील मुलेही मोठे शासकीय अधिकारी होऊ शकतात याचा प्रत्यय आल्यानंतर कित्येकांची पावले आता तिकडे वळली. या भागात आदिवासी म्हणून भटक्यांचे जीवन जगणारी मुले शिकून शासनात प्रशासन चालवायला लागली तेव्हा कुठे त्यांच्यामध्ये आत्मविश्वास तयार झाला.

साधारणपणे ऐंशीच्या दशकात पहिली फळी वैचारिक मैदानात उतरली. भारतीय संविधानाने आपल्यालाही शिकण्याचा अधिकार दिला आहे. आपल्या शिक्षणासाठी अनेक सोयी सुविधा करुन ठेवल्या आहेत. याची जाणिव झाल्यावर या भागातील आदिवासी समाजातील मुले शाळेत शिकू लागली आणि त्यांच्या खडतर आयुष्याचा मार्ग खुला व्हायला लागला.

त्याच पहिल्या फळीतील जी मुले सुपर क्लासवन या अधिकारी पदापर्यंत पोहचली त्या पहिल्या फळीतील एक प्रशासकीय अधिकारी म्हणजे. डॉ. कैलाश परशराम होत.

डॉ. कैलाश परशराम मोते हे सद्या महाराष्ट्र शासनाच्या कृषि आयुक्तालयात फलोत्पादन संचालक म्हणून कार्यरत आहेत. अवघा महाराष्ट्र फळा फुलांनी टवटवीत करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. अतिशय गरीब परिस्थितीतून शिक्षण घेऊन त्यांनी इथंपर्यंतचा पल्ला गाठला आहे. ज्या गावात साधा कारकून होण्याची कोणाची महत्वकांक्षा नव्हती. शाळा उच्च शिक्षण म्हणजें काय असते? ते कशासाठी घेतात? याची पुसटशीही कल्पना नसलेल्या एका आदिवासी भागातील डोंगराळ व वनक्षेत्र असलेल्या खेड्यात त्यांचा जन्म झाला. स्वत:चा मार्ग स्वत: तयार केला. ते अशा समाजात जन्माला आले की त्यांच्या पिढ्यांपिढ्या अज्ञानाच्या अंध:कारात चाचपडत राहिल्या. जंगलात राहून शेती करणे, जंगलातल्या रानसंपतीवर आपली आर्थिक गुजराण करणे, पारंपारिक पध्दतीने गाई, म्हैशी, शेळ्या बकऱ्या राखणे या सारखे जगण्यासाठी उद्‌योग करायचे आणि चरितार्थ चालवायचा असे या समाजाचे जगणे होते.

खरे तर स्वप्न पहाण्यासाठी देखील काहीतरी डोळ्यासमोर आदर्श असावं लागतं. परंतु जिथं जंगल, रान आणि जनावरं यांच्यापेक्षा काही वेगळं नव्हतंच अशा ठिकाणी मुलांच्या डोळ्यात स्वप्नं तरी कशी तयार होणार? चुकून कोणी या भागातील लहान मुलाला प्रश्न विचारला की पुढे मोठा झाल्यावर तू कोण होणार? .. तर ते पोरगं कलेक्टर होणार किंवा मंत्री किंवा आमदार होणार असं कधीच म्हणायचं नाही. एक तर भरपूर जनावरे असणारा शेतकरी व्हायचं स्वप्न पहायचं किंवा एकाद्या मोठ्या शेतकऱ्याचा नोकर होण्याचं स्वप्न पहायचं. कारण या पलिकडची दुनियाच या आदिवासी भागातील लहान मुलांनी पाहिली नव्हती. कित्येक मुलांनी आख्ख्या आयुष्यात तालुक्याचे किंवा जिल्ह्याचे ठिकाणदेखील कधी पाहिले नव्हते की पायात चप्पल घातली नव्हती. अशा परिस्थितीत मुले जगाबरोबर

चालण्यासाठी कशी तयार होणार?

आजही स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही परिस्थितीत फारसा फरक पडला आहे अशातला भाग नाही. जे शिकले त्यांची पुढची पिढी सुधारली परंतु बाकीचे असंख्य त्याच अंधारात चाचपडत आहेत. अशा अंधारात चाचपडणाऱ्या आदिवासी मुलांना दीपस्तंभासारखी प्रेरणा देणारी काही बोटावर मोजता येणारी व्यक्तिमत्वे आज आदिवासी समाजात आहेत. त्यांच्याकडे बघत बघत आजची नवी पिढी पुढे मार्गक्रमण करीत आहे. त्या दीपस्तंभाच्या यादीत डॉ. कैलाश परशराम मोते यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. कारण श्री मोते यांनी नंदूरबारसारख्या आदिवासी बहूल जिल्ह्यातील शहादा तालुक्यात असणाऱ्या वडगावसारख्या गावात जन्म घेऊन स्वत:च्या मेहनतीवर आणि जिद्दीवर स्वत:चा मार्ग स्वत: तयार केला. या वडगावला जाण्यासाठी अनेक रस्ते होते. परंतु गावाबाहेर जाण्यासाठी अचूक मार्ग नव्हता. आता रस्ते आणि मार्ग यातील फरक लक्षात आला असेल. रस्ते म्हणजे कुठेही जाण्यासाठी जी अमर्यात वाट असते तो रस्ता आणि जो रस्ता एकाद्या उदिष्टार्यंत पोहचवतो तो मार्ग! कैलाश मोते यांनी स्वत:चा मार्ग स्वत: तयार केला.

सर्वांना माहित आहे की स्वत:चा मार्ग स्वत: तयार करणारांना अनेक प्रकारचे कष्ट करावे लागतात. रस्त्यातील काटे कुटे बाजूला सारुन मार्ग तयार करावा लागतो. प्रसंगी ऊन, वारा आणि पावसाचा सामना करावा लागतो. तेव्हा कुठे मार्ग तयार होतो. एकदा का मार्ग तयार झाला की मग इतरांनाही त्या मार्गावरुन बिनधास्तपणे चालता येते. परंतु जो आधी मार्ग तयार करतो त्याला त्रास तर सहन करावा लागतोच.

जेव्हा डॉ. कैलाश मोते यांचा जीवन प्रवास सुरु झाला त्यावेळी नंदूरबार हा वेगळा जिल्हा नव्हता. धुळे जिल्ह्यातच शहादा तालुका होता आणि या तालुक्यात वडगाव नावाचे जंगलातील एक खेडे होते. भारताला स्वातंत्र्य मिळाले तरी अनेक आदिवासी खेडी स्वातंत्र्यानंतरच्या अनेक दशकांनंतरही विकासापासून मैलो दूर होती. त्यामुळे या भागातील तरुण आणि वयस्कर

लोकांना रानातील शेतीत पिकवायचं आणि खायचं एवढंच माहित होते. अशा वडगावात शंभर सव्वाशे वर्षापूर्वी खंडू बिजला मोते नावाचा एक आदिवासी शेतकरी रहायचा. त्याने पूर्वीच्या काळातील इयत्ता सातवीपर्यंत शिक्षण घेतले होते. परंतु सज्जनांच्या सहवासात काही काळ घालविल्यामुळे लिहिता वाचता येत असल्यामुळे जगाचे व्यवहारज्ञान त्यांच्याकडे भरपूर होते. त्या अक्षर ओळखीचा उपयोग ते केवळ पंचाग बघण्यासाठी, चांगल्या कामासाठी मुहूर्त शोधण्यासाठी करायचे. कारण आसपासचा समाज अंधश्रध्देच्या गर्तेत इतका रुतला होता की प्रत्येक गोष्टीसाठी त्याला पंचागाची गरज लागायची.

खंडूजी बाबा पंचांग सांगत असल्यामुळे केवळ वडगावातीलच नव्हे तर आसपासच्या खेडेगावातील लोकदेखील मुहूर्त पाहण्यासाठी किंवा भविष्य बघण्यासाठी खंडूजी बाबा यांच्या घरासमोर यायची. खंडूबाबांचे घर म्हणजे काय चिरेबंदी वाडा नव्हता. इतर आदिवासींच्या घराप्रमाणेच मोठे कुडाचे घर ! घरावर मंगलोरी कौले आणि खालची जमीन शेणाने स्वच्छ सारवलेली असायची. अवघ्या वडगावातील सर्वांची घरे याच धाटणीची होती. परंतु खंडू बाबांचं घर जरासे मोठे होते. कारण कुटुंबाचा पसारा मोठा होता. चार मुले, त्यांच्या बायका आणि मुले असा मोठा कुटुंबाचा पसारा होता आणि हे सारे जण एकाच घरात रहात होते. जेवण बनवताना अगदी मोठ्या आकाराची मातीची भांडी वापरली जायची. जेवायला पंगत बसली तर आख्खा रस्ता आडला जायचा. रात्री चांदण्यात रस्त्यावर आख्खे कुटुंब झोपले तर संपुर्ण रस्ता अडवला जायचा. असे हे खंडूजी बाबा मोते यांचे कुटूंब होते.

त्या काळी प्रत्येक कुटुंबात गरीबीचा कहर असायचा. परंतु लेकराबाळांची कमतरता नसायची. कारण जेवढे कमवते हात जास्त तेवढे उत्पन्न जास्त. असा विचार त्यावेळी केला जायचा. त्यामुळे अनेक कुटुंबामध्ये डझनाने मुले असायची. त्याचा कुटुंबाला राबण्यासाठी उपयोग होत असे. खंडू बाबा यांना चार मुले आणि सात मुली होत्या. सर्वांत मोठा परशराम, दुसरा मदन, तिसरा अंबालाल तर चौथा छगन. त्यानंतर सात मुली होत्या.

या सातही जणी आपापल्या घरी सुखी होत्या. परंतु त्यातील एक मुलगी द्रोपदीबाई भोसले हिचे वैशिष्ट्य असे की ती त्याकाळीदेखील एम.ए. झाली होती. ज्याकाळात मुलांच्याच शिक्षणाबाबत जागरुकता आली नव्हती तर मुलींच्या शिक्षणाचं काय घेऊन बसलात? परंतु खंडूजी बाबा यांना लिहिता वाचता येत असल्याने त्यांनी काहीतरी पुस्तके वाचली असावीत. त्यामुळे त्यांच्या विचारातही प्रगल्भता होती. त्यांनी आपल्या मुलीला शिक्षणासाठी मध्य प्रदेशात पाठविले होते. तेवढाच काय तो शिक्षणाचा वेल त्यांच्या मोते कुटुंबातून बाहेर गेला होता.

आपल्या मुलांना नाही शिकविता आले तरी आपल्या नातवंडानी तरी शिकावे असे खंडू बाबांना मनापासून वाटायचे. परंतु घराचा पसारा इतका वाढला होता की शेतीत जितके म्हणून उत्पादन घेतले जायचे तितके ते कमीच पडायचे. त्यामुळे कामासाठी जितके हात जास्त असतील तितके कुटुंबासाठी हवे असायचे. पोटाची खळगी भरण्यासाठी कष्ट कष्ट आणि कष्टच सतत असायचे. दिवसभर कष्ट उपसल्यानंतर संध्याकाळी थकून भागून घरी आलेली मंडळी मनसोक्त मोहाची कडक दारु ढोसायचे आणि ताटात पडेल ते खाऊन निर्धास्तपणे झोपी जायचे.

वडगाव मधील कोळ पांढरी हा पाडा तसा १५० ते २०० कुडाची घरं असलेलं गाव होतं. दर आठ घरामागं एक दारुचं दुकान होतं. कारण कष्ट करणाऱ्या प्रत्येकाला मोहाची दारु म्हणजे टॉनिकच वाटायचे. परंतु खंडूजी बाबा यांना मात्र कुठलंही व्यसन नव्हतं. आपल्या मुलांनाही त्यांनी त्यापासनं दूर ठेवलं होतं. सहाजिकच त्यांची पुढची पिढी निर्व्यसनी निपजली. परंतु कष्टाचा फेरा मात्र कुणाला चुकला नाही. अगदी पाच वर्षाच्या पोरालाही कष्टाची सवय होती. गाई, म्हैशी चारायला घेऊन जंगलात जाणे, त्यांना पाणी पाजायला नेणे , साफसफाई करणे अशी कामे मुलांनाही करावी लागायची. गुरांचा मोठा राबता असल्याने मुलांना शाळेत पाठवायच्या ऐवजी त्यांच्याकडून अशी कामे करुन घेण्यातच कुटुंबाला अधिक रुची असायची. परंतु खंडूजी बाबा मात्र शाळेच्या बाबतीत फारच सकारात्मक होते.

जेव्हा सत्तरच्या दशकात वडगावच्या आदिवासी वस्तीत कोळपांढरी पाडा येथे शाळा सुरु झाली तेव्हा मात्र खंडूजी बाबा आपल्या स्वत:च्या नातवंडानाच नव्हे तर आदिवासी समाजातील इतर मुलांनाही आवाज देऊन प्रसंगी हाताला धरुन शाळेत नेऊन सोडायचे. त्यामुळेच त्यांच्या नातवंडाना शिक्षणाची गोडी लागली. खंडूजी बाबा यांचा मोठा मुलगा परशराम यांना तीन मुले व तीन मुली.मोठी संगिता, दुसरी प्रमिला तर तिसरी मनिषा. पहिला मुलगा कैलाश, दुसरा अशोक आणि तिसरा दिनकर! या नातवांना शाळेत पाठवून शिकवावे असे त्यांना मनापासून वाटत असे. परंतु घरातील शेतीची कामे करण्यासाठी हात कमी पडत असत. त्याकरिता मुलांच्या शाळांना फाटा मारुन शेतीच्या कामाला जुंपावे लागत असे. कधी कधी शाळा सुटल्या सुटल्या शेतीच्या कामाला मुलांना जुंपले जायचे. त्यामुळे मुलांचे शाळेकडे लक्ष कमी आणि कामाकडे जास्त लक्ष असायचे. काही मुले तर शाळेच्या दारात येऊन शिक्षकास म्हणायची, गुरुजी काय काम असंल तर सांगा लवकर. नाहीतर आम्ही चाललो शेतात कामाला! परंतु खंडूजी बाबा फार दूरदृष्टिचे होते. त्यांनी आपल्या दोन मुली प्रमिला आणि मनिषा यांना शिक्षणासाठी मध्य प्रदेशातील निवाळी येथे पाठवले होते. मुलींना शिक्षणासाठी बाहेर पाठवणारे दूरदृष्टी असलेले खंडूबाबा खऱ्या अर्थाने मोते कुटुंबाचे उध्दारकर्ते च होते असे म्हणायला काही हरकत नाही.

खंडूजी बाबांची मोठी मुलगी मंडीबाई व तिचे यजमान ठाणासिंग भामरे अत्यंत गरिबीत कष्ट करुन दिवस काढत होते. एकदा परशराम आणि त्यांची पत्नी पाहूणे म्हणून शेजारच्या भोंगरा गावात गेले. त्यावेळी त्यांचा मोठा मुलगा कैलाशही त्यांच्यासोबत होता. परंतु तो नंतर त्यांची नजर चुकवून भोंगरा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत पोहचला. तेथील वातावरण त्याला भावले. तो तिथेच खिळून राहिला. इकडे घरात शोधाशोध सुरु झाली तर तो सापडला शाळेत. त्यावेळी त्याने वडीलांकडे हट्ट धरला की मलापण या शाळेत जायचे आहे. ही घटना ऐंशीच्या दशकातील आहे. या शाळेत असलेले एक श्री महाले नावाचे शिक्षक खरोखरच पेशानेच नव्हे तर वृत्तीनेही

शिक्षक होते. या खेड्यापाड्यात रहाणाऱ्या आदिवासी मुलांनी मनापासून शिकावे आणि बाहेरच्या जगात स्वच्छंदपणे उडावे असे त्यांना मनापासून वाटायचे. ते मनापासून मुलांना शिकवायचे. मुलांनी दररोज शाळेत यावे असे त्यांना वाटायचे. अनेकदा गावातील मुलांच्या घरी जाऊन ते मुले शाळेत का आले नाहीत याची विचारपूस करीत असत. पालकांना समजावून सांगून मुलांना शाळेत घेऊन येत असत. हुशार मुलांना प्रोत्साहन देत असत. काही हुशार मुलांचा त्यांना इतका लळा लागला होता की त्यांची बदली झाल्यानंतरही त्यांना ती शाळा सोडून जावेसे वाटेना. त्यांची बदली बोंगरा या गावाहून सारंगखेडा या गावात झाली. ते गाव तेथून बरेच किमी अंतरावरच होते. शाळा सोडून जाताना त्यांनी काही हुशार मुलांच्या पालकांची भेट घेऊन अगदी नम्रपणे विनंती केली होती की तुमची मुले खरोखराच हुशार आहेत. त्यांचे नुकसान करु नका. माझी बदली दुसऱ्या गावातील शाळेत झाली आहे. तुमच्या मुलांना शाळा शिकवायची असेल तर तिकडे पाठवा. रहाण्या खाण्याची काहीतरी सोय करा पण त्यांना शाळेत पाठवा. महाले गुरुजींच्या या तळमळीच्या विनंतीला पान देऊन खंडूजी बाबा यांनी आपला नातू आणि परशराम मोते यांचा मुलगा कैलाश यास भोंगरा येथे शिकायला पाठवायचा निर्णय घेतला.

परशराम मोते यांची एक बहिण मंडीबाई बामणे याच बोंगरा गावात नांदत होती. तिच्या सासरच्या घरची परिस्थिती गरीबीचीच होती. मोलमजूरी करुन खाणारेच कुटूंब होते. परंतु स्वत:चे कुडाचे घर होते. त्यांच्या घरीच कैलाशच्या रहाण्या खाण्याची सोय केली गेली. तेव्हापासून कैलाशच्या शिक्षणाचा मार्ग प्रशस्त झाला. तत्पूर्वी कैलाशचे दुसरीपर्यंतचे शिक्षण वडगावच्या प्राथमिक शाळेत महाले गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली झालेले होते. शाळा सुटल्यानंतर आत्याच्या घरातील गुरे ढोरे सांभाळण्याची जबाबदारी कैलाशला पार पाडावी लागत असे. परंतु भोंगऱ्याला गेल्यावर मात्र अभ्यास आणि अभ्यासच करायला मिळत होता. शनिवारी शाळा सुटल्यावर भोंगऱ्याहून वडगावला पायी चालत जाऊन शेतीची कामे करावी लागत

असत. त्याचप्रमाणे दिवाळीची सुटी किंवा उन्हाळी सुटीतही वडगावला जाऊन कैलाश यांना शेतीची कामे करावी लागत असायची. थोडक्यात सांगायचे काय तर त्याला लहानपाणापासून कष्टाची सवय आहे.

कैलाश यांच्या आत्याची घरची परिस्थितीदेखील अत्यंत हालाखीची होती. तिलाही तीन मुलं होती. दिवसभर केलेल्या मजुरीच्या पैशात घर संसार भागत नव्हता. त्यामुळे परशराम मोते, कैलाशचे वडील महिन्या दोन महिन्यातून थोडी फार उडीदाची डाळ, तांदूळ पाठवून देत असत. पण ते तरी किती दिवस पुरणार? लगेच संपून जायचे. कारण खाणारी तोंडे अनेक होती. कधी कधी प्रसंगी रानात जाऊन तरोट्याची भाजी आणून उकडून खावी लागायची. इतकी हालाखीची परिस्थिती होती.

खरं तर त्यावेळी जे काही खायला मिळायचं ते जगण्यासाठी उर्जा पाहिजे होती म्हणून मिळेल तो अन्नघटक शिजवून खायचा. त्याला चव धव असं काही नसायची. भूकेला कोंडा आणि निजेला धोंडा अशी एक म्हण आहे ती त्यांच्या बाबतीत अगदी खरी ठरत होती. त्यावेळचा काळच असा होता की पोटभर अन्न मिळालं नाही तरी लोकांची काही तक्रार नसायची. शाळेतली मुलं विनातक्रार आपलं काम करायची.

दिवाळीची सुटी पडली की कैलाश भोंगऱ्याहून आपल्या गावी वडगावला जात असे. तिथे पडेल ती शेतीची कामे करीत असे. घरातील सर्व मुले शेतातील जवळपास सर्वच कामे करीत असत. त्यामध्ये नांगरणी, पेरणी, कोळपणी अशी कामे कैलाशनी अनेकदा केलेली आहेत. जणू तो त्यांच्या सवयीचाच भाग होता. परंतु याबद्दल त्यांच्या आईला मात्र फार कौतुक वाटत असे. कैलाशची आई सरिताबाई या अतिशय प्रेमळ आणि सात्विक स्त्री होत्या. त्यांचे माहेर मध्य प्रदेशातील खडकी हे होते. आईचे काका बारकूभाई चव्हाण मध्य प्रदेशात तीस वर्षे आमदार होते. परंतु सरिताबाईच्या वडीलांचे निधन झाल्यानंतर काकांनी मुलांकडे फार लक्ष दिले नाही. तसेच सरिताबाईच्या वडीलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या आईने दुसरे लग्न केले. त्यामुळे सरिताबाईंचा सांभाळ त्यांच्या मोठ्या काकी आवळाबाई बारकू चव्हाण यांनी

केला होता. तिच्या लग्नाची जबाबदारीदेखील मोठ्या काकीनेच पार पाडली होती. त्यामुळे सरिताबाईंचे माहेरचे असे कोणी नव्हतेच. त्यांनी आपले सासर हेच आपले माहेर मानले होते. घरातील पती, सासरे देवासारखे मिळाले होते म्हणून त्यांचा संसार सुखाचा झाला. मुलांनीदेखील त्यांचे पांग फेडले.

कैलाश मोते यांचे वडील परशराम मोते घरातील मोठे आणि कर्ते पुरुष असल्यामुळे घरातील कामाचे नियोजन करणे, सर्वांच्या कामावर लक्ष ठेवणे, सर्वांकडून काम करवून घेणे या जबाबदाऱ्या पार पाडत असत. थोडक्यात सांगायचे तर कुटुंबाचे व्यवस्थापक म्हणून ते काम करीत असत. कैलाशचे लहान काका मदन मोते शेतीची सगळी कामे बघत असत. परशराम यांचेही थोडे फार शिक्षण झाले असल्यामुळे त्यांना आसपासच्या गावामध्ये कोण चांगले शिकले सवरलेले आहेत? ते काय करतात याची माहिती असायची. ते नेहमी आपल्या मुलांना जवळच्या भोंगरा गावातील श्री बी.जी. पवार आणि श्री डी.व्ही सर त्यांच्या लहान भावाची उदाहरणे देत असत. भोंगरा गावातील ही दोन आदिवासी भावंडे इतर आदिवासी मुलांसाठी प्रेरणास्थान ठरली होती. श्री बी.जी. पवार हे धुळे जिल्हयातील या भागातील पहिले आदिवासी एम.बी.बी.एस. डॉक्टर होते तर त्यांचा लहान भाऊ बी.एस्सी. होऊन माध्यमिक शिक्षक झाला होता. त्यामुळे संपुर्ण धुळे जिल्ह्यात आदिवासी समाजात त्या पवार भावंडांचे दाखले दिले जायचे. परशराम आणि खंडूजी बाबा यांना कायम वाटायचं की आपल्या घरातल्या मुलांनीदेखील असंच शिकून मोठे झाले पाहिजे. त्यामुळेच त्यांनी कितीही परिस्थिती बिकट आली तरी मुलांना शिकविणे काही बंद केलं नाही.

कैलाशचे प्राथमिक शिक्षण भोंगरा येथे सुरु होते. तेथे श्री महाले गुरुजींची शिकवण आणि आत्यांचा प्रेमळ सांभाळ यामुळे तिसरी ते पाचवी पर्यंतचे कैलाश यांचे शिक्षण भोंगरा येथेच झाले. त्यानंतरच्या शिक्षणासाठी सोय तेथे नव्हती. आता कैलाशची शाळा बंद होते की काय असा प्रश्न निर्माण

झाला. त्यावेळी कोणीतरी माहिती दिली की सारंगखेडा येथे दहावीपर्यंत शिकण्याची सोय असून तिथे आसपासच्या बाहेर गावावरुन शिकण्यासाठी येणाऱ्या मुलांसाठी बोर्डींगची देखील सोय आहे. बोर्डींग म्हणजे पैसे भरुन रहाण्याची सोय! त्यावेळी एका संस्थेने ही सोय परगावच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन दिली होती. त्यासाठी दर वर्षाला ६० रुपये इतकी फी देखील आकारली जायची. आता ज्या मुलानं कधी तालुक्याचं गाव देखील बघितलं नव्हतं. त्याला सारंगखेडा कुठून माहित असणार! परंतु शिकायची प्रचंड जिद्द कैलाश यांच्यामध्ये निर्माण झाली होती. त्यामुळे काहीही झाले तरी आपण सारंगखेड्याला जायचेच असा निर्धार त्यांनी मनाशी केला. पाचवीची परीक्षा संपल्यानंतर कैलाशने वडगावला आल्यानंतर आपल्या आजोबांना ही बाब सांगितली.

त्यावेळी घरातील सर्व कारभार वडील परशराम सांभाळत असले तरी त्यावेळी पैशाचा व्यवहार मात्र आजोबांकडेच होता. एका मुलाच्या शिक्षणावर एकदम ६० रुपये खर्च करणे म्हणजे त्यावेळी फार अवघड आणि अशक्यप्राय गोष्ट होती. त्याचप्रमाणे सारंगखेड्यासारख्या दूरच्या गावात एवढ्या लहान मुलाला ठेवणे म्हणजे चिंतेचा विषय होता. कारण तो काळच असा होता की खेड्यातली आदिवासी मुलं कधी गावाची शीव देखील ओलांडून बाहेर पडलेली नसत.

तसं सारंगखेडा हे गाव फार पुर्वीपासून घोड्यांच्या बाजारासाठी राज्यभरात प्रसिध्द असलेलं गाव होते. तापी नदीच्या काठावरचं हे बऱ्यापैकी मोठं गाव होतं. परंतु वडगावच्या मोते कुटुंबाचा या गावाशी कधी संबंध आला नव्हता. कारण वडगाव हे गाव महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकाला असलेले खेडे होते आणि तिथून जवळच मध्य प्रदेशची सरहद्द होती. त्यामुळे या गावातील लोक बाजार करण्यासाठी मध्य प्रदेशातील खेतिला किंवा पानसेमळ येथेच जात असत. ते त्यांना जाण्या येण्याच्या दृष्टिने सोयीचे पडत असे.

खंडूजी बाबा यांना आपल्या नातवाबाबत खूप प्रेम होते. आपल्या नातवांने खूप शिकावे असे वाटत असायचे. त्यामुळे पोटाला चिमटा काढून

संसाराच्या तुटपुंज्या खर्चातून ६० रुपये कैलाशला देण्याचा धाडसी निर्णय घेतला आणि कैलाश यांच्या पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला.मंदाना येथून एक पत्र्याची पेटी आणली. त्यात एक कपड्याचा ड्रेस, टॉवेल आणि काही वह्या पुस्तकं असं सामान घेऊन कैलाश यांची रवानगी सारंगखेड्याला झाली. त्यावेळी बसची वगैरेची काहीही सोय नव्हती. डोक्यावर पत्र्याची पेटी घेऊन आड वाटने वाटेनं वडीलांसह त्यांनी सारंगखेडा गाठलं. तिथं पोहचल्यावर पहिल्यांदा त्यांनी शाळेची सोय पाहिली. शाळेत प्रवेश निश्चित झाल्यावरच कैलाश यांच्या मनाला शांती मिळाली. वडीलांनीदेखील सुटकेचा नि:श्वास टाकला.

कैलाश सुरुवातीपासूनच हुशार होते. त्यामुळे त्यांचे गुण पत्रिकेवरचे गुण चांगले होते. त्यामुळे अगदी सहजगत्या त्याना इयत्ता सहावीच्या वर्गात प्रवेश मिळाला. त्यानंतर सारंगखेड्यातील बोर्डींगला ६० रुपये फी भरुन प्रवेश घेतला. त्यावेळी सारंगखेड्याची बोर्डींग म्हणजे एक जुनं मोठं घर होतं. आजच्या सारखी काहीही सोय त्या ठिकाणी नव्हती. एका मोठ्या खोलीत लोखंडी पत्र्याच्या पेट्या ओळीनं लावून एक सतरंजी आणि एक चादर एवढंच सामान घेऊन मुलं त्या ठिकाणी येत असायची. त्या ठिकाणी ना बाथरुम न आंघोळीच्या पाण्याची सोय होती. त्या बोर्डींगमध्ये त्यावेळी जवळपास १०० मुले आसपासच्या खेड्यातून आलेली होती.

सकाळी लवकर उठून बोर्डींगमध्ये रहाणारी ही सगळी मुलं टॉवेल घेऊन गावाशेजारुन वाहणाऱ्या तापी नदीच्या काठावर आंघोळीसाठी जात असत. जाता जाताच रस्त्याने एकाद्या झाडाची छोटी फांदी तोडायची किंवा गवताची काडी घेऊन त्यानेच दात घासायचे. बोर्डींगमध्ये शौचालयाचीदेखील सोय नसल्याने सर्व मुलांना उघड्यावरच जावे लागायचे. बरीचशी मुले सकाळी आंघोळीला नदीवर जातानाच हा कार्यभाग उरकत असत. बहूतांशी सर्वच मुले गरिबांची होती. त्यामुळे जादा कपड्यांचे लाड कोणाचे नसायचे. एकच ड्रेस तोच सकाळी नदीवर गेल्यावर धुवायचा आणि सुकवून तोच अंगात घालायचा असे ते दिवस होते.

सुरुवातीला कैलाशला आपल्या घरची खूप आठवण यायची. कारण एकतर पहिल्यांदाच आई वडीलांना सोडून इतक्या दूरवर रहावे लागले होते. त्यात बोर्डींगची सोय म्हणजे अक्षरश: काळ्या पाण्याची शिक्षाच होती असे म्हटल्यास अतिशयोक्ति ठरणार नाही. कारण तिथे कसल्याही प्रकारच्या सोयी सुविधा नव्हत्या. केवळ डोक्यावर छप्पर होतं आणि शाळेच्या जवळ रहाण्याची सोय होती. एवढंच काय ते सोयींचं होतं.

बोर्डींगच्या जेवणावरुन तर दररोजची कैलाशला घरची आठवण यायची. कारण जेवण म्हणजे एकच ज्वारीची किंवा बाजरीची भाकरी मिळायची. त्याच्यासोबत पातळ डाळीचे कालवण असायचे. बरेचदा त्यात डाळीचा एखादा तुकडा कुठेतरी सापडायचा. अन्यथा तिखट पाणीच असायचे. कधी कधी तर त्या कालवणामध्ये घराच्या छताचा भाग दिसायचा. परंतु त्यावेळी वाढत्या वयाची मुलं भूकेने व्याकूळ व्हायची. कधी एकदा ताट समोर येतंय याची मुले वाट बघत बसायची. कालवण कशाचे आहे याची चौकशी करायच्याही कधी भानगडीत पडत नसत. जे समोर वाढलंय त्यावर नुसता ताव मारायचा. एवढंच मुलांना कळत होतं. एका भाकरीनं तरुण मुलांचं पोट भरत नव्हतं. भूक अर्धवट रहायची. ती कधीच पुर्ण व्हायची नाही. परंतु काही इलाज नव्हता. पुढ्यात वाढून दिलेलं तेवढंच खावं लागायचं. कधी कधी मोठ्या मुलांच्या पोटात कावळे ओरडायचे. रात्री झोप लागायची नाही. परंतु नंतर नंतर मुलांना तेवढंच अन्न मिळत असल्याने पोटालाही सवय झाली. मग त्यांनी अभ्यासवर लक्ष केंद्रित केले. सहाजिकच अभ्यासात प्रगती होऊ लागली.

सारंगखेड्यातील बोर्डींगची मुले अभ्यास भरपूर करित असत. परंतु त्यांच्याबाबतीत भीती अशी घातली जायची की बोर्डींगची पोरं मॅट्रींकच्या परीक्षेला पहिल्या प्रयत्नात कधीच पास होत नाहीत. कायम त्यांना ऑक्टोबर मार्चच्या फेऱ्या माराव्या लागतात. असा त्या बोर्डींगचा इतिहास होता. परंतु कैलाश यांनी त्याकडे लक्ष दिलं नाही. आपलं लक्ष अभ्यासावर केंद्रित केलं. इंग्रजी आणि गणितासारख्या महत्वाच्या विषयावर जास्त फोकस केला.

त्यामुळे इंग्रजी सुधारले. गणितातही बऱ्यापैकी सुधारणा झाली. कैलाशची इंग्रजी विषयातील प्रगती बघून त्यांचे शाळेतील इंग्रजीचे शिक्षक श्री. बी.टी. पाटील सर यांचे विशेष लक्ष त्यांच्याकडे गेले. ते आपल्या स्वत:च्या मुलासारखे कैलाशवर प्रेम करु लागले. पुढे पुढे तर त्यांच्या स्वत:च्या मुलाबरोबर ओळख त्यांची करुन दिली. तो कैलाशच्याच वर्गात शिकत होता. दोघांची मैत्री झाली. दोघे एकत्र अभ्यास करु लागले. अनेकदा अभ्यास करण्यासाठी कैलाशला आपल्या घरी बोलावू लागले. घरी गेले की कधी कधी घरचं रुचकर जेवण कैलाशला मिळू लागलं. बोर्डींगला सकाळी आणि संध्याकाळी असं दोन वेळेचंच जेवण मिळायचं. वाढत्या वयाच्या पोरांना मध्येच भूक लागायची. परंतु बाहेरचे काही खायची सोयदेखील नव्हती आणि मुलांकडे पैसेही नसायचे. अशावेळी घरचं जेवण कधी मिळालं की स्वर्गीय आनंद व्हायचा.

कैलाशला अभ्यासाला भरपूर वेळ मिळत असल्याने प्रगती होत गेली. दिवाळीची सुटी असेल किंवा नाताळच्या सुट्या असतील तर कैलाशला सारंगखेडा ते वडगाव असा पायी चालत प्रवास करीत घरी जावे लागत असे. परंतु घराची ओढ असल्यामुळे ते सुमारे २४ किमी अंतर पायी प्रवास करुन घरी जात असत आणि परत येत असत. आज आपल्याला हे अंतर दहा बारा वर्षाच्या मुलाने कसे पार केले असेल याचे नवल वाटते. परंतु त्यावेळची परिस्थितीच अशी होती की दुसरा इलाजच नव्हता. कैलाशची आठवी व नववी या दोन वर्षातली अभ्यासातील प्रगती तर डोळ्यात भरण्यासारखी होती. कारण बोर्डींगची मुले वारंवार नापास व्हायची. अभ्यासात कच्ची असायची. परंतु कैलाश यांनी या परिस्थितीला छेद दिला. बोर्डींगमध्ये रहाणारा मुलगा शाळेत वर्गात कधी पहिला तर कधी दुसरा तर कधी तिसरा यायला लागला. त्यानंतर सर्वांचे लक्ष कैलाशकडे वळले. सर्वच विषयांचे शिक्षक त्याच्याकडे अधिक लक्ष देऊ लागले.

शेवटी दहावीचे वर्ष आले. वर्गातील इतर मुले खाजगी शिकवण्या लावत असत. परंतु गरिबांच्या मुलांना कुठल्या शिकवण्या आल्यात!

रात्रंदिवस मर मर अभ्यास करुनच परीक्षेला सामोरे जावे लागत असे. त्यावेळी दहावीच्या परीक्षेचे केंद्र वंडाळी येथे होते. मुलांना सारंगखेड्यापासून तिथंपर्यंत पायी चालत जावे लागायचे. परंतु कैलाशने आठवी व नववीला वर्गात पहिल्या तीनमध्ये नंबर काढल्यामुळे कैलाशच्या वडीलांनी एक जुनी सायकल विकत घेऊन दिली होती. त्या सायकलवरुन कैलाश दहावीच्या परीक्षेला गेला आणि त्याने बोर्डींगची अपयशाचे रेकॉर्डच तोडले. बोर्डींगचा एकही मुलगा कधीच पहिल्या प्रयत्नात दहावी पास होत नसे. परंतु कैलाशने १९८३ च्या दहावी बोर्डाच्या परीक्षेत ही प्रथा मोडीत काढली. तो केवळ पासच झाला नाही तर त्यांने संपुर्ण शाळेतून तिसरा नंबर पटकावला होता. त्यामुळे सर्वत्र त्याचे कौतुकच कौतुक झाले. एवढ्या लांब आई वडीलांपासून दूर राहून त्यांने मिळवलेले यश घरच्यांना अगदीच सुखावून गेले. मोते कुटुंबातला पहिला मुलगा ६७ टक्के गुणांनी मॅट्रीक झाल्याने आणि तोही इतक्या चांगल्या गुणाने उत्तीर्ण झाल्याने केवळ मोते कुटुंबातच नव्हे तर संपूर्ण वडगाव परिसरात चर्चा सुरु झाली होती.

मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर कैलाश घरी आला आणि कुठल्याही प्रकारची यशाच्या सत्काराची अपेक्षा न करता ते थेट शेतात जाऊन भिडला. उन्हाळ्याचे दिवस सुरु झाले होते. शेतीच्या मशागतीची कामे सुरु झाली होती. कैलाशचे लहान काका मदन मोते शेतीची सगळी कामे करीत असत. त्यांच्याबरोबर कैलाश यांनी शेतीची कामे जसे की नांगरणी, वखरणी, कोळपणी करायला सुरुवात केली. तोपर्यंत कैलाश यांचे आजोबा, वडील आणि लहान काकांनी चार बैलजोड्या संसारात केल्या होत्या. सुगीच्या दिवसात दोन चार माणसं मजूरीने कामाला घेतली होती. तरीही शेतीची कामे उरकत नव्हती. त्यामुळे कैलाश यांनी दहावीची परीक्षा संपल्यावर लगेच स्वत:ला शेतीच्या कामात गुंतवून घेतले होते. कामाचा व्याप खूपच वाढला होता. त्यासाठी पैसे कमी पडत होते. यासाठी आजोबांनी पैसे जमा करायला सुरुवात केली होती. त्यावेळी धुळे जिल्ह्यातील भूविकास बँकेकडून आजोबांनी कर्ज देखील घेतले होते. त्यावेळी या भागात त्यावेळी

बँकांकडून चक्रवाढ पध्दतीने व्याजाची आकारणी केली जायची. चक्रवाढ व्याजाने कर्ज घेणे म्हणजे कायमचे कंबरडे मोडणे असे म्हटले जाते. मोते कुटुंबाच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा राहिला होता. उत्पन्नाची साधने मात्र वाढलेली नव्हती. त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढविण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. त्यासाठी चारी बाजूने पैसा जमा करण्याचे प्रयत्न सुरु केले गेले होते. कैलाशचे वडील परशराम यांना डिझेल इंजिन दुरुस्तीचे ज्ञान अवगत होते. ते स्वत:च्या विहीरीवरील इंजिन घरच्या घरी दुरुस्त करायचे. परंतु नंतर बँकेच्या कर्जाच्या परतफेडीसाठी त्यांनी परिसरातील शेतकऱ्यांची डिझेल इंजिने दुरुस्त करुन चार पैसे जमवायला सुरुवात केली.

कैलाशनी उन्हाळ्याच्या सुटीत कुटुंबाला हातभार लावल्यानंतर त्यांनी आपले लक्ष पुन्हा शिक्षणाकडे केंद्रित केले. आता दहावीची परीक्षा पास झाल्यानंतर त्यांनी कॉलेजला जाण्याची तयारी सुरु केली होती. त्यासाठी शहादा येथील कॉलेजची माहितीही काढली होती. परंतु घरी पाईपलाइनसाठी घेतलेल्या कर्जाच्या ओझ्याने सर्वांच्याच काळजाचे पाणी झाले होते. खंडूजी बाबा अतिशय प्रामाणिक आणि सरळ साध्या स्वभावाचे शेतकरी होते. कोणाचे कर्जाचे पाच पैसे बुडवण्याचा विचार कधी त्यांच्या मनाला शिवला नाही. अतिशय मेहनत घेऊन त्यांनी भूविकास बॅंकेचे पैसे चक्रवाढ व्याजासह परतफेड केले. ते बँकेचे कर्ज व्याजासह परतफेड केल्यानंतर काही दिवसातच बाकीच्या शेतकऱ्यांचे सर्व कर्ज शासनाने माफ केले. परंतु खंडूजीबाबा यांना त्याचे काहीही वाईट वाटले नाही. कारण घेतलेले कर्ज आपण प्रामाणिकपणे परतफेड केल्याचे समाधान त्याना मिळाले होते.

परंतु खंडूजी बाबांना त्यांना त्याचे काहीही वैषम्य वाटले नाही. कारण आपल्या डोक्यावर जो कर्जाचा बोजा होता तो उतरविणे आपले कर्तव्य होते आणि ते आपण पार पाडले याचे समाधान आहे असे त्यांचे म्हणणे होते. आपल्या डोक्यावर कर्ज असताना कर्जमाफी झाली नाही तो आपल्या नशिबाचा भाग होता असे ते समजत असत. कर्ज झाले म्हणून त्यांनी कधी आपल्या नातवंडाच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले नाही. कैलाशला

उच्च शिक्षण देऊन मोठा अधिकारी बनवायचे स्वप्न त्यांच्या डोक्यात घर करुन होते.

उन्हाळ्यात शेतीची कामे पार पडली. त्यानंतर सगळीकडे वरुण राजाने बरसात केली. कैलाशला आपल्या शिक्षणाची पुन्हा भूक लागली. इयत्ता ११ वीसाठी शहादा येथील साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या विद्याविहार शहादा येथे त्यांनी ११वीच्या विज्ञान शाखेत प्रवेश मिळाला. त्याचप्रमाणे शासनाने खास आदिवासी मुलांसाठी सुरु केलेल्या वसतिगृहामध्ये प्रवेशही मिळाला. त्यामुळे पुढील शिक्षणात कोणतीही अडचण येणार नव्हती. त्यावेळी ११ वीसाठी कोणती विद्या शाखा निवडावी? कोणत्या शाखेत गेल्यावर काय बनता येऊ शकते. याबाबत मार्गदर्शन करणारे कोणीच नव्हते. परंतु चांगले गुण मिळाल्यावर विज्ञान शाखा घेतात असे सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे मत असायचे. शहादा तालुक्याचा बहूतांशी भाग आदिवासी असल्याने कोणी सायन्स घेत नसत. कारण जे आदिवासी विद्यार्थी सायन्सला प्रवेश घेत ते हमखास बारावीला नापास होत असत अशी एक वदंता होती. आदिवासी विद्यार्थी ग्रामिण भागातून जाणारे असल्याने ते सहसा कोणी विज्ञान शाखा घेण्याच्या भानगडीत पडत नसत. आर्ट किंवा कॉमर्स घेऊन पास होण्याचा सोपा मार्ग निवडत असत. परंतु या सर्वांना छेद देत कैलाशने विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. शासकीय वसतिगृहातही प्रवेश मिळाला होता. कॉलेज सुरु झाले. कैलाशने स्वत:चे डोके चालवून विज्ञान शाखा निवडल्याने बाकीची मुले त्यांची हेटाळणी करायचे. आला मोठा सायन्सचा कीडा असे हिणवून बोलायचे. परंतु या सर्वांकडे दुर्लक्ष करुन कैलाश आपल्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करीत असे.

वसतिगृहामध्ये एकेका खोलीमध्ये चार ते पाच मुलांना रहायला दिलेले असायचे. त्यामुळे तिथे अभ्यासाला पुरक वातावरण नसायचे. कैलाश सकाळी उठल्यावर वसतिगृहात न थांबता एक सतरंजी आणि उशी घेऊन वसतिगृहापासून काही अंतरावर एका शेतात आंब्याचे झाड होते. त्या झाडाची थंडगार सावली पडलेली असायची. त्या सावलीत कैलाश यांचा

अभ्यास व्हायचा. कॉलेजातील अनेक विद्यार्थी त्याची चेष्टा करायचे. सायन्स घेऊन नापासच होणार आहेस मग इतका अभ्यास का अशी भिती घालायचे. परंतु कैलाश यांनी मनाशी ठाम निर्धार केला होता की सायन्स विषय घेऊनच पुढे शिकायचे. कुठल्याही प्रकारची शिकवणी न लावता, कुणाच्याही नोट्स न घेता स्वप्रेरणेने अभ्यास करुन पहिल्यांच प्रयत्नात बारावी सायन्सची परीक्षा पास केली. शासकीय वसतिगृहात राहून बारावीची परीक्षा पहिल्याच प्रयत्नात पास होणारा कैलाश हा पहिलाच विद्यार्थी ठरला. परंतु याचे कौतुक करायला कोण होते? त्यांच्या सायन्सला प्रवेश घेण्याची हेटाळणी करणाऱ्या मित्रांचे दात त्यांनी आपल्या कृतीने घशात घातले. बारावी पासचे श्रेय आपल्या कष्टाला देत कैलाश यांनी गावी येऊन पुन्हा आई वडीलांना शेतीच्या कामात मदत करायला सुरुवात केली.

बारावीची परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर जवळपास तीन साडेतीन महिने शेतीची कामे केल्यानंतर कैलाश यांच्या मनात विचार आला की आपण कृषि विद्यापीठातून पदवीधर व्हायचे. तो निर्णय त्यांनी स्वत: घेतला. आपले पारंपारिक उत्पन्नाचे साधन शेती हेच असून यातून कितीही कष्ट केले तरी निदान सर्व कुटुंबाचे पोट भरेल इतकेही उत्पन्न निघत नाही. यामागची कारणे काय आहेत? ती शोधली गेली पाहिजेत. शेतीच्या व्यवसायात कष्टासोबतच काही नवीन केले तर कसे उत्पन्न वाढेल असे त्यांच्या विद्यार्थी मनाला वाटत असे. त्यातूनच त्यांनी कृषि पदवीधर होण्याचे स्वप्न पाहिले. केवळ स्वप्न बघून थांबणारे हे व्यक्तिमत्व नव्हते. आपले स्वप्न सत्यात उतरविण्याचे बाळकडू त्यांना लहानपणीच मिळाले होते.

कृषि शाखेचा पदवीधर व्हायचे तर कृषि महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागणार होता. त्यासाठी फॉर्म भरण्यासाठी धुळे या जिल्ह्याच्या गावी जावे लागणार होते. त्यावेळी नंदूरबार हा स्वतंत्र जिल्हा झाला नव्हता. शहादा हा तालुका धुळे जिल्ह्याचाच भाग होता. तोपर्यंत कैलाशने कधीही धुळे शहर पाहिले नव्हते. एवढेच काय पण वडगावातील कोणीच धुळे हे जिल्ह्याचे ठिकाण असलेले शहर पाहिले नव्हते. मग धुळ्याला जायचे तर कसे जायचे

असा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी कैलाश यांच्या वडीलांनी याबाबतची सगळी माहिती शोधून काढली. तेव्हा त्यांना कळले की त्यांच्याच गावातील गुलब्या पावरा नावाचा एक इसम अनेकदा धुळ्याला जाऊन आलेला होता. कारण त्याचे कोणीतरी जवळचे नातेवाईक धुळ्याला रहात होते. त्यामुळे त्याची नेहमी जा ये होत असे. त्याच्याबरोबर धुळ्याला जाऊन फॉर्म भरुन यावे असे बापलेकांमध्ये ठरले. परंतु हा कृषि महाविद्यालयाचा फॉर्म भरण्यासाठी त्या अर्जासोबत रहिवासी प्रमाणपत्र जोडावे लागत असे. हे रहिवासी प्रमाणपत्र मिळविणे कोणत्याही भारतीय रहिवाशांसाठी अतिशय कठीण काम असते. त्यातल्या त्यात आदिवासी लोकांना तर तहसिलदार कार्यालयातून रहिवासी प्रमाणपत्र मिळविणे म्हणजे अग्निपरीक्षाच असते. कारण इतक्या जाचक अटी घातलेल्या असतात की रहिवासी प्रमाणपत्र नको पण यांना आवरा असे म्हणायची वेळ येते. कैलाश यांना पहिल्यांदाच सरकारी कामकाज कसे चालते याचा फटका बसला. कारण सर्व कागदपत्रे सोपी असतात परंतु एकच कागद असा सांगतात की तो आदिवासी लोकांना आणणे फारच अवघड असते. जसे की १५ वर्षापूर्वी तुम्ही याच गावात रहात होता याचा पुरावा आणा, जन्माचा दाखला आणा. आता आदिवासी तर वर्षानुवर्षे याच गावात रहात असतात. पण पुरावा कसा आणायचा? यात त्यांचा वेळ जातो आणि ते प्रवेशासाठी मुकतात. वर्षानुवर्षे असेच चालत आले आहे. तरीदेखील वाटेल ते झाले तरी आपण कृषि महाविद्यालयात प्रवेश मिळवायचाच या जिद्दीने कैलाशचे प्रयत्न सुरु होते.

कैलाश यांनी रहिवासी दाखला तहसिलदारांकडून मिळविण्यासाठी महिनाभर घेटा घातल्यानंतर शेवटी रहिवासी दाखला मिळाला. परंतु फॉर्म भरण्याची शेवटची तारीख सोमवारी आहे म्हटल्यावर शुक्रवारी दाखला मिळाला. केवळ शनिवारचा अर्धा दिवस त्यांच्याकडे होता. तो फॉर्म आणि कागदपत्रे घेऊन कैलाश शहादा शहरातून बाजारपेठेतून जात असताना एका विद्यार्थी मित्राने तो हातातला फार्म बघूनच ओळखले की कैलाशनेदेखील कृषि महाविद्यालयासाठी फॉर्म भरायची तयारी सुरु केली आहे.. परंतु

फॉर्म भरण्याची तारीख केवळ दोन दिवसावर येऊन ठेपली होती. त्यावेळी आजच्या सारखी पटकन जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन अर्ज दाखल करण्यासारखी परिस्थिती नव्हती. तिथे जायचे तर खूप दिवस आधीपासूनच तयारी करावी लागायची. परंतु प्रवेश मिळेल की नाही हे सर्व देवावर सोपवून कैलाशने आपला अर्ज पोष्टाने पाठवायचा निर्णय घेतला होता. परंतु पोस्ट ऑफिसदेखील बंद झाले होते. रस्त्यात भेटलेला तो विद्यार्थी मित्र म्हणाला, मीदेखील कृषि महाविद्यालयासाठी अर्ज केला आहे आणि मलाही उशिर झाला आहे. पोष्टाने अर्ज पाठवणे आणि तो एका दिवसात धुळ्याला पाठवणे अशक्य आहे. त्यामुळे मी स्वत: धुळ्याला जाऊन अर्ज दाखल करणार आहे असे त्याने सांगितले. त्यावर कैलाशने त्याला विनंती केली की तू धुळ्याला जातच आहेस तर माझाही अर्ज घेऊन जाशील का? वेळ अगदीच कमी आहे. त्या मित्रानेही कैलाशची विनंती मान्य केली आणि तो कैलाशचा अर्ज घेऊन गेला आणि आठवणीने जमादेखील केला. अगदी शेवटच्या दिवशी अर्ज दाखल केल्यामुळे आपला अर्ज स्वीकारला जाईल की नाही अशी शंका असल्यामुळे प्रवेश मिळेल की नाही याची खात्री नव्हती. त्यामुळे त्याकडे कैलाशचे लक्षच नव्हते. प्रवेश मिळेल की नाही यावर फार विचार न करता आणखी काय करता येईल यावर पुढचा विचार सुरु केला. कारण केवळ शेवटचा एकच दिवस राहिला होता आणि अर्ज दुसऱ्यांच्या हाती दिला होता. सगळेच रामभरोसे होते. परंतु म्हणतात ना जर तुमची इच्छाशक्ति प्रचंड तीव्र असेल तर कोणतीही मनोकामना सफल होते. कैलाश यांचा स्वभावही सुरुवातीपासून सकारात्मक विचार करण्याचा होता आणि काहीही झाले तरी कृषि महाविद्यालयातच प्रवेश घ्यायचा ही तीव्र इच्छाशक्ति होती.

दरम्यानच्या काही दिवसानंतर ज्या मुलाने कैलाशचा अर्ज दाखल करायला नेला होता. त्याचा नंबर वेटिंग लिस्टवर लागला असल्याचे समजले. आपल्याला काहीही पत्र आले नाही किंवा काही कळविले गेले नाही. त्यामुळे प्रवेशासाठी आपला नंबर लागला नाही असे समजून कैलाशने तिकडे दुर्लक्ष केले होते. त्यानंतर काही दिवसाने त्या वेटींग लिस्टवर

असलेल्या मित्राचाही प्रवेशासाठी नंबर लागला आणि त्याला कोल्हापूरचे कृषि महाविद्यालय मिळाले. शहादा कॉलेजमधून कृषि महाविद्यालयासाठी ज्यांनी ज्यांनी प्रवेश अर्ज भरले होते त्या सर्वांचे नंबर कोल्हापूरला लागले होते. त्या यादीत कैलाशचे मात्र नावच नव्हते. त्यामुळे त्याने अपेक्षा सोडून दिली आणि त्याच शहाद्याच्या कॉलेजमध्ये साध्या बी.एस्सीला प्रवेश घेतला. त्याचप्रमाणे वसतिगृहासाठीही नंबर लागला. आता सरळ बी.एससी करायचे ठरले. परंतु नियतीच्या मनात वेगळेच काहीतरी होते. तोच मित्र पुन्हा कैलाशला भेटला सोबत दुसरा मित्र श्री बागूल हादेखील होता. मित्र म्हणाला, अरे तुझे ॲडमिशन झाले का? त्यावर कैलाश म्हणाला की माझा नंबरच लागला नाही. सर्वांचे नंबर कोल्हापूरला लागले आहेत. त्या यादीत माझा नंबर नाही. यावर तो मित्र आश्चर्यांने म्हणाला, अरे, तुझा नंबर तर धुळ्यालाच लागला आहे आणि तोही मेरिटवर! मग मात्र कैलाशच्या आनंदाला पारावार उरला नाही. क्षणभर त्याचा स्वत:चा स्वत:वर विश्वासच बसला नाही. परंतु त्याचा स्वत:वर विश्वास मात्र कायम होता.

त्यानंतर कैलाशला कधी एकदा धुळ्याला जाऊन कृषि महाविद्यालयात प्रवेश घेतो असे झाले होते. त्याने ताबडतोब धुळे गाठले. कृषि महाविद्यालयात जाऊन पाहिले तर सर्वच्या सर्व जागा भरलेल्या होत्या. खूप उशीर झाला होता. दैव पण किती कठोर असते बघा ना! कैलाशने मेरिट लिस्ट कार्यालयात दाखवून आपले नाव मेरिट लिस्टमध्ये असल्याचे निदर्शनास आणून दिले. परंतु प्राचार्यांनी सांगितले की तुम्ही ॲडमिशन घ्यायला उशीर केला आहे. ठरलेल्या मुदतीच्या काळात तुम्ही प्रवेश घेण्यासाठी आला नाहीत. त्यामुळे तुमची जागा आता भरली गेली आहे. पुन्हा नशिबाच्या फेऱ्याने आपला महिमा दाखवला. अतिशय निराश होऊन कैलाश तिथेच पायरीवर बसून राहिला. संध्याकाळी चार वाजेपर्यंत तिथेच पायरीवर बसून नशिबाला दोष देत राहिला.

माणसांची एक म्हण आहे की कोशिश करनेवालों की कभी हार नहीं होती. त्याप्रमाणे पुन्हा एक करिश्मा घडला. त्याचवेळी तिथे एक डॉक्टर

आणि त्यांचा मुलगा त्या कॉलेजमध्ये आला. त्या डॉक्टरांच्या मुलाचे कृषि महाविद्यालयात ॲडमिशन झाले होते. परंतु त्याने मेडिकल कॉलेजसाठीदेखील फॉर्म भरला होता. त्याचा जास्त कल मेडिकलकडेच होता. परंतु तिकडे नंबर लागला नाही तर पर्याय म्हणून त्याने कृषि महाविद्यालयाचाही फॉर्म भरला होता. परंतु त्याच्या सुदैवाने त्याचा मेडिकलला नंबर लागला. त्यामुळे तो मुलगा आणि त्याचे वडील दोघेही कृषि महाविद्यालयाचे ॲडमिशन रद्द् करुन आपली ओरिजल कागदपत्रे घेऊन जाण्यासाठी आले होते. त्यांनी त्या मुलाचे बी.एस्सी ॲग्रीचे ॲडमिशन रद्द केले. तोपर्यंत कैलाश तिथेच पायरीवर बसला होता. त्याला पाहून महाविद्यालयाचे प्राचार्य श्री मोगल सर म्हणाले, आता तुझे ॲडमिशन होऊ शकते. लगेच त्यांनी त्याच मुलाच्या जागेवर बी.एससी ॲग्री.ला कैलाशचे ॲडमिशन केले आणि त्याच मुलाच्या जागेवर वसतिगृहातही त्याला त्याच रुममध्ये प्रवेश दिला.

खरे तर सर्वच काही नशिबावर अवलंबून असते असे नाही तर कोशिश करनेवाले पाकर जो बच जाता है वह नशिबवालो को मिल जाता है. कैलाश मोते हार्ड वर्कर आणि प्रयत्नवादी होते. त्यामुळे ती जागा दुसऱ्या कोणाला तरी गेल्यानंतरही पुन्हा त्याला मिळाली होती. हे त्याच्या प्रयत्नाचेच फलित होते. त्याना मिळालेल्या वसतिगृहात जी खोली मिळाली होती. त्या एका खोलीत चौघेजण रहात होते. त्यात चतूर ठाकरे, शैलेश कांबळे आणि श्री नितीन जतकर आणि कैलाश मोते यांचा समावेश होता. त्यावेळी जी स्कॉलरशिप मिळत होती ती अतिशय तुटपुंजी होती. त्यात मेसचा खर्चही भागत नव्हता. जवळपास सर्वच विद्यार्थ्यांची हीच अडचण होती. त्यामुळे मुलांच्या डोक्यातून एक सुपीक कल्पना आली. प्रत्येक १० मुलांनी एक गट तयार केला आणि त्या गटाचे नेतृत्व प्रत्येकाने एकेक महिना करायचे. दरमहा १२० रुच्या जवळपास खर्च येत असायचा. तो सर्व मुलांनी एकत्र वर्गणी जमा करायची. दहा जणांच्या जेवणासाठी लागणारे साहित्य एकाच दुकानातून आणायचे आणि एक मावशी स्वयंपाकासाठी ठेवून जेवणाची व्यवस्था करायची ठरविले. ती आयडिया कमालीची यशस्वी झाली.

अशा प्रकारे १९८५ ते ८९ या चार वर्षात त्यांनी आपले ॲग्रीकल्चर बी.एससीचे शिक्षण धुळे येथे राहून पुर्ण केले आणि ७५ टक्के गुणांसहित उत्तीर्ण झाले. ग्रामिण भागातून आलेले अनेक विद्यार्थी ही कृषि पदवी संपादन करण्यासाठी आठ दहा वर्षे खर्ची घालत असत. तरीदेखील चांगल्या गुणाने पास होणे अवघड असे. परंतु कैलाश यांनी पहिल्याच प्रयत्नात ही पदवी परीक्षा चांगल्या गुणाने देऊन पदवी प्राप्त केली होती. त्यामुळे कैलाश यांचा शैक्षणिक प्रवास यशस्वीरित्या पुर्ण झाला होता. आता त्यांना अपेक्षा होती ती चांगली नोकरी मिळण्याची. त्यासाठी त्याचे कसोशीने प्रयत्न सुरु होते. शोधणाराला सर्व काही सापडते म्हणतात यावर त्याचा पुर्ण विश्वास होता. त्यांचे नोकरीसाठी सत्वर प्रयत्न सुरु केले. परंतु त्यावेळी फारशा नोकऱ्यांच्या जाहिराती निघायच्या नाहीत. निघालीच तर पटकन नंबर लागेल असे नाही. पदवी नंतर काही दिवस थांाबावेच लागत असे. कैलाश यांना शिक्षणाची इतकी गोडी लागली होती की थोडा काळही स्वस्थ बसावेसे वाटत नव्हते. एक तर लगेचच सरकारी नोकरी मिळवायची लगेच नोकरी मिळाली नाही तर नोकरी मिळेपर्यंत पुढचे उच्च शिक्षण घेत रहायचे. त्यासाठी त्यांनी पुढील शिक्षण चालू ठेवून नोकरीसाठी प्रयत्न करण्याचा निर्णय घेतला. मग त्यांनी पुन्हा फॉर्म भरुन एम.एस्सीसाठी राहूरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठात प्रवेश घेतला.

एकीकडे नोकरीसाठी प्रयत्न आणि दुसरकडे पुढील शिक्षण चालू ठेवणे अशा दोन आघाड्यांवर त्यांचे काम सुरु होते. त्या दरम्यान त्यांचा श्री श्री मोहन रामोडे नावाच्या एका अशा विद्यार्थ्याशी संपर्क आला की तो एम.एससी होऊन एमपीएससीच्या स्पर्धा परिक्षेची तयारी करीत होता. तो व्यक्ति असा होता की अक्षरश: स्पर्धा परिक्षेच्या ध्येयाने प्रेरित झाला होता. त्याशिवाय त्याला काही सुचतदेखील नव्हतं. तो कोणाशीही फारसा बोलत नव्हता. अभ्यास एके अभ्यास चालू होता. त्यांच्या संपर्कात आल्यानंतर कैलाश यांनादेखील स्पर्धा परिक्षेची स्वप्ने पडू लागली. एम.पी.एस.सी. परीक्षा काय असते? त्यासाठी अभ्यास कसा करायचा असतो? याची

सविस्तर माहिती श्री मोहन रामोडे यांच्यासोबत राहून त्यांना मिळाली. कैलाश यांची अभ्यास करण्याची मनाची तयारी झाली आणि एम.एससी आणि एमपीएससीची तयारी असा एकत्र प्रवास सुरु झाला. श्री रामोडे यांच्यासोबत त्यांनी अभ्यास करायला सुरुवात केली आणि नशिबाची त्याला साथ मिळाली. कैलाश यांनी पहिल्या प्रयत्नातच एमपीएससीची परीक्षा उतीर्ण केली. कृषि सेवेत वर्ग दोनच्या पदावर त्यांची निवडही झाली. परंतु त्या जागेवर ते रुजू झाले नाहीत. पुन्हा एकदा परीक्षा द्यायची ठरविले आणि वर्ग एकचे अधिकारी व्हायचे स्वप्न सत्यात उतरवून दाखवले. माणसाच्या अंगी जिद्द आणि चिकाटी असली तर त्याचे काय होऊ शकते याचे जितेजागते उदाहरण म्हणजे कैलाश मोते होत. अतिशय कठिण परिस्थितीशी कठोर सामना करीत त्यांनी स्वत: आपले ध्येय निश्चित केले आणि त्या ध्येयाचा पाठपुरावा करीत यश संपादन केले. ही शहादासारख्या आदिवासी बहूल तालुक्यातील तरुणांसाठी अतिशय प्रेरणादायी बाब होती. सतत एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित केले आणि सातत्याने पाठपुरावा करीत राहिले तर यश आपोआप हाती लागते हा त्यांचा स्वत:चा अनुभव सांगतो. श्री कैलाश परशराम मोते आणि त्यांच्या आजोबा व आई वडीलांनी पाहिलेले स्वप्न त्यांनी साकार करुन दाखविल्यामुळे कुटुंबाच्या आनंदाला पारावारच उरला नाही. आयुष्यचा महत्वाचा टप्पा यशस्वीपणे पार केला.

प्रकरण दुसरे

शासकीय सेवेचा प्रारंभ

जसजशा आपण यशाच्या पायऱ्या चढत जाऊ तसतसा आपला आत्मविश्वास वाढत जात असतो. कैलाशचे देखील तसेच झाले. पहिल्याच प्रयत्नात एमपीएससी पास झाल्यानंतर आत्मविश्वास इतका दुणावला की आपण कोणत्याही परिस्थितीत वर्ग एकचे अधिकारीच बनायचे असा निर्धार केला. वर्ग दोन अधिकारी बनण्याची संधी आली होती. परंतु ती वर्ग एकचा अधिकारी होण्याच्या ध्येयासाठी सोडली. दरम्यानच्या काळात त्या काळात जिल्हा पातळीवर प्रादेशिक दुय्यम सेवा मंडळामार्फत परीक्षा घेऊन पदे भरली जात असत. अशा एका परीक्षेमध्येही कैलाश यांचा नंबर लागून कृषि विभागात विस्तार अधिकारी होण्याची संधी चालून आली होती. परंतु कैलाश यांनी आपले ध्येय निश्चित केले होते. वर्ग एकचे अधिकारी यांची खुर्ची त्यांच्या डोळ्यासमोर दिसायची. परंतु घरच्या परिस्थितीचा विचार

करुन पंचायत समिती तळोदा येथे कृषि विस्तार अधिकारी म्हणून हजर झाला आणि आपल्या शासकीय सेवेचा श्रीगणेशा केला.

वास्तविक पहाता आदिवासी बहूल भागातून येणारी मुले आसपासच्या अशैक्षणिक वातावरणामुळे अभ्यासात कच्ची असायची. अनेकांना घरात कुअुंबाच्या उदरनिर्वाहासाठी कामाला हातभार लावून शिकावे लागायचे. आपल्या भागातील किंवा आपल्या समाजातील प्रेरणादायी ठरणारी किंवा योग्य मार्गदर्शन करणारी माणसं नसायची. त्यात शाळा शिकून काय घरावर सोन्याची कौले घालणार आहात काय? शेतात कष्टच करावे लागणार आहेत. असे टोमणे मारणारी माणसं पावला पावलावर भेटायची. शिकणं आपलं आदिवासी समाजाचं काम नाही ही नकारात्मकता सदैव आसपासच्या लोकांमध्ये खच्चून भरलेली असायची. याशिवाय शिक्षणावर खर्च करण्याची आर्थिक परिस्थितीदेखील आदिवासी कुटुंबांची नसायची. त्यामुळे या आदिवासी भागातील आदिवासींची मुले दहावी, बारावीपर्यंत शिकून कुठेतरी कारकुनाची नोकरी शोधण्याचा प्रयत्न करायची. जे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेसारख्या परीक्षा देण्याचा प्रयत्न करायचे ते पास होताना तीन तीन, चार चार वर्षे वाया घालवायचे. वारंवार मार्च - ऑक्टोबर अशा परिक्षेच्या वाऱ्या चालू असायच्या. परीक्षा देऊन यश न मिळाल्याने अनेक मुले खचून जायची. शेवटी कंटाळून किंवा घरच्यांचे बस्स झाली शाळा आता शेतात लक्ष घाला, अशा टोमण्याने अर्ध्यावर शिक्षण सोडणारांचीच संख्या मोठी असायची. परंतु यशाची चटक लागलेली कैलाश यांच्यासारखी मुले मात्र चॉईस शोधत होती. ही अतिशय दुर्मिळ गोष्ट होती.

खरे तर कैलाश यांना देखील नोकरीची अत्यंत गरज होती. परंतु त्यांच्या डोक्यात ध्येय निश्चित झाले होते. त्यामुळे जोपर्यंत क्लासवन अधिकाऱ्याची पोस्ट मिळत नाही, तोपर्यंत स्पर्धा परीक्षा देत रहायच्या असा निर्णय त्यांनी घेतला होता. परंतु नोकरीचीही तितकीच गरज होती. स्पर्धा परिक्षेसाठी त्यांनी जो अभ्यास केला होता तो सर्वच परिक्षेसाठी लागू पडत होता. त्यामुळे ज्या ज्या परिक्षांचे फॉर्म निघतील ते ते फॉर्म भरायचे आणि

परीक्षा देत रहायच्या असा सपाटा त्यांनी लावला. असाच पुन्हा एकदा त्यांनी स्टाफ सिलेक्शन कमिशनचा फॉर्म भरला आणि त्यांना नाशिक जिल्हा अंतर्गत येथे निरीक्षक सेंट्रल एक्साइज व कस्टम अधिकारी म्हणून नोकरी मिळाली.

कैलाश मोते हे संपुर्ण धुळे जिल्ह्यातील पावरा समाजातील पहिले ॲग्रीकल्चर बी.एस्सी झालेले तरुण होते. त्यामुळे त्यांचे नाव सर्वत्र पसरले होते. नवा जोश आणि नवा उत्साह यामुळे त्यांनी अतिशय मेहनतीने काम केले. परंतु त्यांची क्लास वन अधिकारी होंण्याची भूक काही शमत नव्हती. त्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरुच होते. पुढे त्यांनी आधीच दिलेल्या स्टाफ सिलेक्शनची परीक्षेचा निकाल लागला आणि कैलाश मोते यांना सेंट्रल एक्साइज खात्यात निरीक्षक पदाची पोस्ट मिळाली आणि तीही शेजारच्या जिल्ह्यात नाशिक येथे. त्यामुळे त्यांनी कृषि विस्तार अधिकारी पदाचा राजीनामा दिला आणि ते एक्साइज खात्यात इंस्पेक्टर म्हणून रुजू होण्यासाठी रवाना झाले.

कैलाश मोते यांना एक्साइज आणि कस्टम विभागात निरीक्षकाची नोकरी करण्याची संधी चालून आली. त्यावेळी त्यांचे वय असे होते की अंगावर खाकी वर्दी घालायची म्हटले की मुलांना भारी अभिमान वाटायचा. त्यात इन्सपेक्टरची पोस्ट म्हटल्यावर आणखी भर पडली. त्यामुळे कैलाश यांनी आयुष्यातील दुसरी सरकारी नोकरी धरली ती कस्टममध्ये इन्सपेक्टर म्हणून! त्यांची पहिली पोस्टींग झाली ती नाशिक शहरात. शहरातील केंद्रिय राजस्व भवन येथील कार्यालयात एक्साइज इन्सपेक्टर म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्यावेळी तेथे श्री उबाळेसाहेब नावाचे आयआरएस झालेले एक्साइजचे वरिष्ठ अधिकारी म्हणून कार्यरत होते. कैलाश मोते यांचा कामातील प्रामाणिकपणा आणि सरळ साधा स्वभाव यामुळे कैलाश यांच्यावर त्यांचा अल्प कालावधीतच चांगला विश्वास बसला आणि त्यांनी अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपवल्या. कैलाश यांनी त्या अतिशय मेहनतीने आणि विश्वासाने पार पाडल्या आणि अतिशय अल्पावधीतच त्यांनी

एक्साइजमधला एक कार्यक्षम अधिकारी म्हणून नावलौकीक मिळविला. त्यांचा कामातील धडाका आणि धाडस बघून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर महत्वाच्या ठिकाणच्या जबाबदाऱ्या सोपविल्या. एक्साइजचे वरिष्ठ अधिकारी श्री उबाळेसाहेब यांनी त्यांचे कामकाज पाहून त्यांना नाशिक जिल्ह्यातील महत्वाच्या तीन लॅबच्या जबाबदाऱ्या देऊन रेंजमध्ये पदस्थापना देऊन त्यांच्याकडे दिली होती. त्यामध्ये क्रॉम्टान ग्रीव्हज, प्रशांत खोसला आणि आय.व्ही. एन. लॅब अशा तीन महत्वाच्या कंपनीच्या एक्साइजचे निरीक्षक म्हणून काम दिले. त्यावेळी या कस्टमच्या निरीक्षक पदाचा रुबाब काय असतो याची पुसटशीही कल्पना श्री मोते यांना नव्हती. परंतु या पदाचे महत्व कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना माहित होते. त्यामुळे नवीन कस्टम अधिकारी आला की कंपन्यांचे अधिकारी त्या कस्टम अधिकाऱ्याची ओळख करुन घेऊन त्याची खातीरदारी करण्यासाठी पुढे पुढे करत असत. परंतु श्री मोते हे तर त्यावेळी एका साध्या खोलीत भाड्याने रहात असत. कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या या साधेपणाचे नवल वाटले. त्यांनी आसपासच्या तीन मोठ्या वेगवेगळ्या भागातील पंचतारांकित हॉटेल प्रशासनाला सांगून टाकले की हे कस्टमचे निरीक्षक साहेब आहेत. यांनी काहीही खाल्ले किंवा प्यायले तर त्याचे बील कंपनीच्या खात्यावर मांडून ठेवावे. त्यानंतर अनेकवेळा कंपन्यांचे अधिकारी स्वत: त्यांना हॉटेलमध्ये घेऊन गेले. बील कंपनीने भरले. त्यानंतर त्यांना त्या पदाचे महत्व कळाले. परंतु श्री मोते यांच्या दृष्टिने एक मुख्य जेवणाचा प्रश्न निकाली निघाला होता. त्यावेळी त्यांचे लग्न झालेले नव्हते. त्यामुळे ते त्यांचा मित्र श्री गुलाल पावरा यांच्यासोबत गांधीनगर येथील घरी रहायचे. हॉटेलचे जेवण मिळू लागल्याने जेवण बनविण्याचा प्रश्न मिटला होता. त्यांच्याकडे येणारे पाहूणे यांचीही तेथेच जेवणाची सोय होऊ लागली. एक्साइज ऑफिसमधले त्यांचे मित्र या सवलतीचा गैरफायदा घेऊ लागले. मग मात्र त्यांनी स्वत:ला शिस्त लावून घेतली.

श्री कैलाश मोते यांच्याकडे ज्या कंपनीच्या एक्साइज ड्युटीची

वसुलीची जबाबदारी होती, त्यांची तपासणी आणि एक्साइज ड्युटी याबाबत मात्र त्यांनी कधी तडजोड केली नाही. अनेकदा कंपन्यांना नोटीसा पाठवत असत. त्यामुळे त्यांना सुनावणीसाठी वरीष्ठ अधिकाऱ्याकडे जावे लागत असे. कंपनीमध्ये तयार झालेला माल बाहेर पडताना त्याच्या प्रत्येक गेटपासवर कस्टम अधिकारी म्हणून श्री मोते यांची सही आवश्यक असायची. त्यामुळे कंपनीच्या दृष्टिने या अधिकाऱ्यांला जपणे महत्वाचे असायचे. आपले काम श्री मोते कशालाही बळी न पडता चोख पार पाडायचे. त्यामुळे त्यांचे वरिष्ठ अधिकारी असलेले आयआरएस अधिकारी श्री अजय उबाळे हे त्यांच्या कामावर नेहमी खूष असत. सेंट्रल एक्साइज (कस्टम) खात्यात स्थिरावण्यास श्री मोते यांना उबाळे साहेबांचे मोलाचे सहकार्य आणि मार्गदर्शन मिळाले.

आता कैलाश मोते यांचा सरकारी नोकरीतील आत्मविश्वास दुपटीने वाढला. एका अतिशय मागास अशा आदिवासी पाड्यात रहाणारा मुलगा आपल्या आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर कुठलेही पाठबळ नसताना नाशिकसारख्या शहरात येऊन आपले बस्तान बसवू शकला. आपली मेहनत आणि प्रामाणिकपणा याच्या जोरावर सरकारी अधिकारी बनू शकला. ही फार मोठी गोष्ट होती. आदिवासी समाजात असंख्य तरुण अज्ञानाच्या अंधारात चाचपडत चाचपडत कोलमडून पडतात. त्यांना सावरणारे कोणी नसते. परंतु कैलाश मोते यांनी स्वत:ची वाट स्वत: निवडली. त्या वाटेवर चालताना काटे कुटे आले, खाचखळगे आले परंतु त्याचा त्यांनी कधीही बाऊ न करता शिक्षण अर्धवट न सोडता आपले ध्येय गाठले.

बरीचशी गरिबांची मुले आपल्या गरिब परिस्थितीचा बाऊ करुन शिक्षण अर्ध्यावर सोडतात. दोष परिस्थितीला आणि नशिबाला देतात. परंतु कैलाश मोते यांनी सुरुवातील दिवसभरात अवघी एक भाकरी खाऊन दिवस काढले. कधी कधी रानातील रानभाजीचा पाला आणून शिजवून खाल्ला. परंतु शिक्षणाची कास त्यांनी सोडली नाही. परिणामी त्यांना चांगली सरकारी नोकरी लागली. परंतु त्यांचे क्लास वन अधिकारी होण्याचे स्वप्न इतके त्यांच्या मनात रुजले होते की त्यांना एक्साइज खात्यात इन्सपेक्टरची नोकरी

मिळाली होती तरी देखील अधून मधून आणखी एकदा एमपीएससीची परीक्षा द्यावी असे अनेकदा त्यांच्या मनात यायचे. त्यामुळे नोकरी मिळाली तरी एमपीएससीचा अभ्यास कधी कमी केला नाही. सतत त्यांच्या डोळ्यासमोर क्लास वन अधिकाऱ्याची खुर्ची दिसत असायची.

जेव्हा जेव्हा एमपीएससीची जाहिरात निघत असे तेव्हा तेव्हा ते फॉर्म भरीत असत आणि त्यांना यशदेखील मिळत असे. त्यामुळे नाशिकमध्ये कस्टम निरीक्षक म्हणून नोकरी करीत असतानाच त्यांचा राज्य लोकसेवा आयोगामध्ये महाराष्ट्र कृषि सेवा अधिकारी वर्ग १ या पदावर सिलेक्शन झाले. ते कृषि शाखेचे पदवीधर असल्यामुळे त्यांची लगेच कृषि विकास अधिकारी म्हणून जिल्हा परिषद बीड या इकाणी निवड झाली.त्यामुळे त्यांनी नाशिक येथील एक्साइज आणि कस्टमच्या निरीक्षक पदाचा राजीनामा दिला आणि ते बीड येथे जिल्हा परिषदेमध्ये जिल्हा कृषि विकास अधिकारी वर्ग १ या पदावर रुजू झाले.

श्री कैलाश मोते यांची पहिली पोस्टींग बीड जिल्ह्यात मिळाली. बीड जिल्हा परिषदेमध्ये जिल्हा कृषि विकास अधिकारी म्हणून त्यांची निवड झाली. त्याचबरोबर त्यांना बी बियाणे आणि खते यांचा परवाना अधिकारी म्हणून अधिकार होते. त्यांनी नोकरीवर रुजू होताच बोगस बियाणे विकणाऱ्या वितरकांची एक बैठक घेऊन त्यांना सज्जड दम भरला आणि सांगितले की बोगस बियाणांमुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होते. आधीच कर्जाने मेटाकुटीस आलेले शेतकरी असहाय होतात. त्याकरिता बोगस बियाणे विकू नका. नाहीतर मला नाइलाजाने कारवाई करावी लागेल. बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई येथील एका प्रसिध्द बियाणे विक्रेत्यावरच कारवाई करुन संपुर्ण बीड जिल्ह्यात त्यांनी खळबळ उडवून दिली. कारण तो विक्रेता जिल्ह्यातील फार मोठा बियाणे विक्रेता होता आणि विशेष म्हणजे जिल्हा परिषद अध्यक्षांच्या अतिशय जवळचा होता. राजकीय लागेबांधे असणारा होता. त्यामुळे श्री मोते यांच्यावर थोडासा राजकीय दबाव वाढला. परंतु श्री मोते कुठल्याही दबावाला बळी पडले नाहीत. त्यांनी जिल्हा परिषद

अध्यक्षांना सांगितले की आम्ही अनेकदा बोगस बियाणे न विकण्याबद्दूल समज देऊनही त्यांनी ऐकले नाही. समज दिल्यानंतरही बोगस बियाणे विकणे चालूच होते. मग मात्र आम्ही ट्रॅप लावून त्यांच्या बियाणांचे नमुने काढून बियाणे फेल झाल्यावर त्यांना पकडून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. मग अध्यक्षांनीदेखील विषय फार ताणून धरला नाही. मात्र एक गोष्ट घडली की बीड जिल्ह्यातील बोगस बियाणे विकणाऱ्या एजन्सीजनी आपला गाशा लवकरच गुंडाळला. बियाणे विकणाऱ्या अनेक कंपन्या बोगस बियाणांच्या पिशव्यांवर नामांकित बियाणांचे टॅग लावायचे आणि आत मात्र बोगस बियाणे असायचे. अशा अनेक बियाणे विक्रेत्यांवर कारवाया केल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना चांगल्या गुणवतेचे बियाणे मिळायला लागल्यामुळे कृषि अधिकारी म्हणून श्री कैलाश मोते यांचे नाव जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात पोहचले. खताच्या वाटपावर नियंत्रण मिळविल्याने सर्वांना किफायतशीर भावाने खते मिळायला लागली. जिल्ह्यातले सर्व जिल्हा परिषद सदस्य त्यांच्या अतिशय जवळचे झाले होते. त्यांच्या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील सर्व राजकारणी, बी बियाणे विक्रेते आणि सर्वसामान्य शेतकरीही त्यांना नावानिशी ओळखायला लागले.

त्यावेळी श्री भगवान लोमटे नावाचे बीड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांचा तर श्री मोते यांच्यावर इतका जीव होता की ते मोते यांना मानसपूत्र मानत असत. अंबाजोगाईच्या बोगस बियाणे वितरकावर कारवाई केल्यानंतर ते काहीसे नाराज झाले होते. परंतु त्यांना हेही चांगले ठाऊक होते की श्री मोते हे असे अधिकारी आहेत की ते चुकीचे काम कधीही करणार नाहीत. योग्य तीच कारवाई केली असणार. त्यांनी हा विषय काही पुढे फार काही ताणला नाही. परंतु वृत्रपत्रात सर्वत्र या कारवाईमुळे चर्चा झाली. शेतकऱ्यांना आनंद झाला.

बीड जिल्ह्यातील काही शेतकरी मोठे राजकारणी देखील होते. त्यांच्याकडूनच ही बातमी तात्कालीन कृषि संचालक उमेशचंद्र सारंगी (भाप्रसे) यांच्यापर्यंत पोहचली. कारण बीड जिल्ह्यात राजकीय लोकांची मोठी जरब

होती. त्यामुळे त्यांच्या हितसंबंधाना चुचकारणारे अधिकारीच येथे टिकत असत. परंतु बोगस बियाणे विकणाऱ्या वितरकांवर इतक्या धाडसाने कारवाई करणारा अधिकारी आतापपर्यंत झाला नव्हता. त्यांनी श्री मोते यांच्याबद्दल अधिक माहिती जाणून घेतली. प्रामाणिकपणे काम करणारा एक नवीन परंतु हुशार अधिकारी असल्याचे त्यांचे मत बनले आणि त्यांनी श्री मोते यांना पुण्यात जि.प.मध्ये जिल्हा कृषि विकास अधिकारी म्हणून काम करण्याची सुचना केली. परंतु श्री कैलाश मोते यांनी इतके चांगले काम केले होते की ते बीडमधील राजकारणी, वरीष्ठ अधिकारी, शेतकरी आणि सर्वसमान्य जनता यांच्या गळ्यातील ताईत बनले होते. जेव्हा कुणीतरी श्री मोते यांची बदली होणार आहे अशी बातमी सांगितली म्हटल्यावर सर्वांचा त्यांच्या बदलीला विरोध सुरु झाला. त्यावेळचे जिल्हा परिषद अध्यक्ष भगवानराव लोमटे यांनी आपले राजकीय वजन वापरुन श्री मोतेंची बदली अन्यत्र होऊ नये यासाठी वापरले. बीड जिल्हा परिषदेचे तात्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राजेशकुमार (भाप्रसे) यांनीही प्रशासनातील आपले कौशल्य आणि वजन पणाला लावून श्री मोते यांची बदली होणार नाही याची काळजी घेतली. श्री राजेशकुमार या आयएएस अधिकाऱ्याची श्री मोते यांच्यावर इतका विश्वास होता की त्यामुळे नेहमीच त्यांना सहकार्य केले. आजही त्यांचे राजेशकुमार साहेबांशी घरगुती संबंध तयार झाले आहेत. श्री मोते यांच्या लग्नासाठी ते स्वत: नंदूरबार जिल्ह्यातील वडगावसारख्या छोट्या खेड्यात जवळपास ५०० किमी अंतर पार करुन जि.प.मधील इतर अधिकाऱ्यांसह वडगावमधील कोळ पांढरी येथे हजर होते. नंदूरबार तालुक्यातील शहादा शहरापासून ३० किमी अंतरावर असलेल्या वडगावसारख्या आदिवासी गावात गेले.

कैलाश मोते यांची एक प्रामाणिक आणि कर्तव्य तत्पर अधिकारी म्हणून बीडमध्ये इतकी लोकप्रियता होती की त्यांच्या लग्नाला बीड जिल्हा परिषदेमधील सर्व खात्यातील वरीष्ठ अधिकारी आवर्जून नंदूरबारसारख्या दुर्गम भागात दोन दिवस थांबले होते. जिल्हा परिषद अध्यक्ष भगवानराव लोमटे यांनी तर लग्नाच्या नंतर मोते यांच्या लग्नानिमित्त साग्रसंगित रिसेप्शन

ठेवले होते. जिल्हा परिषद अध्यक्षांच्या बंगल्यावर हा कार्यक्रम ठेवला आणि जिल्हा परिषदेचे सर्व सदस्य, पंचायत समितीचे सर्व सदस्य, जिल्हा परिषदेचे सीईओसहित सर्व वरिष्ठ अधिकारी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. ज्या पावरा या आदिवासी समाजातून श्री मोते येतात त्या समाजामध्ये असे रिसेप्शन यापूर्वी कधी झाल्याचे दिसून आले नाही. श्री मोते यांच्या आयुष्यातील तो अतिशय मोठा सन्मानाचा आणि अविस्मरणीय सोहळा होता. आपल्या स्वत:च्या मुलाचेच रिसेप्शन आहे अशा थाटामाटात हा सोहळा श्री भगवान लोमटे यांनी पार पडला होता आणि तोही एक पैशाची झळ मोते यांना न पोहचविता! असे नशिबवान अधिकारी माणसं खूप कमी बघायला मिळतात. जनतेचे प्रेम इतक्या मोठ्या प्रमाणावर संपादन करणारी अधिकारी माणसं फार क्वचित बघायला मिळतात. कैलाश मोते यांना हे प्रेम बीड जिल्ह्यात मिळाले आहे. अनेक अधिकारी बीड जिल्ह्यात काम करायला घाबरायचे. परंतु कैलाश मोते यांना मिळालेले प्रेम म्हणजे बीडच्या प्रशासनातील दुर्मिळ घटना आहे.

त्यांनतर पुन्हा एकदा जिल्हा कृषि विकास अधिकारी असलेल्या कैलाश मोते यांची बदली जालना येथे मृद संधारण अधिकारी म्हणून झाली होती. परंतु जि.प. अध्यक्ष भगवानराव लोमटे त्यांना सोडायला तयार नव्हते. त्यांची झालेली बदली त्यांनी आपले राजकीय वजन वापरुन रद्द करुन आणली. लोकांचा त्यांच्यावरील विश्वास बघून श्री मोते यांनाही कामाचा खूप हूरुप आला. ते अतिशय आत्मियतेने काम करीत होते. सामाजिक बांधिलकीने ते काम करीत होते. इतर कृषि अधिकारी करतात तेच काम श्री मोते करीत असायचे. परंतु काम करण्याचा त्यांचा अंदाज वेगळा होता. त्यावेळचे कृषि संचालक उमेशचंद्र सारंगी प्रत्येक अधिकाऱ्याच्या कामाचे योग्य असे मूल्यमापन करायचे अशी त्यांची पध्दत होती. त्यासाठी गुण द्यायचे. त्यावेळी अनेकदा बीड जिल्हा संपुर्ण राज्यात दुसरा किंवा तिसरा हमखास यायचा. त्यामुळे दरवेळी श्री मोते यांच्या कामाबद्दल तोंड भरुन बोलेले जायचे. बीडच्या प्रशासनात श्री कैलाश मोते हे नाव आदराने घेतले

जाऊ लागले होते. कृषि खात्याबाहेरही त्यांच्या कार्यशैलीची चर्चा चालत असे.

बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना चांगली व दर्जेदार बी बियाणे वेळेवर मिळू लागली. खते वेळेवर मिळू लागल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदी आनंद होता. परंतु अशा या सक्रिय अधिकाऱ्याकडे सतत सर्वांचे डोळे असायचे. कृषि खात्याचे संचालक उमेशचंद्र सारंगी यांनी तर दोन वेळा त्यांना आपल्याकडे पुण्याला या म्हणून निरोप पाठवला होता. परंतु दोन्ही वेळेला जिल्हा परिषद अध्यक्ष श्री भगवान लोमटे यांनी त्यांची बदली होऊ दिली नाही. ते सतत म्हणायचे की आमच्या जिल्ह्याची घडी व्यवस्थित बसेपर्यंत तुम्ही इकडे तिकडे कुठेही बदली करुन जाऊ नका. जेव्हा तुम्हाला वाटेल की आता खरेच दुसरीकडे बदली करुन जायलाच हवे, त्यावेळी मी स्वत: तुमची मंत्रालयात जाऊन बदलीची ऑर्डर घेऊन येईन. खरोखरच त्यावेळी त्यांचे मंत्रालयात चांगले वजन होते. कोणत्याही मंत्र्याकडे शब्द टाकला तर तो खाली पडू दिला जात नव्हता. त्यामुळे ते आपले काम नक्की करणार याबद्दल श्री मोते यांनाही खात्री होती.

त्याचप्रमाणे बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राजेशकुमार हे देखील कैलाश मोते यांच्या कामावर जाम खुश होते. त्यांचा नेहमीच मोते यांना संपुर्णपणे पाठिंबा असायचा. केलेल्या चांगल्या कामाबद्दल नेहमी कौतुकाची थाप त्यांच्या पाठीवर असायची. जिल्हा परिषदेतील सर्व सदस्य काही ना काही बहाणा करुन श्री मोते यांच्या कार्यालयाला भेट देण्याची संधी सोडत नसत. त्यामुळे कैलाश मोते यांनाही काम करण्यात उत्साह वाटत असे.

कैलाश मोते यांच्या सरळ साध्या स्वभावामुळे समाजाच्या अनेक स्तरातील लोक त्यांच्या सतत संपर्कात असायचे. त्यातल्या त्यात मागासवर्गीय, आदिवासी आणि भटक्या विमुक्त जाती जमातीमधील लोकांना त्यांचा अभिमान वाटायचा. जिल्ह्यातील गोरगरिबांसाठी असलेल्या योजना अगदी तळागाळातल्या लोकांपर्यंत पोहचल्या पाहिजेत यासाठी श्री मोते

यांची अगदी मनापासून तळमळ असायची. ते ज्या समाजातून आले आहेत त्या आदिवासी समाजातील गरीब शेतकऱ्यांची अवस्था त्यांनी पाहिली होती. त्यामुळे ते जिथे जिथे कृषि अधिकारी म्हणून गेले तिथे तिथे त्यांनी मनापासून त्यांच्यासाठी काम केले. शासनाच्या योजनांचा लाभ त्यांनी अगदी तळागाळाल्या लोकांपर्यंत पोहचविला.

कायम दुष्काळी जिल्हा म्हणून प्रसिध्द असलेल्या बीड जिल्ह्यात फासेपारधी या भटक्या जमातीचे लोकही मोठया प्रमाणावर वास्तव्य करीत होते. अनेकदा कुठे चोरी झाली की त्यांच्या तांड्यावरील लोकांना पोलिसांकडून पकडून नेले जायचे आणि अनेक दिवस त्यांना जामिनही मिळायचा नाही. अनेकांना शिक्षाही व्हायची. त्यामुळे त्यांच्या कुटुंबांची अवस्था अतिशय दयनीय अशी असायची. शिक्षणाचा गंध नसल्यामुळे कुठे कामही मिळायचे नाही. अशा समाजाला आपण काय मदत करु शकतो? असा विचार अनेकदा कैलाश मोते यांच्या मनात यायचा.

प्रशासकीय सत्ताही त्यांच्या हातात होती. याचा वापर गोरगरीबांच्या पोटाला किमान पोटभर अन्न तरी मिळाले पाहिजे यासाठी काहीतरी करावे यासाठी त्यांच्या मनाने उचल खाल्ली. त्यांनी स्वत: जातीने लक्ष घालून बीड जिल्ह्यातील फासे पारधी समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचा सर्वे केला. तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की अनेकांकडे थोड्या फार जमिनी आहेत. परंतु त्यापैकी कोणीही शेती करत नव्हते. कारण शेती करायला भांडवल पण लागते. शिवाय या लोकांच्या जमिनी म्हणजे सगळ्या कोरडवाहू होत्या. त्यात काय पिकवणार? परंतु श्री कैलाश मोते यांनी या लोकांना विश्वासात घेऊन शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांना भाजीपाला लागवड आणि फळबागांची शेती करण्यासाठी प्रवृत करण्याचा निर्णय घेतला. पारधी समाजातील ज्या ज्या लोकांकडे जमिन आहे त्यांना विहीर, मोटरपंप आणि पाइपलाईन शासनाकडून मंजूर करुन बसवून द्यायचा संकल्प केला आणि जोपर्यंत त्या सर्व शेतकऱ्यांच्या विहीरी खोदून, मोटारी बसवून शेतात पाणी जात नाही तोपर्यंत ते स्वस्थ बसले जात नाहीत. महाराष्ट्राच्या इतिहासात

पारधी समाजाच्या लोकांना एवढ्या मोठ्या प्रमाणावर सरकारी योजनांचा लाभ मिळण्याची ही पहिलीच वेळ असावी. प्रसिध्दी माध्यमांनी देखील यांची मोठ्या प्रमाणावर दखल घेतली होती. सामाजिक पातळीवरदेखील या घटनेची वाहवा झाली.

अनेक फासेपारधी लोकांनी आपला पारंपारिक वाईट मार्गाचा व्यवसाय सोडून कष्ट करुन सन्मानाने जगण्याचा मार्ग स्वीकारला. कैलाश मोते यांनी आपल्या संपुर्ण कारकिर्दीत अनेक ठिकाणी मागासवर्गीय, आदिवासी, भटक्या विमुक्त जातीतील लोकांना शासनाच्या योजनांचा लाभ त्यांच्या दारापर्यंत जाऊन मिळवून दिला आहे. ही त्यांच्या आत्मिक समाधानाची बाब आहे. अशा घटना त्यांच्या आयुष्यात अनेकदा आल्या. प्रत्येकवेळी त्यांनी आपल्या कर्तव्याची जाण ठेवली. त्यामुळे आजही या तालुक्यातील सधन झालेले भटक्या जमातीचे शेतकरी श्री कैलाश मोते या नावाला विसरलेले नाहीत. बीड जिल्ह्यात काम करीत असताना नवा जोश नवा उत्साह यामुळे अतिशय मन लावून आणि पोट तिडकीने त्यांनी काम केले. त्यावेळी त्यांच्यासोबत जे लोक जोडले गेले होते ते आजही जवळपास चाळीस वर्षानंतर त्यांच्या संपर्कात आहेत. विचाराचे आदान प्रदान करीत आहेत. नाती टिकवायला शिकावे तर ते श्री कैलाश मोते यांच्याकडून!

काही दिवसांनतर पुन्हा श्री मोते यांची बदलीची वेळ झाली. त्यावेळी त्यांनी जि.प. अध्यक्ष भगवानराव लोमटेसाहेबांना विनंती केली की आपण मला शब्द दिला होता. तुम्हाला जेव्हा बदली करुन जायचे असेल तेव्हा सांगा. मंत्रालयातून बदली करुन देतो. या आश्वासनाची आठवण करुन देत श्री मोते यांनी अध्यक्षांना विनंती केली. अध्यक्षांनीही यावेळी कोणतेही आढेवेढे न घेता बदलीसाठी वरिष्ठांकडे शब्द टाकला आणि त्याला यशही आले. त्यावेळी जळगाव जिल्हयाच्या ठिकाणी उपसंचालक फलोत्पादन अधिकारी हे पद रिक्त होते. त्या पदावर त्यांची सन २३ मे १९९५ यावर्षी बदली झाली.

प्रकरण तिसरे

लग्नाची बेडी

उत्तर महाराष्ट्रात सीमावर्ती भागात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास असून गेल्या कैक पिढ्यांपासून त्यांचे तिथे त्यांचे वास्तव्य आहे. त्यामध्ये पावरा समाजाची संख्या मोठी आहे. परंतु शिक्षणाच्या बाबतीत समाज तितकासा प्रगत नसल्यामुळे आपापसातच लग्ने जमवली जायची. क्वचित एकादा मुलगा किंवा मुलगी जास्त शिकले की त्यांच्यासाठी वधू किंवा वर शोधणे अवघड होऊन जायचे. कारण त्यांच्या तोलामोलाची किमान त्यांच्या जवळपास शिकलेली तरी वधू किंवा वर शोधावे लागायचे. परंतु त्यासाठी फार वणवण करावी लागत असे. कैलाश मोते यांची एक आत्या त्याकाळी एम.ए. झाली होती. राज्याच्या सीमेपलिकडे असलेल्या मध्य प्रदेशात आदिवासी मुलींसाठी वसतिगृह आणि शाळेची सोय शासनातर्फे

करण्यात आली होती. त्यामुळे कैलाश मोते यांची आत्या तिथे जाऊन शिकली आणि तिथेच अंगणवाडी सुपरवायझर म्हणून नोकरीला देखील लागली होती. पावरा समाजातील ती त्या काळातील एकमेव महिला असावी जी एम.ए. झाली होती. त्यानंतर तिचे रेकॉर्ड कैलाश मोते यांनी मोडले. पावरा समाजामध्ये पहिला ॲग्रीकल्चर एम.एस्सी होणारा पहिला विद्यार्थी ते ठरले होते. सहाजिकच समाजात त्यांचे नाव सर्वदूर पसरले होते. त्यात लगेच शासकीय नोकरीमध्ये अधिकारी म्हणून रुजू झाल्याने घरच्यांच्या अपेक्षा वाढल्या. घरातील वडील आणि आजोबा यांनी पावरा समाजातील श्रीमंत कुळातील मुली कुठे आहेत याची चाचपणी करायला सुरुवात केली.

दरम्यान कैलाश मोते हे बीडमध्ये जिल्हा कृषि विकास अधिकारी म्हणून बऱ्यापैकी सेटल झाले होते. प्रशासनात आणि जनमानसात त्यांनी एक चांगला अधिकारी म्हणून आपली प्रतिमा तयार केली होती. सहाजिकच त्यांच्या लग्नाची तयारी घरच्या वडीलधाऱ्यांनी सुरु केली होती. समाजातील अनेक धनवान मुलीचे पालक मासा गळाला लागतो का यासाठी वाट पहात होते. परंतु कैलाश मोते यांची आपल्या जीवनसाथी बाबत आपली काही मते स्पष्ट होती. आपल्या घरच्या परिस्थितीशी जुळवून घेणारी आणि आपल्या आईवडीलांचा आदर करणारी जीवनसाथी असावी अशी त्यांच्या मनातील मुलीविषयी संकल्पना होती. तसे त्यांनी आपल्या वडीलांना सांगितलेही होते की आपल्याला श्रीमंताची मुलगी करायची नाही. गरिबीत वाढलेली आणि परिस्थितीशी जुळवून घेणारी मुलगी सून म्हणून निवडा असे सुचविले होते. मग वडीलांनी अशाच मुलीचा शोध सुरु केला.

कैलाश मोते यांचे वडील परशराम मोते यांचा समाजात चांगला वावर होता. समाजातल्या छोट्या मोठ्या सामाजिक कार्यक्रमाला त्यांना सन्मानाने बोलावले जायचे. कोणाची सोयरिक जमविण्यासाठी, कुणाच्या दु:खद घटनेच्या निमित्ताने त्यांचे उठणे बसणे सतत सुरु असायचे. त्यामुळे समाजात त्यांना मान होता. सहाजिकच समाजातील बहूसंख्य लोक त्यांना ओळखायचे. त्या ओळखीतूनच त्यांची नजर धुळे जिल्ह्यातील शिरपूर

तालुक्यात असणाऱ्या बोराडी गावचे थारसिंग देवा खेडकर यांच्यावर पडली. सर्वसामान्य कुटुंब मोलमजूरी करुन खाणारे, प्रसंगी जास्तीचे चार पैसे संसाराला मिळावे म्हणून लग्नसराईत वाजंत्री म्हणून काम करणारे आणि संसारात चार मुलींचा पिता म्हणून जबाबदारी पार पाडणारे थारसिंग देवा खेडकर यांच्याकडे जेव्हा परशराम मोते यांनी आपला मुलगा कैलाश याच्यासाठी मुलगी देण्याची मागणी घातली तेव्हा त्यांना क्षणभर विश्वासच बसला नाही. कारण त्यांना चार मुली असल्यामुळे आणि कुटुंबाची शैक्षणिक पार्श्वभूमि बरी नसल्याने आपली मुलगी एवढ्या मोठ्या हुद्द्यावर काम करणाऱ्या मुलाला कसे काय करतील असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाला. परंतु परशराम मोते यांनी स्वत:हून हा विषय त्यांच्याकडे काढल्याने त्यांची मानसिक तयारी हळू हळू झाली.

कुठल्याही समाजात एक रुढी, प्रथा असते की एकाद्याचे चांगले होणार असेल तर भावभावकी ते सहजासहजी होऊ देत नाहीत. भावकीतल्या लोकांनी सांगितले की मुलगा खरोखरच सरकारी अधिकारी म्हणून काम करतो की नाही याची खात्री करुन घेतल्याशिवाय स्थळाला होकार देऊ नका. त्यानुसार मुलीच्या वडीलांनी श्री कैलाश मोते यांच्या नोकरीच्या ठिकाणी जाऊन खात्री करुन घेतली. त्यानंतरच पुढची बोलणी पक्की झाली. त्यावेळी कैलाश मोते हे एक्साइज खात्यात नाशिक येथे निरीक्षक म्हणून कार्यरत होते. थारसिंग हे स्वत: फारसे शिकलेले नव्हते. त्यामुळे मुलगा काय काम करतो? त्याची नोकरी परमानंट आहे की नाही? याची खात्री करुन घेण्यासाठी त्यांनी आपल्या सोबत आपल्या गावातील एक शिकला सवरलेला माणूसही आणला होता. त्याने नीट चौकशी केली. श्री मोते यांनीही त्यांचे योग्य असे आदरातिथ्य करुन त्यांना सन्मानाने परत पाठवले.

श्री थारसिंग खेडकर यांना घरी परत जाताना त्याना कैलाश यांनी मोठा धीर दिला. ते म्हणाले, लग्नाच्या खर्चाचा फार विचार करु नका. लग्नाचा खर्चही आम्हीच करु. त्यावेळी थारसिंग यांच्या मनावरचा फार मोठा बोजा खाली उतरल्याचा आनंद झाला. आपल्या मुलीनं चांगलं नशिब

काढलं. अतिशय चांगल्या विचाराच्या घरात ती जाणार या भावनेने ते अगदी सुखावून गेले. परंतु कैलाश मोते यांनी थारसिंग यांना एक छोटीशी अटही घातली. ती अट म्हणजे दुसरे तिसरे काही नव्हते तर क्लासवन अधिकारी झाल्याशिवाय मी लग्न करणार नाही. परंतु लग्नाचा योग जुळून आला आणि लग्न जमले.

कैलाश यांच्या लग्नाची बोलणी सुरु झाल्यानंतर स्वत: कैलाश आपल्या श्री गुलाब पावरा, श्री गोपाळ सत्तेसा या मित्रांसह बोराडीला जाऊन मुलगी बघून आले. पहिल्याच फेरीत मुलगी त्यांना पसंत पडली. लागलीच लग्नाची तारीखही ठरली. २१ फेब्रुवारी १९९४ अशी तारीख ठरली. लग्न मुलाच्या घरीच म्हणजे वडगाव कोळ पांढरी पाडा ता. शहादा जि. नंदूरबार येथे करण्याचे ठरले.

पावरा समाजात लग्नाचा असा काही खास विधी नसतो. विशेष म्हणजे या समाजात लग्नविधीसाठी ब्राम्हणाला बोलावले जात नाही. लग्नाच्या आदल्या रात्री नवरा व नवरी मुलीच्या घरी नाचगाण्याचा कार्यक्रम असतो. ग्रामस्थ आणि भावकीला जेवणावळी दिल्या जातात. दुसऱ्या दिवशी नवरी मुलगी सकाळी घरातील कुलदैवताचे दर्शन घेते. सोबत मैत्रीणी आणि घरातील ज्येष्ठ महिलांचा सहभाग असतो. या समाजातील आणखी एक चांगली आणि वेगळी अशी प्रथा म्हणजे नवरी मुलीने एकदा का कुल दैवताचे दर्शन घेतले की तिला जमिनीवर चालू दिले जात नाही. मुलीचे मेहूणे म्हणजे मोठ्या बहिणीचे पती किंवा घरची मोठी सुनबाई यांनी उचलून घ्यायचे असते. लग्नसोहळा पार पडेपर्यंत जमिनीवर पाय ठेवू दिला जात नाही. सतत उचलून घ्यावे लागते. दुसऱ्या दिवशी नवरी मुलीच्या अंगावर शाल किंवा चादर पांघरुण घालून बैलगाडी, ट्रॅक्टर मधून वराड मुलाच्या घरी येते. सोबत अनेक वराडी मंडळी मिळेल त्या वाहनाने लग्नाच्या ठिकाणी येत असतात.

मुलीचे लग्नाचे वराड मुलाच्या घरी लग्नासाठी जात असताना वाटेत जर वडाचे झाड रस्त्याच्या कडेला असेल तर वराडाची गाडी त्या झाडाच्या

खालून आणत नाहीत. गाडी थांबवून नवरी मुलीला उचलून घेऊन झाडाच्या सावलीच्या घेऱ्याबाहेरुन पुढे नेले जाते आणि गाडी रिकामी करुन पुढे काही अंतर नेऊन पुन्हा नवरीला गाडीत बसविले जाते. यामागचा उद्‌देश असा की नवरी मुलीच्या मागे भूत पिशाच्चांची काही बाधा होऊ नये असा असावा.

वराडी मंडळी नवरदेवाच्या घरी पोहचले की तो मोठा आनंदाचा दिवस असतो. रात्रभर दारु पिणे, जेवण करणे असा मोठा आनंद सोहळा असतो. लग्नात दारु पिणे याला या भागात वाईट समजले जात नाही तर तो एक आनंद व्यक्त करण्याचा सोहळा समजला जातो. रात्री उशिरापर्यंत हा कार्यक्रम चालू रहातो. त्यानंतर त्याच्या दुसऱ्या दिवशी हळदीसारखा तरुणांचा चिडवाचिडवीचा कार्यक्रम असतो. त्यामध्ये तरुण मुले मुली मनोरंजनाचे खेळ खेळतात. याच्या दुसऱ्या दिवसी मुलाकडच्या घरी मांसाहरी जेवणाचा कार्यक्रम पार पडतो. तिसऱ्या दिवशी मुलीकडचे लोक मुलीला भेटायला येतात. वत लावणे म्हणजे गोड जेवण! यामध्ये गोड भात, जिलेबी, भजी, लाडू अशा गोडधोड पक्वान्नांचा समावेश असतो.

लग्न म्हणजे असा काही खास विधी नसतो. जेवणावळी झडतात. विशेष म्हणजे नवरा मुलगा आणि नवरी मुलगी यांच्या अंगावर एक मोठी चादर टाकतात आणि त्या चादरीखाली त्यांना जेवायला देतात. हा कार्यक्रम मोठा रोचक असतो. त्याचबरोबर नवऱ्या मुलासोबत एक विशेष जेवणाचा कार्यक्रम असतो. त्यामध्ये नवऱ्या मुलासोबत चार पाच मित्र एकत्र जेवायला बसतात. त्यांच्या पुढ्यात भले मोठे जेवणाचे ताट वाढलेले असते. त्या ताटातील सर्व पदार्थ नवरा मुलगा आणि त्यांच्या मित्रांनी संपुर्ण संपवायचे असतात. जर ते सारे जेवण संपविले नाही तर नवरदेवाला मेहुण्या मुलींना दंड द्यावा लागतो. तो त्यांचा हक्क समजला जातो. त्यानंतर मुलाकडील शेवटचे जेवण असते. त्याला बिदाई म्हणतात. बिदाई झाली की मुलगी या घरची सून म्हणून घरात प्रवेश करते. सत्यनारायण वगैरे असला कुठलाही प्रकार या समाजाच्या लग्नात नसतो. मुलाकडेही केवळ कुलदैवताची पूजा होते. या व्यतिरिक्त दुसरा कुठलाही धार्मिक विधी होत नाही.

सर्व कार्यक्रम झाल्यानंतर नवरा नवरी दोघे सोबत सर्व उपस्थित मान्यवर व वडीलधाऱ्या लोकांच्या पाया पडतात आणि त्यावेळी सर्व उपस्थितमान्यवर पैसे किंवा भेट वस्तू देतात. यावेळी देण्यात आलेली खास साडी नेसून लोकांचे आशीर्वाद घेतले जातात आणि त्या दिवसापासून ते पती पत्नी म्हणून मान्यता पावतात आणि आपल्या संसाराची सुरुवात करतात. पावरा समाज जरी आदिवासी म्हणून गणला जात असला तरी काही प्रथा त्यांच्यामध्ये अतिशय पुढारलेल्या आहेत. त्यापैकी लग्नाची पध्दत एक आहे.

बीड जिल्ह्यात अल्पावधीतच लोकप्रिय ठरलेल्या कैलाश मोते या कृषि विकास अधिकाऱ्याचे लग्न असल्यामुळे अवघी बीड जिल्हा परिषद झाडून लग्नाला आले होते. त्यात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यापासून ते सर्व खात्यांचे विभाग प्रमुख आणि जि.प.व पं. स. सदस्य आणि सामान्य नागरिकही मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. बीड वरुन शहादा आणि शहाद्यावरुन वडगावला पोहचणे एक दिव्यच होते. परंतु कैलाश मोते हे एक क्लास वन अधिकारी होते. प्रशासनातील अनुभव त्यांना आपल्या स्वतःच्या लग्नात कामी आला. कुणी कोणत्या वाहनाने यायचे? कुठे थांबायचे? जेवणाची सोय कशी असेल याविषयी बारीक सारीक नियोजन श्री कैलाश मोते यांनी स्वत: आधीच करुन ठेवले होते. त्याप्रमाणे काही वरिष्ठ अधिकाऱ्यांची थांबण्याची व्यवस्था शहादा येथील रेस्ट हाऊसवर करण्यात आली होती. त्यामध्ये बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशकुमार यांचाही समावेशही होता. परंतु त्याना शहादा शहरात पोहचायला खूप वेळ झाल्याने त्यांच्यासाठी बुक केलेली रुम दुसऱ्यांना कोणाालाा बांधकाम विभागाने दिली गेली. परंतु श्री राजेशकुमार यांनी कुठल्याही प्रकारचा आकांड तांडव न करता कैलाश मोते यांच्या प्रेमापोटी एका साध्या रुममध्ये ॲडजस्ट करुन घेतले. बाकीच्या अधिकाऱ्यांनी देखील अशीच ॲडजस्टमेंट करुन लग्नाची वेळ साधली.

लग्नाची वेळ दुपारची होती. कडक उन्हाचा पारा होता. पण कुणीही कसलीही तक्रार न करता लग्नाच्या ठिकाणी अगदी वेळेवर हजर राहिले होते. वाहनांची पार्किंगची चोख व्यवस्था करण्यात आली होती. ती कमी

पडली तरी सर्वांनी समजून घेतले आणि लग्नाला गाठ घातली. या लग्नासाठी बीड जिल्हा प्रशासनातील अनेक अधिकारी मंडळी उपस्थित होती. त्यामध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशकुमार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अजय सावरेकर, सुर्यकांत हजारे, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामिण यंत्रणा सदाशिव हरदास, शिक्षणाधिकारी श्री म्हस्के, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. साळुंखे, श्री भास्करराव जोगदंड आदि मान्यवर उपस्थित होते. या सर्वांची सोय करण्यात आली होती. परंतु ऐनवेळी अडचणी आल्या तरी लोकांनी सांभाळून घेतले. कारण लग्नाचे नियोजन स्वत: नवरदेव कैलाश मोते हेच करत होते. त्यामुळे ते कुठे कुठे लक्ष देणार? परंतु त्यांच्या प्रेमापोटी आलेल्या सर्वांनीच कुठेच तक्रारीचा पाढा वाचला नाही. लग्न अतिशय थाटामाटात पार पडले. शेकडो चार चाकी गाड्या एक साथ वडगावने पहिल्यांदाच पाहिल्या होत्या. असे लग्न याआधी या गावाने कधी पाहिले नव्हते. त्यामुळे आठवडाभर परिसरात तोच विषय गावागावात चर्चेत होता.

त्याच दिवशी पाहूणे मंडळी आणि सगेसोयरे आपापल्या गावी परतले. बीडहून आलेले सर्व मित्रमंडळी आणि अधिकारी मंडळी परत रवाना झाले. दुसऱ्या दिवशी पहिला पाहूणचार घेण्यासाठी नवरा मुलगा त्यांचे काही मित्रांसह , नवऱ्या मुलीच्या कलवऱ्या असे सुर्यास्तापूर्वी मुलीच्या गावी पोहचावे या हिशोबाने निघाले. परंतु त्यांना घरी पोहचायला खूप वेळ झाला. लोक वाट पाहून कंटाळून गेले होते. उशिरा पोहचल्याने त्यांना जेवणही फार उशिराने देण्यात आले. बरे अशावेळी तक्रारही करता येत नसते. उशिरा येऊन चूक यांनीच केली असल्यामुळे सर्व काही गोड मानून तो दिवस पार पडला.

दुसऱ्या दिवशी कैलाश यांचे वडील, आत्या अशी वडीलधारी मंडळी आली. पुन्हा एकदा पंगती उठल्या आणि तो लग्न समारंभ पुर्णपणे पार पडला. श्री कैलाश मोते यांचे दोनाचे चार हात झाले. त्यांच्या जीवनाचा नवा अध्याय सुरु झाला. लग्न आयुष्यातील महत्वाची घटना असते. कैलाश मोते यांनी थारसिंग खेडकर यांच्या सारिका या मुलीशी लग्न केले. एका अतिशय गरिब कुटुंबातील मुलीशी लग्न करुन त्यांनी एक चांगला पायंडा समाजात

पाडला आहे. अनेक मान्यवरांनी कैलाश यांच्या या सुधारणावादी मताचे कौतुक केले आणि हा सगळा उच्च शिक्षणाचा आणि संस्काराचा परिणाम असल्याचे मत व्यक्त केले. श्री कैलाश मोते यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी ही घटना होती. मनुष्य हा लग्नानंतरच खऱ्या अर्थाने परिपक्व बनत असतो. जबाबदारीचे ओझे उचलण्याची सवय आपोआप लागते. नव्या सुनबाईंनी सासरकडील सर्वांची मने जिंकून घेतली. लग्नानंतर श्री कैलाश मोते यांच्या आयुष्याची दुसरी इनिंग सुरु झाली

प्रकरण चौथे

मातृभूमिची सेवा

बीड जिल्हा सोडून जाताना कैलाश मोते यांना फार अवघडल्यासारखे वाटत होते. तसेच बीडच्या लोकांना आणि कर्मचाऱ्यानाही अशा कर्तव्यदक्ष आणि प्रेमळ अधिकाऱ्याला निरोप देताना दु:ख वाटत होते. अतिशय जड अंत:करणानेच लोकांनी त्यांना निरोप दिला. ते बदली होऊन जळगावला उपसंचालक म्हणून रुजू होणार होते. नेमके त्याच कालावधीत जळगाव जिल्ह्यातील मृदसंधारण विभागात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला होता. तेथील अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या होत्या. त्यामुळे तिथे चांगल्या अधिकाऱ्याची गरज होती. नेमकी त्याचवेळी उपसंचालक फलोत्पादन नाशिक या ठिकाणी श्री कैलाश मोते यांची बदली झाली. त्यावेळचे कृषि संचालक उमेशचंद्र सारंगी यांनी श्री मोते यांची नेमणूक उपसंचालक फलोत्पादन येथे न करता विभागीय मृद संधारण अधिकारी जळगाव येथे केली. कारण या ठिकाणी अशा प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्याचीच गरज होती.

परंतु या ठिकाणी श्री मोते यांना दुसरे काही विशेष काम करता आले नाही. भ्रष्टाचाराच्या प्रकरणामुळे कोर्ट कचेऱ्या आणि पोलीस ठाण्याच्या चक्कर काटण्यातच दोन वर्षे कशी निघून गेली ते कळले देखील नाही. जिल्हा मृद संधारण अधिकारी म्हणून दोन वर्षे कोर्ट कचेऱ्यात गेली असली तरी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना जनहिताची कामे केल्याशिवाय चैनच पडत नाही. कोर्ट कचेऱ्याची कामे करता करता त्यांनी जिल्ह्यातील टँकरग्रस्त ४६ पैकी ३९ गावे टँकरमुक्त केली होती. त्यावेळचे मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी एक संकल्पना राबविण्याचे आदेश दिले होते. **मागे वळून पहा** अशी ती संकल्पना होती. त्या संकल्पनेनुसार मृद संधारणाच्या विविध योजना राबवून गावे टँकरमुक्त करण्यात येणार होती. त्यानुसार ती संकल्पना अतिशय ताकदीने राबवून ज़ळगाव जिल्ह्यातील ४६ गावात टँकरने पाणी पुरवठा केला जात होता. त्यापैकी ३९ गावे श्री मोते यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने टँकरमुक्त केली. या संकल्पनेंतर्गत टँकरने पाणी पुरवठा होणाऱ्या गावातील प्रतिष्ठित व्यक्ति किंवा उद्योजक यांना हाताशी धरुन त्यांच्याकडून त्यांच्या इच्छेनुसार ठराविक रक्कम जमा करुन त्यातून पाणलोटची तूटफुटीची कामे दुरुस्त करुन घेण्यात आली होती. त्याचा जलसंधारणामध्ये खूप लाभ झाला. श्री कैलाश मोते यांनी मृद संधारण अधिकारी म्हणून लोकांना केलेल्या मदतीच्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. कोणी १० हजार, कोणी २० हजार, कोणी ३० हजार तर कोणी ४० हजार रुपये निधी जमा केला. त्यामुळे जल संधारणाची मोठी कामे झाली आणि ३९ गावे टँकरमुक्त झाली. या गोष्टीचे देखील वरिष्ठ पातळीवर कौतुक झाले. कारण शासनाच्या कामासाठी लोकांकडून निधी जमा करणे वाटते तितके सोपे काम नाही. त्यासाठी अधिकाऱ्यांना लोकांचा विश्वास संपादन करावा लागतो. तो श्री मोते यांनी संपादन केला होता. त्यामुळे बाकीचा व्याप सांभाळून त्यांनी **मागे वळून पहा** ही संकल्पनादेखील उत्तम प्रकारे यशस्वी केली. जळगावमध्ये विभागीय मृद संधारण अधिकारी म्हणून कार्यकाल पुर्ण केल्यानंतर त्यांची बदली नंदूरबार जिल्ह्यात शहादा या ठिकाणी उपविभागीय कृषि अधिकारी म्हणून झाली.

प्रकरण पाचवे

उपविभागीय कृषि अधिकारी, शहादा

वास्तविक पहाता नंदूरबार जिल्ह्यातील शहादा येथे कृषि विभागाचे वर्ग १ अधिकाऱ्याचे पद नव्हते. परंतु नुकतेच म्हणजे १९९६ मध्ये हे पद निर्माण करण्यात आले होते. त्यामुळे कैलाश मोते बदली शहादा येथे करण्यात आली. शहादा हा कैलाश मोते याच्या मूळ गावचा तालुका होता. तसे पहाता होम पीचवर काम करणे तसे सोपेही असते आणि अवघडही असते. शहादा, तळोदा, अक्कलकुवा आणि धरगाव असे चार तालुके या उपविभागाच्या अधिपत्याखाली येत होते. आपल्या भागात आपल्या परिसरात काम करण्याची संधी श्री मोते यांना मिळाली होती. प्रशासकीय सेवेत प्रवेश केलेल्या अधिकाऱ्यांची सुप्त इच्छा असतेच की आपल्या भागात, आपल्या गावात वरिष्ठ अधिकारी म्हणून काम करावे. आपलया पदामुळे आपल्याला जे अधिकार प्राप्त झाले आहेत त्या अधिकारांचा वापर करुन आपल्या परिसराचा विकास करावा. ती संधी त्यांना मिळाली होती.

पारंपारिक शेती करणारा आदिवासी शेतकरी गेल्या कित्येक दशकांपासून एकाच प्रकारची शेती करत होता. या शेतकऱ्यांना आधुनिकतेची जोड दिल्याशिवाय शेतीत सुधारणा होणार नाहीत आणि उत्पन्न देखील वाढणार नाही याची जाण श्री मोते यांना होती. त्यावेळी शासनाने मुंबईमध्ये ॲग्रो ॲडव्हांटेज बाबत एक मोठे कृषि प्रदर्शन भरवण्याचे ठरवले होते. या प्रदर्शनाचा जास्तीत जास्त आपल्या ग्रामिण भागातील लोकांना लाभ व्हावा अशी श्री मोते यांची इच्छा होती. त्यादृष्टिने त्यांनी खूप मेहनत घेतली आणि हजारो शेतकऱ्यांना या आधुनिक कृषि प्रदर्शनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून दिला. शेतीच्या क्षेत्रात किती बदल झाले आहेत. पुर्वी लोक जमिनीला पाणी देत होते. आता पिकाला पाणी दिले जाते. म्हणजे ठिबक सिंचनाद्वारे पिकाच्या मुळाशी पाणी सोडून पाण्याची बचत केली जाते. याशिवाय आणखी कितीतरी बदल झाले असून त्याची माहिती होणे आवश्यक आहे असे त्यांना सतत वाटत होते. त्यासाठी हे प्रदर्शन पर्वणीच ठरले.

अलिकडे विज्ञान किती प्रगत झाले आहे आणि त्याचा शेतीसाठी कसा उपयोग करुन घेतला जात आहे हे पाहून सगळ्यांचे डोळे दिपले. शासनाच्या शेतकऱ्यांसाठी असणाऱ्या योजनांची माहिती मिळाल्यामुळे ग्रामिण भागातील शेतकऱ्यांची मने भरुन आली. नव्या कृषि विकासाची पहाट त्यांख्या जीवनात उगवली असे म्हटल्यास अतिशयोक्ति ठरणार नाही. हे ॲग्रो ॲडव्हांटेज प्रदर्शन अपेक्षेपेक्षा जास्त यशस्वी झाल्यामुळे शासनाला देखील श्री मोते आणि त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांची दखल घ्यावी लागली. त्यांना त्यावेळी खास प्रशस्तीपत्रे देऊन गौरविण्यात आले होते.

शहादा येथे कार्यरत असताना कैलाश मोते यांचे चारही तालुक्यातील कामांवर बारीक लक्ष होते. आपल्या मातृभूमिची सेवा करण्याची संधी मिळाली असून त्या संधीचे सोने करण्याचा विडाच त्यांनी उचलला होता. अक्कलकुवा तालुक्यातील जनाव येथे दोन शासकीय रोपवाटिका होत्या. परंतु त्याकडे विभागाचे दुर्लक्ष झाल्याने अगदी ओसाड पडल्यासारख्या दिसत

होत्या. त्यामुळे शासनाला त्या तोट्यात चालवाव्या लागत होत्या. त्या नर्सरींकडे प्रथम श्री कैलाश मोते यांनी आपले लक्ष वेधले. कैलाश मोते एक अधिकारी म्हणून असे वैशिष्ट्य आहे की त्यांच्या नजरेस काही चुकीचे पडले तर त्यांना ते सुधारल्याशिवाय चैनच पडत नाही. अगदी बारकाईने त्यांनी त्या नर्सरीबाबत अभ्यास केला, नियोजन केले आणि कामाला सुरुवात केली. पाणी टंचाईमुळे नर्सरीची वाताहत झाली होती. हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी सर्वात आधी योग्य ते नियोजन करुन त्या नर्सरीत लोकांना उपयुक्त अशी हजारो रोपे तयार केली. त्यामध्ये आंबा, काजू, पेरु, सीताफळ, शेवगा, बांबूची रोपे तयार केली.धडगाव सारख्या आदिवासी रिदरणी या पिकाच्या खूप मोठ्या प्रमाणावर बीया मिहत होत्या. त्यामुहे त्याची रोपे तयार करुरुन पालघर, जळगाव, नाशिकसारख्या ठिकाणी विक्री केल्यामुळे बघता बघता काही महिन्याच्या आत त्यांनी शासकीय रोपवाटिका नफ्यात आणली. एकादा अधिकारी मनात आणले तर एकाद्या माळरानाचेही नंदनवन करु शकतो. हे त्यांनी लोकांना आणि शासनालाही दाखवून दिले.

शहादा तालुक्यातील क्षेत्र गुणन केंद्र कळंबू येथेही उपलब्ध प्रक्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर बीजोत्पादन कार्यक्रम घेऊन त्यासाठी तिथे नंदनवन फुलविले. आपल्या कौशल्याचा वापर करुन त्यांनी प्रयत्न सुरु केले. त्यासाठी तापी नदीवरुन लिफ्ट इरिगेशन करुन पाइपलाईनद्वारे पाणी आणले आणि संपूर्ण क्षेत्र बारमाही बागायती करुन टाकले. फुलांची छान रोपवाटिका फुलविल्यामुळे परिसराचे नंदनवन झाले होते. यामध्ये काही औषधी वनस्पतींचीदेखील लागवड करण्यात आली होती. एक कृषि अधिकारी काय किमया घडवू शकतो हे त्यांनी सिध्द करुन दाखविले. त्यावेळी कामाचा एक वेगळाच झपाटा त्यांनी लावला होता. त्यामुळे कृषि खात्यात झपाट्याने बदल होताना दिसत होते. याची वेळोवेळी दखल कृषि खातेही घेत होते. गावकरीदेखील श्री मोते यांच्या कामावर खूश होते. अवघा पसिर अगदी हिरवागार करुन टाकल्याने शेतकऱ्यांनी आणि गावकऱ्यांनी अतिशय समाधान व्यक्त केले होते. यामुळे श्री मोते यांनाही जोमाने काम करण्यासाठी हुरुप आला. केलेल्या कामाची

दखल घेतली गेली तर अधिकाऱ्याला अधिक जोमाने काम करायची इच्छा निर्माण होते. इथे शहादा म्हणजे तर मोते यांची जन्मभमि आणि कर्मभूमि होती. त्यामुळे त्यांनी या ठिकाणी कार्यरत असताना अतिशय मेहनत घेऊन जवळपास दीड लाखाहून अधिक नफा बीज गुणन केंद्रास मिळवून दिला.

त्यानंतर त्यांचे लक्ष तोरणमाळ सारख्या अति दुर्गम भागाकडे गेले. तोरणमाळ हे ठिकाण आपल्याला थंड हवेचे ठिकाण म्हणून माहित आहे. परंतु त्या ठिकाणी पोहचण्याचा मार्ग अतिदुर्गम असल्यामुळे विकासाची गंगा तिथंपर्यंत पोहचलीच नाही. अनेकदा शासकीय योजना कागदावरुनच तिथपर्यंत पोहचत असत. परंतु श्री मोते यांच्या मनात नैसर्गिकच या भागाविषयी प्रेम आणि आस्था असल्यामुळे त्यांनी अक्षरश: पायी चालत जाऊन या तोरणमाळ भागाची पाहणी केली. त्यानंतर नदी खोरे प्रकल्पांतर्गत सरदार सरोवरातील बाधित गावात जोमाने काम करण्याचा निर्णय घेतला. अक्कलकुवा आणि अक्रानी तालुक्याच्या अतिशय दुर्गम भागाकडे त्यांनी जातीने लक्ष दिले. ज्या ठिकाणी शासकीय अधिकारी कधीच पोहचत नसत. त्या ठिकाणी ते पोहचले आणि पहातात तर काय! शासनाच्या योजना अनेकापर्यंत कागदोपत्री पोहचल्या असल्या तरी प्रत्यक्षात मात्र कोणाच्याच पदरी काहीच पडलेले नव्हते. ते बघून त्यांना खूप वाईट वाटले. या ठिकाणी खूप काम होण्याची गरज असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

त्यानंतर कैलाश मोते यांनी अतिशय सुत्रबध्द पध्दतीने काम करायला सुरुवात केली. केंद्र शासनाच्या नदी खोरे प्रकल्पातील कृषि मंत्रालय भारत सरकार यांच्याकडून अनेक योजना मंजूर करुन घेतल्या आणि त्या प्रभावीपणे स्वत:च्या देखरेखीखाली राबवल्या. त्यासाठी पाठपुरावा करुन निधी उपलब्ध करुन दिला. त्यामुळे या दुर्गम भागातदेखील विकासाची गंगा वाहायला लागली. एकादा अधिकारी सकारात्मक विचार करणारा असेल तर कायापालट व्हायला फारसा वेळ लागत नाही हे या परिसरातील लोकांनी आपल्या भावनेतून व्यक्त करुन दाखविले. आपल्या भागातील गरजू लोकांच्या हितासाठी आपली नोकरी उपयोगी पडत आहे. आपले आयुष्य खऱ्या अर्थाने

लोकांच्या उपयोगी पडत आहे. याचे कैलाश मोते यांना मनोमन समाधान मिळत होते. शासकीय योजनांचा लाभ मिळाल्यानंतर जे कृतज्ञेचे भाव या दुर्गम भागातील आदिवासींच्या डोळ्यात दिसायचे ते पाहून आपले जीवन सार्थकी लागले असे श्री मोते यांना वाटायचे. या योजनेंतर्गत जवळपास ४८ लाख रुपयांचा निधी त्यांनी आणला. त्याचा वापरही चपखलपणे केला. सरदार सरोवर प्रकल्पाने बाधित गावांचाही यामध्ये समावेश होता.

शहादा तालुका हा कैलाश मोते यांचा स्वत:चा तालुका असल्याने या भागासाठी काय करु आणि काय नको असे त्याना होत असे. शासनात अधिकारी होताना अंगात जी उर्मी असते की आपण आपल्या भागाचा विकास करण्यासाठी काही तरी करावे ती करण्याची वेळ आली होती. कसे असते की माणूस जन्मत:च तीन ऋणात अडकलेला असतो. आयुष्यभरात या तीन ऋणातून त्यांना मुक्त व्हायचे असते. पहिले ऋण असते जन्मदात्या आईवडीलांचे, त्यानंतर दुसरे ऋण असते समाजाचे. ज्या समाजात आपण वाढलो, मोठे झालो त्या समाजाचे. तिसरे ऋण असते देशाचे. या देशासाठी आपल्या आयुष्यातील कर्माने त्याच्या ऋणातून मुक्त व्हावे लागते. कैलाश मोते याबाबतीत अधिक भाग्यवान आहेत की त्यांना या तीनही ऋणातून मुक्त होण्याची संधी मिळाली. त्या संधीचे सोने करुन त्यांनी या तीनही ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी आपल्या देशाची पर्यायाने आपल्या मायभूमिची सेवा करण्याची संधी त्यांना शहादा येथे उपविभागीय कृषि अधिकारी म्हणून कार्यरत झाल्यावर उपलब्ध झाली. त्यावेळी त्यांनी जे काय आपल्या गावाकरता करता येईल ते या ठिकाणी केले.

त्यांचे नंदूरबार जिल्ह्यातील वडगाव हे गाव डोंगराळ भागात जंगलाच्या नजिक वसलेले आहे. हे गाव दोन पाड्यात वसलेले आहे. त्यापैकी एक पाडा वन विभागाच्या हद्दीत आहे तर दुसरा पाडा महसूल विभागाच्या हद्दीत वसलेला आहे. त्याला कोळ पांढरी म्हणतात. ही गावे आदिवासींची आहेत. त्यामुळे शासनाच्या नजरेपासून दूर राहिल्याने वर्षानुवर्षे उन्हाळ्यात पाण्याच्या टंचाईला सामोरे जावे लागायचे. या भागातील लोकांचे

उत्पन्नाचे साधन तरी दुसरे काय होते. शेती आणि जनावरे पाळणे या शिवाय दुसरा व्यवसायच नसायचा. पावसाळ्यात चांगला पाऊस पडत असल्यामुळे पाच सहा महिने काही चिंता नसायची. खरीपाची पिकेही बऱ्यापैकी घेतली जायची. त्यामुळे वर्षभर पोटापाण्याची सोय कशीतरी व्हायची. परंतु शिलकीत काही उरत नव्हते. मार्च संपून एप्रिल महिना उजाडला की पाणी टंचाईने लोक हैराण व्हायचे. जनावरे तहानेने व्याकूळ व्हायची. शेतीत दुसरे पीक घेता येत नसायचे. त्यामुळे दरवर्षी तीन चार महिने दुष्काळ पाचवीला पुजलेला असायचा. या गावातील दोन्ही पाडे डोंगर उताराच्या पायथ्याशी असल्यामुळे पावसाळ्यात पडणारे पाणी जमिनीचा उतार असल्यामुळे वाहून जायचे. पावसाच्या पाण्याचा वापर केवळ पावसाळ्यातच होत होता. हिवाळा संपून उन्हाळा लागला की तीव्र पाणी टंचाइला लोकांना सामोरे जावे लागायचे. लोक त्रस्त होत असत.

या वडगावातील बहूतांशी लोक शेतकरी असल्याने प्रत्येकाकडे बैल आणि बैलगाडी असायची. त्या बैलगाडीमध्ये उन्हाळ्यात कायमचे लोखंडी मोठे पिंप बांधून ठेवलेले असायचे. त्या बैलगाडीतून कोणाच्या तरी विहीरीवरुन पाणी आणले जायचे. तेच पाणी पिण्यासाठी आणि जनावरांना पिण्यासाठी वापरले जायचे. शेतीच्या पाण्याचा विषयच नसायचा. कधी कधी तर असा प्रसंग यायचा की विहीरीमध्ये देखील पाणी उरायचे नाही. अशावेळी शासनाकडे अनेकदा आर्जव केल्यानंतर टँकर मागवला जायचा आणि त्यावर माणसांची आणि जनावरांची तहान भागवली जायची. अशा परिस्थीतीत अनेक पिढ्यानी अनेक वर्षे अशीच काढली होती. कैलाश मोते यांनी तर ही परिस्थिती अगदी बालवयापासून पाहिली होती आणि स्वत:ही अनुभवली होती. त्यामुळे या मूलभूत प्रश्नावर काही तरी केले पाहिजे असे त्यांना मनापासून वाटले.

याबाबत काय करता येईल यासाठी त्यांनी विचार करुन कामाचे नियोजन केले. त्यावेळी जलसंधारण विभागाची कामाची अंदाजपत्रके कृषि विभागाकडून मंजूर केली जायची. जलसंधाराची कामे करुन घेताना कैलाश

मोते यांनी त्यावेळचे धुळे येथील वनसंरक्षक श्री थोरात यांची मदत घेण्याचे ठरविले. त्यासाठी खास वेळ काढून त्यांनी धुळे येथे जाऊन श्री थोरातांची भेट घेतली आणि त्यांना सहकार्याची विनंती केली. कैलाश मोते यांची गावाप्रति असलेली आत्मियता आणि प्रेम पाहून थोरातांनीदेखील सहकार्य करण्याचे वचन दिले. त्यातून मग मोते यांनी कामाचे नियोजन केले आणि अल्पाधीतच वडगावच्या दोन्ही पाड्याच्या जवळून वाहणाऱ्या ओढ्यावर दोन बंधारे दोन्ही पाड्यात बांधले. त्या बंधाऱ्यांचे काम इतके दर्जेदार केले की तेथे पावसाळ्यात पाणी अडवल्यानंतर गळती अजिबात होत नव्हती. हे बंधारे पावसाळ्यात तीन चारवेळा भरायचे. पहिल्यांदा भरले की ते पाणी जमिनीत मुरुन इतरत्र पसरायचे. पुन्हा पाणी साठायचे आणि पुन्हा मुरायचे. याचा विचार करुन शेतकऱ्यांनी या बंधाऱ्याच्या खाली अनेक विहीरी आणि बोअर घेतल्या. बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी साचत असल्याने त्याखालची विहीर काठोकाठ भरायची. बोअरींगलाही भरपूर पाणी असायचे. हे पाणी अगदी बारमाही दोन्ही पाड्यांना पुरु लागले. दोन्ही पाड्यांच्या आजूबाजूला हे बंधारे बांधले गेले होते. त्यामुळे दोन्ही पाड्यांच्या पिण्याच्या आणि जनावरांच्या पाण्याची चिंता कायमची मिटली. या दोनही बंधाऱ्यात जानेवारी अखेरपर्यंत पाणी रहात असल्याने या परिसरातील जवळपास ५० ते ६० शेतकऱ्यांच्या विहीरींनाही बारमाही पाणी राहू लागले. त्यामुळे कधीतरी रब्बी पिकांचा लाभ घेणाऱ्या या भागातील गरीब शेतकऱ्यांच्या शेतात गहू आणि हरभरा यासारखी हिरवीगार पिके डोलू लागली.

आदिवासी लोकांच्या जीवनात थोडाफार का होईना आनंद दिसू लागला. ते पाहून कैलाश मोते यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू तरळले. आपण एकातरी ऋणातून मुक्त झाल्याची भावना त्यांच्या मनाला समाधान देऊन गेली. गावकऱ्यांनाही त्यांचे समाधान वाटले. ज्याप्रमाणे एका चंद्रामुळे अवघी रात्र शोभून दिसते, त्याप्रमाणे गावातील एका शिकलेल्या मुलामुळे अवघे गाव शोभून दिसते असे लोक म्हणू लागले. लोकांनी कैलाश मोते यांचा हृद्य सत्कार केला. त्यावेळी त्यांना अगदी भरुन पावल्याचा आनंद

झाला होता.

त्यानंतरच्या काळात बाह्य जगात इंटरनेटने प्रवेश केल्यामुळं जग झपाट्याने बदलत होते. परंतु वडगावच्या कोळ पांढरीमध्ये बाह्य जगातील या विज्ञानयुगाचा काहीही परिणाम दिसून येत नव्हता. नेहमीचेच रहाट गाडगे सुरु होते. त्यावेळी गावातील समजदार आणि सुशिक्षित माणसं म्हटली तर शाळेत शिकविणारे शिक्षकच. त्यांच्याशिवाय प्रबोधन करणारे येथे कोणीच नसायचे. अशावेळी कैलाश मोते यांनी गावातील शिक्षकांशी चर्चा करुन बाहेरच्या जगात काय चालले आहे. शासनाच्या विकासाच्या कोणत्या योजना आहेत? त्याचा फायदा घेऊन लोक कसे सुधारत आहेत? विज्ञानाने काय प्रगती केली आहे? त्या प्रगतीचा लाभ घेऊन शेतकरी मंडळी कशी सुधारित शेतीकडे वळली आहे? याचे ज्ञान गावातल्या मुलांपर्यंत पोहचले पाहिजे. यासाठी त्यांनी गावातील शिक्षकांची मदत घेऊन गावातल्या शाळेला एक लॅपटॉप स्वत:च्या खिशातून पैसे भरुन उपलब्ध करुन दिला. एवढेच नव्हे तर त्या निमित्ताने सर्व गावकऱ्याना एकत्र करुन एक कार्यक्रम आयोजित केला आणि सर्वांना या लॅपटॉपची गरज लक्षात आणून दिली. हा लॅपटॉप म्हणजे गावात आलेली विज्ञानाची गंगाच होती. कारण केवळ एका क्लीकवर जगातील सगळी माहिती वडगावसारख्या आदिवासी खेड्यातील लोकांच्या समोर येत होती. त्यामुळे गावातील लोकांना आपल्या या सुपुत्राचा निश्चितच अभिमान वाटू लागला आणि खरोखरच ही अभिमान वाटावा अशीच गोष्ट होती. आपल्या गावानेही काळाबरोबर चालावे ही भावनाच फार मोठी आहे.

जोपर्यंत कैलाश मोते शहादा येथे उपविभागीय कृषि अधिकारी होते तोपर्यंत ते वारंवार आपल्या गावाला भेट देऊन आणखी काय करता येईल याविषयी गावकऱ्यांसोबत सतत चर्चा करीत असत. आपले गावही इतर गावांच्या बरोबरीने यावे. गावाचा डंका गाजत रहावा असे त्यांना मनोमन वाटत असे. त्यातूनच त्यांच्या मनात एक कल्पना सुचली. त्यावेळी राज्यभर गाजत असलेल्या ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आदर्श गाव संकल्पना व प्रकल्प योजनेत सहभागी व्हावे. त्यादृष्टिने त्यांनी प्रयत्न

सुरु केले. त्यासाठी गावातील काही प्रतिष्ठित लोकांच्या गाठीभेटी घेऊन चर्चा केल्या. दोन तीन बैठका पार पडल्या. त्यानंतर गावातील लोकांना या योजनांचे महत्व पटले. गावाच्या दृष्टिने ही योजना कशी फायद्याची आहे याचे महत्व पटले. राळेगण सिध्दी आणि हिवरे बाजार यासारख्या गावांमधली जादू त्यांनी लोकांना सांगितली. त्यावेळी लोक स्वयंस्फुर्तीने तयार झाले. त्यानंतर कैलाश मोते यांनी आपले प्रशासकीय सेवेतील आपले वजन वापरुन आणि समाजसेवक अण्णा हजारे यांच्याशी संपर्क साधून आपल्या वडगावचा समावेश या योजनेत करुन घेतला. मग लोक आपोआपच कामाला लागले.

वनक्षेत्र, पडीक क्षेत्रात सरल समतल चर म्हणजे टेकड्यांच्या किंवा शेतांच्या उतारावर आडवे चर खोदून पावसाळ्यात पडणारे पाणी तिथल्या तिथे कसे जिरविले जाईल यासाठी प्रयत्न करणे. अशा प्रकारची कामे गावात मोठ्या प्रमाणावर झाली. त्याचबरोबर कंपार्टमेंट बंडींगची कामेही झाली. त्यामुळे पावसाळ्यात पडणारे पाणी शेतातल्या शेतात जिरुन जमिनीचा ओलसरपणा वाढला. त्यामुळे शेतकऱ्याला एक खरीपाचे पिक झाल्यावर दुसरे पिक घेण्यासाठी देखील मदत झाली. लोकांना आनंद झाला. दुबार पिकांमुळे लोकांच्या उत्पन्नातही भर पडली. लोक जोमाने कामाला लागले. बघता बघता अवघा वडगाव कामाला लागला आणि जवळपास १२०० ते १३०० हेक्टर क्षेत्रावर जलसंधारणाची कामे या आदर्श गाव आणि प्रकल्प योजनेंतर्गत झाली. याचे पुर्ण श्रेय श्री कैलाश मोते यांना जाते. वर्षाकाठी एकमेव खरीपाचे पिक घेणाऱ्या गावातील शेतात आता नगदी पिके डोलू लागल्याने गावातल्या शेतकऱ्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. या गावातल्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही मोठ्या प्रमाणावर वाढ झाली.

यानंतर गावातील लोकांनाही या गोष्टीची आवड निर्माण झाली. गावातील काही तरुण शेतकऱ्यांना हाताशी धरुन श्री कैलाश मोते यांनी त्यावेळी देशभर गाजत असलेल्या वाटर कप स्पर्धेत सहभाग घेण्यासाठीही प्रवृत्त केले. त्यावेळी सर्वांच्या गळ्यातील ताईत बनलेले सिनेअभिनेते अमिर खान, मराठीतील अभिनेते नाना पाटेकर आणि अभिनेते मकरंद अनासपुरे

यांच्या सहभागने पाणी फाउंडेशनची वाटर कप स्पर्धा राज्यातील शेतकऱ्यांचा श्वास बनली होती. त्यांच्यासोबत गुणवंत पाटील, प्रशासकीय अधिकारी श्री ननावरे, श्री शांतीलाल मुथा,श्री अविनाश पोळ यासारखी मंडळी अक्षरश: स्वत:ला झोकून देऊन जलसंधारणाच्या क्षेत्रात काम करीत होती. हिंदी चित्रपटात सुंदर आणि नाजूक हिरोइनचा हिरो म्हणून काम करणारा अमीर खान प्रत्यक्ष कुदळ फावडे हातात घेऊन शेतकऱ्यांबरोबर रानात काम करतोय हे बघून लोकांना खूपच अप्रुप वाटत होते. वास्तविक पहाता ते लोकांच्या हितासाठीच काम करीत होते. परंतु त्यांच्या सहभागामुळे लोकांचा उत्साह वाढला आणि वाटर कप स्पर्धेत असंख्य गावे भराभर सहभागी झाली. या स्पर्धेत आपल्या गावानेही सहभाग घ्यावा अशी कैलाश मोते यांची खूप इच्छा होती. त्यासाठी पुन्हा गावकऱ्यांचे मन वळविले. पाण्याचे महत्व वडगावातल्या लोकांना आधीच माहित होते. त्यामुळे वाटर कपची संकल्पना त्यांना खूप आवडली.

वडगाव हे गाव आधीच डोंगर पायथ्याला असल्याने उतारावर आडव्या चर खोदून पाणी आडवण्याचा प्रयत्न सुरु झाला. त्या बरोबरीने शेतकऱ्यांच्या शेतात कंपार्टमेंट बंधारे, शेततळे, लहान मातीचे बंधारे, दगडी बंधारे, गॅबीयन बंधारे अशा प्रकारची कामे झपाट्याने सुरु झाली. जेव्हा वाटर कपसाठी काम करायला लोक बाहेर पडायचे तेव्हा त्याला एकाद्या महोत्सवासारखे रुप यायचे. लोक आपण अमीर खानसोबत आणि नाना पाटेकर सोबत काम करत आहोत असे समजायचे. लोकांचा उत्साह असाच टिकून रहावा आणि वाटर कप स्पर्धेत उतरावेत यासाठी कैलाश मोते यांनी स्वत: लोकांना टिकाव, फावडे, कुदळी विकत आणून दिल्या. पुण्याहून खास लोकांचा उत्साह वाढावा यासाठी दोन पोती भयन टोप्या, बनियन आणून लोकांना वाटले. त्यामुळे या श्रमदानाला एकाद्या उत्सवाचे स्वरुप प्राप्त झाले होते. लोक न थकता आनंदाने काम करीत होते. श्री मोते यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणवर लोक सहभागी होणार असल्याने कामाचे नियोजन करुन जास्तीत जास्त क्षेत्रावर हे काम केले जावे यासाठी लोकांचे विशिष्ट

गट तयार करुन त्यांनी कोठे कोठे आणि काय काम करावे यासाठी नियोजन केले होते. त्यामुळे फार मोठ्या क्षेत्रावर जलसंधारणाची कामे पुर्ण झाली. लोकांमध्ये संचारलेल्या उत्साहाचे विधायक कार्यात रुपांतर झाले.त्यानंतर दुपारी सर्वांना जेवण दिले.

वाटर कप श्रमदान मोहिमेच्या शेवटच्या दिवशी केवळ वडगावच नव्हे तर वाटर कप स्पर्धेत सहभागी झालेल्या आसपासच्या गावातील लोकांनाही महाश्रमदानात सहभागी होण्यासाठी आमंत्रण देण्यात आले. त्या दिवशी खरे तर महाश्रमदान दिवस साजरा करण्यात आला. हजारो लोक एकत्र आल्याने लोकांच्या उत्साहाला भरती आली होती. कामाचे योग्य नियोजन आणि उत्साह यामुळे त्या एकाच दिवशी फार मोठी जलसंधारणाची कामे पुर्ण झाली. ती कामे पाहून वाटर कप स्पर्धेसाठीच्या कामाचे परिक्षण करणारे लोक अचंबित झाले. त्यांनी खूपच वाहवा केली. एवढेच नव्हे तर लोकांच्या या मनापासूनच्या सहभागामुळे वडगावचा या वाटर कप स्पर्धेमध्ये पहिला क्रमांक आला. त्याचा भव्य असा बक्षिस वितरण कार्यक्रम पुणे येथील भव्य अशा बालेवाडी स्टेडियम येथे आयोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमाला स्वत: अमीर खान याच्यासोबत अनेक मान्यवर उपस्थित होते.

आपल्या गावाने सांघिक उपक्रमातून मिळविलेले यश सर्वांनाच आनंदी करुन गेले होते. जास्तीत जास्त लोक या बक्षिस वितरण कार्यक्रमाला उपस्थित रहाण्यासाठी इच्छूक होते. त्यापैकी कोणाला नाराज न करता श्री मोते यांनी सर्वांना पुण्याला जायची सोय केली.त्यासाठी चार चाकी गाड्या, टेंपो अशा वाहनांची व्यवस्था केली. पुण्यात एक दिवसाची रहाण्याची आणि जेवणाची व्यवस्थाही त्यांनीच केली. कुठेही लोकांचा उत्साह कमी होणार नाही याची काळजी घेतली.

या बक्षिस वितरण सोहळ्यासाठी वडगावातील रमेश पटले, बाबूलाल मोरे, कांतीलाल पटले, नरशाबाबा, बाबूलाल पावरा, लगन पावरा, गुड्डू मोते, शांतीलाल मोते, सुखलाल गुरुजी, वनिता पटले इत्यादी मान्यवरांसह

अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. यासाठी विशेष सहाय करणारे कृषि सहायक श्री शिरसाट यांचाही उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. कारण या सर्व प्रवासात त्यांचा सहभाग सर्वांच्या बरोबरीने होता. तो भव्य दिव्य बक्षिस वितरण सोहळा पाहून लोक भारावून गेले.

वडगावसारख्या खेड्यातील लोक इतके भारावून गेले की पाण्याबाबत ते इतके सतर्क झाले आहेत की आजही त्या गावात पाण्याचा वर्षाचा जमाखर्च ठेवला जातो. गावाला किती पाणी लागते? पिण्यासाठी किती लागते? जनावरांसाठी किती लागते? शेतीसाठी किती लागते? एकूण किती पाण्याचा साठा आहे? तो कसा वितरीत करायचा याचे सारे नियोजन हे गाव आजही करीत आहे. गेल्या कित्येक वर्षापासून पाणीटंचाईचा सामाना करणारे वडगाव हे गाव आज पाण्याच्या बाबतीत इतके साक्षर आणि जागृत झाले आहे की इथे बारीक सारीक पाण्याच्या वापराचा हिशोब ठेवला जात आहे.याचे श्रेयश्री मोते यांना जाते. एके काळी आदिवासी म्हणून दुर्लक्षित राहिलेले गाव पाण्याच्याबाबतीत इतके सुशिक्षित होईल याची कोणी कल्पनाही केली नसेल. परंतु गावातील एक चांगला मुलगा सु शिक्षित झाला तर काय घडू शकते हे सर्वांनी पाहिले. अशा प्रकारे श्री कैलाश मोते यांनी गावाच्या ऋणातूनही उतराई होण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या मातीशी नाळ जोडली गेल्यामुळेच श्री मोते यांनी अगदी पदरमोड करुन गावासाठी कार्यक्रम राबविले आहेत. असा सुपुत्र सर्वच गावाला मिळाला पाहिजे अशा लोकांच्या प्रतिक्रिया होत्या.

प्रकरण पाचवे

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय उपसंचालक, नाशिक

श्री कैलाश मोते यांची बदली पाच वर्षे शहादा येथे काम केल्यानंतर जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय नाशिक येथे उपसंचालक या पदावर झाली. त्या कार्यालयातील ते दुसऱ्या क्रमांकाचे पद होते. त्या ठिकाणी हजर झाले. त्या ठिकाणी कार्यरत असताना नियमित कामाव्यतिरिक्त व्यापारक्षम शेती व सायटोसॅनेटरी प्रमाणपत्र(निर्यातीसाठी आवश्यक प्रमाणपत्र) वितरण अधिकारी म्हणून देखील ते कामकाज पाहत होते. या ठिकाणी कार्यरत असताना जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात द्राक्ष निर्यातीसाठी नव्या धोरणानुसार द्राक्ष बागांची नोंदणी केली, उर्वरित अंश तपासणीसाठी नमुने काढले. त्यासाठी ९८७ कंटेनर मधून पहिल्यांदाच महाराष्ट्र राज्यातून निर्यात करून सर्वाधिक परकीय चलन मिळवून दिले. जवळपास १६० कोटी रुपयांचे परकीय चलन मिळवून देण्यासाठी सहाय्य केले. यासाठी त्यांचा शासनाने गौरव देखील केला आहे.

आपल्या देशातील वर्षभरात जेवढी द्राक्षाची निर्यात व्हायची त्यापैकी जवळपास ८५ टक्के द्राक्ष निर्यात एकट्या नाशिकमधून होत होती. या ठिकाणी

आल्यानंतर त्यांच्या कार्यकर्तृत्वाला धुमारे फुटले असेच म्हणावे लागेल. द्राक्ष पिकाच्या बाबतीत केलेले काम पाहून त्याची नोंद शासन दरबारी घेतली गेली.

नाशिक जिल्ह्याची ख्याती द्राक्ष आणि कांदा पिकांसाठी आहे. द्राक्ष पिकांसाठी काम केल्यानंतर त्यांनी आपले लक्ष कांदा पिकाकडे वळविले. कांदा या पिकासाठी लासलगाव व चितेगाव ही गावे प्रसिध्द आहेत. या ठिकाणचा कांदा जगभर जातो. याठिकाणी कांदा साठवणुकीसाठी ज्या चाळी उभारल्या जातात त्या चाळींसाठी खास केंद्र शासनाच्या एनएचआरडीएफ मार्फत विशेष डिझाइन तयार करुन घेण्यात आले. त्यानुसार नाशिक जिल्ह्यात पहिल्यांदाच ८३३ कांदा चाळी उभारून १०६ लाख रुपयांचे अनुदान जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळवून देऊन कांद्याचा साठा निर्माण करण्याचे काम या ठिकाणी त्यांनी केलेले होते.

नाशिक जिल्ह्यामध्ये द्राक्ष पिकाची लागवड मोठ्या प्रमाणावर होत असते. त्यामध्ये वेगवेगळ्या व्हरायटीच्या द्राक्षांची लागवड होत असते. श्री कैलाश मोते हे जेव्हा उपसंचालक म्हणून कृषी अधीक्षक कार्यालयामध्ये कार्यरत झाले, तेव्हा त्यांनी या उद्योगाकडे विशेष लक्ष दिले. द्राक्षाचा उपयोग करून मोठ्या प्रमाणावर वाईन तयार करण्याचा उद्योग त्यांच्याच कारकिर्दीत भरभराटीला आला होता. त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या द्राक्षाची लागवड केली गेली होती. परंतु द्राक्षापासून वाईन तयार केली गेली तरी लोकांमध्ये तेवढी वाईनबाबत जनजागृती झाली नव्हती. जनजागृती नसल्यामुळे वायनरीचे उद्योग प्रकल्प डबघाईला आले होते. या वायनरीच्या उद्योगासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वितीय बँकाकडून मोठ-मोठी कर्जे घेतली होती. वायनरीसाठी जिल्ह्यातवायनरी पार्क उभारुन ३२ वायनरी सुरु केल्या तरी वायनरीचे उद्योग संकटात आल्याने शेतकरीदेखील अडचणीत आला. घेतलेल्या त्या कर्जाचे व्याज फेडणे देखील शेतकऱ्यांना अवघड होऊन बसले होते. त्यामुळे हा वायनरी उद्योग मोडकळीस येतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी श्री कैलाश मोते यांनी उपसंचालक

म्हणून घेतलेली भूमिका शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अतिशय महत्वाची होती. त्यांनी पुढाकार घेऊन शासनाकडून वायनरीला कृषि प्रक्रिया उद्योग म्हणून शेतकऱ्यांना अनुदान मिळवून दिले आणि या अनुदानातून शेतकऱ्यांना घेतलेल्या कर्जाचे व्याज फेडणे सोपे झाले. या व्यवसायातून पुन्हा त्यांना उभारी घेता आली. शेतकऱ्यांनी उभारलेल्या वायनरी उद्योगाचे पुनर्वसन करण्याकरिता या उद्योगाला त्यांनी प्रक्रिया उद्योग म्हणून मान्यता दिली आणि त्यावर अनुदान उपलब्ध करून दिले. बरेचसे प्रकल्प घ्डबघाईला आले होते. परंतु या अनुदानामुळे ते पूर्ववत सर्व चालू झाले. त्यानंतर या वाईनरी विषयी जनजागृती करण्यावरही त्यांनी जाणिवपूर्वक प्रयत्न केले. त्यानंतर मोठ्या प्रमाणावर वाईन विक्री राज्यात आणि देशात व्हायला लागली. दोन पैसे शेतकऱ्यांना मिळायला लागले आणि त्यातून शेतकऱ्यांची कर्जफेड देखील होऊ लागली. या वायनरी उद्योगाची त्या काळात वार्षिक उलाढाल जवळपास ५० ते ६० कोटी रुपयांची होऊ लागली. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणावर रोजगार देखील उपलब्ध झाला. द्राक्ष पिकाची निर्यात देखील मोठ्या प्रमाणावर वाढली. एक कार्यक्षम अधिकारी कृषि क्षेत्रात काय करु शकतो याचे जीवंत उदाहरण म्हणजे कैलाश मोते यांचे देता येईल.

युरोपमध्ये जर द्राक्ष निर्यात करायची असतील तर त्यासाठी युरोप गॅप प्रमाणपत्र मिळविणे आवश्यक होते. यासाठी श्री कैलास मोते यांनी उपसंचालक म्हणून अतिशय प्रामाणिकपणे प्रयत्न केले. त्यांनी युरोपियन युनियनच्या आवश्यकते प्रमाणे ग्लोबल गॅप प्रमाणपत्रासाठी प्रयत्न केले. द्राक्ष निर्यातीसाठी आरोग्यदायी स्वच्छ व्यवस्था करून, शेतकऱ्यांना प्रशिक्षण देऊन मोठ्या प्रमाणात जनजागृती करून या उद्योगाला चालना दिली. शेतकऱ्यांना युरोप गॅप प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले. त्यामुळे नाशिकची द्राक्षे अनेक देशात मोठ्या प्रमाणात निर्यात होऊ लागली. त्याचप्रमाणे अपेडा या वाणिज्य संस्थेशी देखील संपर्क करून एक्सपोर्ट बाबत उत्पादक, निर्यातदार यांना प्रमोशन दिले.

द्राक्षाबरोबरच भाजीपाला, फळे निर्यातीसाठी ॲपेडा ही संस्था काम

करते. या संस्थेच्या साह्याने त्यांनी नाशिकमधील द्राक्ष आणि फळे यांच्या निर्यातीप्रमाणे भाजीपाल्याची निर्यातही सुरू झाली. त्यावेळी नाशिकमध्ये द्राक्षांवर फवारण्यात आलेली कीटकनाशके व रोगांच्या नियंत्रणासाठी जे बुरशीनाशक वापरले जायचे त्यामुळे त्याचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणावर दिसून यायचे. अनेकदा अपंगत्व, कॅन्सर यासारख्या आजारांची लक्षणे दिसून आली होती. यावर देखील जनजागृती करून शेतकऱ्यांना प्रशिक्षित करुन युरोपचे गॅप सर्टिफिकेट मिळाल्यामुळे अनावश्यक किटकनाशकांचा वापर टळल्यामुळे हा एक अडसर दूर झाला. परंतु त्यासाठी द्राक्ष निर्यांतीसाठी बांगांची नोंदणी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांचेकउे नोंदणी किरणे आवश्यक होते. त्या नोंदणीसाठी जिल्ह्यात विशिष्ट प्रकारची संगणकीय प्रणाली तयार केली आणि ही संगणकीय प्रणाली कार्यरत करून निर्यातीचे काम सुरू झाले.

त्यावेळी ॲपेडाचे संचालक श्री दवे यांची नाशिक येथे द्राक्ष निर्यात संदर्भात एक बैठक आयोजित केली गेली होती. या बैठकीत मार्गदर्शनानंतर श्री दवे यांनी मोते यांच्या कार्यालयाला भेट दिली आणि त्यांनी तयार केलेली संगणकीय प्रणाली पाहिली. या प्रणालीमुळे ते इतके प्रभावित झाले की त्यांनी दिल्लीला परत गेल्यानंतर त्या प्रणालीचा विचार करून ही प्रणाली देशभरात सुधारित स्वरुपात लागू करण्यासाठी निर्णय घेतला. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना कोणत्या बागेतून उर्वरित अंश तपासणीसाठी नमुने घेतले कोणत्या बागेच्या नमुन्यात उर्वरित अंश आढळून आला याचा बोध होत होता. द्राक्ष पिकाच्या निर्यातीसाठी उर्वरित अंश तपासणे आवश्यक होते. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व नमुने क्षेत्रिय कर्मचाऱ्यांमार्फत गोळा करुन दर दोन दिवसांनी द्राक्षाचे नमुने तपासणीसाठी पुणे येथे पाइविले जात होते. त्यामुळे उर्वरित अंश तपासणी प्रयोग शाळेचे प्रमुख श्री गालबोटे यांनीदेखील तेवढेच मोलाचे सहकार्य केले. त्यामुळे ३७३ नमुने शासकीय प्रयोगशाळेत पहिल्यांदाच तपासले गेले. त्यासाठी रुपये २८ लाखाचा महसूल मिळवून दिला.

या प्रणालीचे त्याचे कामदेखील नाशिकमधूनच सुरू केले. त्या दिवसापासून नाशिक शहर हे जगाच्या नकाशामध्ये ग्रेप्स सिटी म्हणून ओळखले जाऊ लागले याचे श्रेय देखील श्री मोते यांनाच मिळते.

निर्यातदार शेतकऱ्यांना जे फायटो प्रमाणपत्र द्यावे लागायचे त्या प्रमाणपत्रासाठी २४ तास काम करण्याची तयारी श्री मोते यांची होती. त्यांनी कधी कधी रात्री बारा वाजता तर कधी कधी पहाटे चार वाजता देखील शेतकऱ्यांच्या सेवेसाठी ही फायटो प्रमाणपत्र देण्याची कामे केली आहेत. शेतकरी मोठे असले तरी इंग्रजी भाषेचे अज्ञान किंवा सराव नसल्यामुळे त्यांना हे फॉर्म भरता येत नव्हते तर ते फॉर्म भरून देण्याचे काम देखील आपल्या पदाचा किंवा प्रतिष्ठेचा मुद्दा उपस्थित न करता त्यांनी शेतकऱ्यांसाठी हे काम अविरतपणे केले. त्यांच्या या क्रियाशीलतेमुळे नाशिक जिल्ह्याचे कलेक्टर देखील श्री मोते यांना खूप सन्मान करीत असत. कलेक्टरच्या सर्व बैठका अटेंड करण्याची जबाबदारी मोते यांना दिली होती. सर्व खात्यांच्या समन्वय बैठकांना त्यांना बोलावले जायचे. हा त्यांच्या कार्यशैलीचा सन्मानच नव्हे काय! नाशिकमध्ये जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयात उपसंचालक पदावर कार्यरत असताना त्यांनी केलेल्या कामाची दखल श्री दवे यांच्या रुपाने राष्ट्रीय पातळीवरदेखील घेतली गेल्याचे दिसून येते. जिथे जिथे श्री मोते यांनी कृषि अधिकारी म्हणून सेवा बजावली त्या सर्वच ठिकाणी त्यांनी आपल्या कामाची छाप कायम स्वरुपी सोडली आहे. त्यामुळेच त्यांच्या कार्याचा शासन पातळीवर सतत गौरव होत असतो. त्याचप्रमाणे प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी ५२ प्रक्रिया युनिट धारकांना जादाचे अनुदान मिळवून दिले. बाजारासंदर्भात शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन मिळावे व मार्केट कमिटी निहाय द्राक्ष व इंतर भाजीपाला दर मिळावेत म्हणून जिल्ह्यातील ७ प्रस्तावास मंजूरी व अनुदान मिळवून देऊन जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बाजारभाव कळावा म्हणून केंद्र सुरु केले.

कांदा पिकाचे मार्केटमधील दर स्थिर रहावेत म्हणून दरवर्षी कांदा

चाळी उभारणीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करुन कांदा चाळीसाठी अर्थसहाय्य देऊन जास्तीत जास्त कांदा साठविता येईल यासाठी प्रयत्न केले. ज्या ज्या म्हणून शेतकऱ्यांच्या अडचणी होत्या त्या सर्व अडचणी आपल्या स्वत:च्या आहेत असे समजून ते सोडविण्याचा प्रयत्न करीत असत. त्यामुळे ते जवळपास २४ तास ते शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असत. स्वत:ला इतके झोकून देऊन काम करणारा अधिकारी कृषि खात्यात दुर्मिळच आहे. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण मिळत नाही म्हणतात ते खरेच आहे. स्वत: क्लाससवन अधिकारी असताना केवळ शेतकऱ्यांच्या सोयीसाठी आणि त्यांच्या मदतीसाठी रात्रंदिवस राबणारा अधिकारी ही त्यांची ओळख महाराष्ट्र कदापि विसरणार नाही.

प्रकरण सहावे

प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक

श्री कैलाश मोते हे नाशिक येथे उपसंचालक अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय येथे कार्यरत असताना त्यांच्या नावाची चर्चा राज्यातील चांगल्या आणि कृतीशील अधिकाऱ्यांमध्ये केली जात होती. त्याचवेळी श्री राजेशकुमार (भाप्रसे) यांची केंद्रिय सेवेतून अर्थात दिल्लीहून नाशिक येथे आयुक्त आदिवासी विकास पदावर बदली झाली. श्री मोते यांनी श्री राजेशकुमार यांच्यासोबत बीड येथे असताना जिल्हा कृषि विकास अधिकारी म्हणून काम केले होते. त्यामुळे त्यांच्या कार्यपध्दतीविषयी श्री राजेशकुमार यांना चांगली माहिती होती. त्यामुळे ते नाशिक येथे रुजू होताच त्यांनी श्री मोते यांना निरोप पाठविला आणि बोलावून घेतले. त्यावेळी त्यांच्यात जी चर्चा झाली त्यानुसार मोते यांनी आदिवासी विकास विभागात काम करावे असा सल्ला श्री राजेशकुमार यांनी दिला. दुसरीकडे श्री मोते यांचाही उपसंचालक पदावरील कार्यकाल पुर्ण होत आला होता. आणि ते प्रमोशनच्या प्रतिक्षेत होते. परंतु त्या आधी श्री मोते यांनी आदिवासी विभागाचे तत्कालिन प्रधान सचिव श्री एम. रमेशकुमार यांना अर्ज देऊन कृषि विभागातील अधीक्षक कृषि अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याची

आदिवासी प्रकल्प अधिकारी या पदावर काम करण्यासाठी इच्छूक असल्याचा विनंती अर्ज दिला होता. परंतु श्री एम. रमेशकुमार यांनी त्याला नकार दिला होता असे त्यांना सांगितले. परंतु त्यावर श्री राजेशकुमार म्हणाले की तू फक्त प्रस्ताव तर पाठव बाकी मी बघतो. त्यांच्या सांगण्यानुसार श्री मोते यांनी पुन्हा प्रकल्प अधिकारी म्हणून काम करण्यास तयार असल्याचा प्रस्ताव सरकारकडे सादर केला. त्यानंतर अवघ्या तीनच दिवसात श्री राजेशकुमार यांनी तात्कालिन अदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावीत यांच्याशी आणि या खात्याचे सचिव श्री भाई नगराळे यांच्याशी चर्चा करुन श्री मोते यांच्या नियुक्तिचे आदेश काढले. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी श्री मोते प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक येथे म्हणून कार्यालयात रुजू झाले.

त्यावेळी प्रकल्पाच्या अधिकारात ४२ शासकीय आश्रम शाळा आणि ४५ सेवाभावी संस्थांच्या शाळा कार्यरत होत्या. एकूण १२७ ठिकाणी शासकीय वसतिगृहे मंजूर झाली होती. तथापि आदिवासी विभागातल्या शाळांचे निकाल २७ टक्के पेक्षा कुठेही जास्त दिसत नव्हते. शासकीय वसतिगृहात रहाण्या पलिकडे काहीही भौतिक सुविधा उपलब्ध नव्हत्या. श्री कैलाश मोते स्वत: आदिवासी समाजातून आलेले असल्यामुळे त्यांना परिस्थितीची जाणीव होती. त्यांनीदेखील शासकीय वसतिगृहामध्ये अनुभव घेतला असल्यामुळे तेथील सर्व माहिती त्याना होती. सहाजिकच तेथे आणखी काही चांगल्या सुविधा निर्माण केल्या जाव्यात असे त्यांना अगदी मनोमन वाटत होते. आदिवासी शासकीय वसतिगृहामध्ये जास्तीत जास्त चांगल्या सुविधा कशा आणता येतील यासाठी त्यांनी जातीने लक्ष घालून प्रयत्न सुरु केले.

आदिवासी वसतिगृहात रहाणाऱ्या विद्यार्थ्यांचा निकाल वाढला पाहिजे यासाठी प्रथम त्यांनी प्रयत्न करायला सुरुवात केली. कैलाश मोते यांच्या कार्यशैलीचे हेच वैशिष्ट्य आहे की त्यांनी एकादी गोष्ट मनावर घेतली तर त्याचा सातत्याने पाठपुरावा करुन ते साध्य करुन दाखवणारच.

विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी त्यानी मनापासून प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी नाशिकच्या दैनिक सकाळचे संपादक श्री देवकरसाहेब आणि शहरातील नामवंत कोचिंग क्लासेसचे संचालक यांना एकत्र आणून विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा यासाठी प्रबोधनपर कार्यक्रम आखला. सर्वांत प्रथम त्यांनी या मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. अभ्यास कसा केला पाहिजे. गुणवत्ता कशी वाढली पाहिजे याविषयी चांगले मार्गदर्शन केले. त्यानंतर त्या विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांनादेखील प्रभावीपणे कसे शिकविले पाहिजे. मुलांच्या शाळांचा निकाल कसा वाढविला पाहिजे यासाठी विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करुन त्यांना प्रशिक्षण देखील देण्यात आले.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या शाळेचा निकाल चांगल्या पध्दतीने कसा लागेल यासाठी जेवढे शक्य असतील तेवढे प्रयत्न त्यांनी केले. ज्या समाजासाठी ही मुलांची वसतिगृहे चालविली जात आहेत त्याच समाजाचा प्रकल्प अधिकारी असेल तर तो कशा प्रकारे काम करु शकतो याचे जीवंत उदाहरण म्हणजे कैलाश मोते होत. अनेकदा खाजगी संस्थामधील नामवंत शिक्षकांना मानधन देऊन दोन तीन दिवसाच्या मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करुन त्या मेळाव्यात सर्व शाळांच्या मुलांना एकत्र बोलावून मार्गदर्शन केले. त्यातून बराचसा फरक जाणवला आणि आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत शाळांचे निकाल ६० ते ७० टक्क्यापर्यंत वाढले याचे श्रेय खरोखरच कैलाश मोते यानांच द्यावे लागेल. अतिशय तळमळीने काम करणारा अधिकारी असे त्यांचे वर्णन आयएएस अधिकाऱ्यांनी केले आहे. त्यांच्या काळात आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर इतक्या बारकाईने लक्ष देणारा दुसरा अधिकारी झाला नाही.

प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत चालविले जाणारे सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र पुर्वी नाशिक रोड येथे अंध शाळेच्या जुन्या इमारतीत सुरु होते. तेथे क्रीडांगणासाठीही पुरेशी जागा नव्हती. ती जागाही अतिशय अडचणीच्या ठिकाणी होती. त्या ठिकाणी जे इंस्ट्रक्टर होते ते सेवानिवृत्त अधिकारी होते. तेच सर्व कामे करीत असत. त्यामध्ये विद्यार्थ्यांचे भोजन

बनविणे, भोजन वाढणे पासून ते साफसाईपर्यंतची सर्व कामे त्यांच्याच नियंत्रणात होती. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाकडे त्यांना फारसा वेळ देता येत नव्हता. त्यामुळे प्रशिक्षणाचा हेतूच साध्य होत नव्हता. ही बाब कैलाश मोते यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी हे प्रशिक्षण केंद्र नवीन चांगल्या प्रशस्त जागेत कसे नेता येईल यासाठी प्रयत्न करायला सुरुवात केली. त्यासाठी स्वत: फिरुन शहरातील सरकारी जागांची जातीने पहाणी केली. त्यावेळी त्यांच्या असे लक्षात आले की समाज कल्याण विभागाची एक जागा नाशिकच्या पेठ रोड परिसरात आहे. त्यानंतर त्यांनी लागलीच तात्कालिन विभागीय आयुक्त श्री संजय चहांदेसाहेब (आयएएस) यांची भेट घेऊन त्यांच्याकडे या जागेची मागणी केली. अधिकाऱ्याची तळमळ पाहून चहांदेसाहेबांनी ताबडतोब त्यांना हिरवा कंदील दिला. त्यानंतर आदिवासी विभागाचे आयुक्त आयुक्त श्री राजेशकुमारसाहेब यांनीदेखील मोते यांना संपूर्ण पाठिंबा देऊन सदर प्रशिक्षण केंद्र स्थलांतरास सहकार्य केले.

या प्रशिक्षण केंद्राच्या स्थलांतरांचा मार्ग मोकळा झाला. तेथे प्रशिक्षणार्थींना रहाण्यासाठी बग बेड पुरविण्यात आले. पूर्वी ते स्वत: घरातून आणलेले साहित्य वापरुन जमिनीवर झोपत असत.त्यानंतर त्यांना बग बेड पुरविण्यात आले. तसेच प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांसाठी व्यायाम करण्यासाठी प्रशस्त अशी जीम सुरु करण्यात आली. बाजूला काही पडीक जागा रिकामी होती. तिचे प्रशस्त अशा क्रीडांगणामध्ये रुपांतर करण्यात आले. तेथे नाशिक येथील महाराष्ट्र पोलीस अकॅडमी मधील पोलीस प्रशिक्षण केंद्रातील सुविधा विचारात घेऊन तशा सोयी याही प्रशिक्षण केंद्रात कार्यान्वित केल्या. त्यानंतर हळूहळू ग्रांउंडमध्ये देखील चांगल्या सुविधा निर्माण करण्यात आल्या. प्रशिक्षणार्थींसाठी व्यायामाची साधने उपलब्ध करुन देण्यात आली. ड्रीलसाठी स्वत:ची जागा व रनिंगसाठी स्वतंत्र ट्रॅक निर्माण करुन रनिंगची तयारी केली. प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या सर्व बारीक सारिक सोयी जसे की ड्रेस, ग्रंथालय, अशा सोयी उपलब्ध करुन देण्यात आल्या. राज्यातील नामांकित प्रशिक्षण संस्थांच्या पध्दतीने याही प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण दिले जावे यासाठी जे जे

करणे आवश्यक होते ते सर्व काही श्री मोते यांनी स्वत: जातीने लक्ष घालून तयार करुन दिले.

एकादा अधिकारी किती समर्पित असू शकतो ते यावरुन दिसून येईल. प्रशिक्षणार्थी मुलांना लेखी परिक्षेत चांगले गुण मिळत नव्हते. त्यादृष्टीनेही जिल्ह्यातील चांगल्या प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन शिबीर आयोजित करुन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. शारिरीक चाचणीचे धडेही चांगल्या पध्दतीने दिले. त्यासाठी एक रंगीत पुस्तिका मार्गदशृक व सामान्य ज्ञानासह प्रकाशित करुन प्रशिक्षणार्थींचा उत्साह वाढविण्यात आला. त्यामुळे सहाजिकच आदिवासी मुलांचा पोलिस आणि सैन्य भरती होण्याकडे ओढा वाढला. जे खाजगी प्रशिक्षण वर्गाकडे आकर्षित झाले होते, तेही नंतर या सरकारी प्रशिक्षण केंद्राकडे वळाले. प्रशिक्षणार्थी मुलांचा ओघ वाढला. त्यानंतर श्री मोते यांनी तिथेच जवळ एम.एस. सीआयटीची परीक्षा देण्यासाठीचे खाजगी संस्थेमार्फत संगणकाचे विविध प्रशिक्षण केंद्र सुरु केले. त्याकरिता संगणकाचे संच उपलब्ध करुन दिले. फावल्या वेळात हा कोर्स करुन भरतीमध्ये मुलांना यश मिळविता येऊ लागले. विशेषत: मुलींनी यामध्ये जास्त सहभाग घेतला असल्याचे निदर्शनास आले. याच प्रशिक्षण केंद्रात मुलीसांठी ड्रायव्हिंग प्रशिक्षण, कंडक्टर प्रशिक्षण आणि सिक्यूरिटी गार्डचे प्रशिक्षण देण्याचीही व्यवस्था करुन त्यांना प्रशिक्षण दिले. एवढेच नव्हे तर त्यांना ड्रायव्हिंग लायसन्स आणि कंडक्टरचे बॅचदेखील काढून देण्यात आले.

हे काम चालू असतानाच अनेक मान्यवर अधिकारी आणि राजकीय व्यक्तिमत्वांना या ठिकाणी निमंत्रित करुन आपले काम योग्य दिशेने सुरु आहे की नाही याची खात्री करुन घेतली. वेगवेगळ्या कार्यक्रमाचे निमित्त साधून वरीष्ठ अधिकाऱ्यांच्याही भेटी घडवून आणल्या. हे प्रशिक्षण केंद्र बघून तात्कालिन आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावीत तर इतके खूश झाले की त्यांनी राज्यभरात अशा प्रकारचे प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याच्या सुचना त्यांनी आदिवासी विकास आयुक्ताना दिल्या.

कैलाश मोते यांनी प्रकल्प अधिकारी असताना असा एकही प्रकल्प

सोडला नाही जिथे आदिवासी समाजासाठी स्कोप आहे परंतु सोय नाही. अशा सर्व सोयी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यापैकी एक म्हणजे आदिवासी नृत्य स्पर्धांचे आयोजन होय! ही स्पर्धा आयोजित करण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे त्यानिमित्ताने सर्व आदिवासी बांधव एकत्र येतील आणि एकोपा निर्माण होईल. त्याचप्रमाणे स्पर्धात्मकताही वाढीस लागेल. त्यासाठी त्यांनी स्वत: पुढाकार घेऊन या स्पर्धेचे कार्यालयाच्या माध्यमातून आयोजन केले. गावागावातील आदिवासी लोकांपर्यंत हा नृत्य स्पर्धेचा संदेश पोहचविला. वेगवेगळ्या प्रकारची आदिवासी नृत्ये सादर करताना त्यांना जे पोशाख लागायचे तेही प्रकल्पाच्या माध्यमातून देण्यात आले. शेकडो आदिवासी बांधव स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आले. त्यांचा उत्साह बघून हेतू साध्य झाल्याची पावती मिळाली. नृत्य स्पर्धेनंतर सर्वांना पारितोषिकेही देण्यात आली. खरे तर या स्पर्धांचा मूळ उद्द्देशच लाजऱ्या बुजऱ्या आदिवासी बांधवांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे हा होता. तो मात्र १०० टक्के सार्थ झाला असे म्हणायला काहीही हरकत नाही.

हल्लीच्या वाढत्या महागाईच्या काळात लग्नांचा अमाप खर्च करणे आदिवासी बांधवांच्या हाताबाहेर गेला आहे. त्यामुळे अनेकजण कर्ज काढून लग्ने करतात आणि सावकाराच्या फेऱ्यात अडकतात. गरीब आदिवासी समाजातील मुलांची लग्ने कमी खर्चात व्हावीत यासाठी कैलाश मोते यांनी जीवाचे रान करुन आदिवासी मुलांच्या आणि मुलींच्या सामुहिक विवाहाचे आयोजन केले होते. त्यासाठी स्वत: पालकत्व स्वीकारुन तयारी केली होती. गावोगावी फिरुन उपवर आदिवासी मुलामुलींची यादी तयार करण्यापासून ते त्यांचे कपडे, दागिने, भोजन यापासून ते त्यांना संसारासाठी लागणारी आवश्यक भांडी कुंडी देखील या सामुदायिक विवाह सोहळ्यात दिली गेली होती. जो कोणी आंतरजातीय विवाह करेल त्याला प्रोत्साहनपर अधिक १०,००० रुपये रोख देण्याची सोय देखील करुन दिली. अशा लोकांच्या हिताच्या योजना श्री मोते यांनी राबविल्यामुळे ते आदिवासी समाजामध्ये ते खूपच प्रसिध्द झाले. त्यांचे नाव समाजात अतिशय आदराने घेतले जाऊ

लागले. त्यांच्या अंतरीची तळमळ अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना आणि राजकीय लोकप्रतिनिधींना दिसून येत होती. त्यामुळे आदिवासी बांधवांच्या हितासाठी ते जिथे जिथे शब्द टाकतील तिथे त्यांचा शब्द वाया जाऊ दिला जात नव्हता.

नाशिकमध्ये भारत विकास परिषद या संस्थेच्या सहकार्याने कैलाश मोते यांनी आयोजित केलेला सामुदायिक विवाह सोहळा अगदी पहाण्यासारखा होता. या संस्थेच्या माध्यमातून वधू वरांना नवीन कपडे, बाशिंगे, सौंदर्य प्रसाधने पुरविण्यात आली होती. अगदी आपल्या घरातील मुलीचे लग्न असल्यासारखे स्वत: जातीने लक्ष घालून त्यांनी सर्व तयारी करुन घेतली होती. केवळ एका ठिकाणीच नव्हे तर अनेक ठिकाणी त्यानी विवाह सोहळे आयोजित केले होते. नाशिक जिल्ह्यात आसरबारी, उस्थळे, पेठ, काळुस्ते, ठाणेपाडा, इत्यादी ठिकाणी पार पाडलेले सामुदायिक विवाह सोहळे म्हणजे इतर अधिकाऱ्यांसाठी दिशादर्शक ठरणारे होते. यातून त्यांनी आदिवासी बांधवांना आणखी एक महत्वाचा संदेश दिला की लग्ने ही काटकसरीने कशी करावीत. सावकाराकडून कर्जे घेऊन लग्ने करण्यापेक्षा अशा सामुदायिक विवाह सोहळ्यांमधून लग्ने लावली पाहिजेत.

या सामुदायिक विवाह सोहळ्याच्या निमित्ताने शेकडो आदिवासी बांधव एकत्र आले होते. याचाच फायदा घेऊन कैलाश मोते यांनी याच ठिकाणी भव्य अशा आरोग्य शिबीराचे आयोजनही करण्यात आले होते. जिल्ह्यातील नामांकित डॉक्टरांना बोलावून आदिवासी बंधू भगीनींची आरोग्य तपासणी करण्यात आली. याच ठिकाणी पालक मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले होते. एकाच वेळी अनेक कार्यक्रम घेण्याचा त्यांचा उद्देश हा की वारंवार वेगवेगळ्या कार्यक्रमांना फेऱ्या मारणे खर्चिक पडू नये यासाठी एकाच कार्यक्रमाच्या ठिकाणी अनेक कार्यक्रम आयोजित करुन लोकांच्या पैशाची आणि वेळेचीही बचत केली. अशा प्रकारे आदिवासी बांधवांची सर्वांगिण काळजी करणारे अधिकारी दुर्मिळच असतात. श्री कैलाश मोते हे अतिशय समर्पित भावनेने काम करणारे अधिकारी आहेत हे अगदी छोट्या

छोट्या गोष्टीतून दिसून येते. या कार्यक्रमाला महत्व प्राप्त व्हावे, अधिकाधिक लोकांनी सहभागी व्हावे यासाठी स्थानिक आमदार, खासदार, मंत्री किंवा आयएएस अधिकाऱ्यांना निमंत्रित करण्यात येत असे. अशा सामुहिक विवाह सोहळ्याचा एक चांगला पायंडा श्री मोते यांनी पाडला आहे, त्यामुळे आदिवासी विकास विभागात असा अधिकारी हरेक ठिकाणी असावा असे मंत्र्यानीच म्हटले आहे.

शासनाच्या स्वाभिमान सबलीकरण योजनेंतर्गत भूमिहीन आदिवासी कुटुंबांना आणि शेतमजूरांना जमिन उपलब्ध करुन देऊन त्यांना स्वावलंबी करण्याची योजना आहे. या योजनेचा जास्तीत जास्त आदिवासींना लाभ घेता यावा यासाठी श्री मोते यांनी खूप मेहनत घेऊन स्वाभिमान सबलीकरण योजना राबविली. यासाठी त्यांनी गावोगावी प्रसिध्दी देऊन आदिवासींची जमिन विक्रीसाठी उपलब्ध आहे का याची माहिती घेतली. त्यानंतर सदरच्या जमिनी शासनामार्फत खरेदी करुन आदिवासींच्या नावावर करण्याची प्रक्रिया अधिक खडतर होती. अगदी गावपातळीपासून ते विभागीय आयुक्त पातळीवर पाठपुरावा करावा लागत असे. कारण त्या सर्व जमिनी ह्या नवीन शर्तीच्या होत्या. त्यामुळे त्या विकत घेण्यासाठी विभागीय आयुक्तांची परवानगी घ्यावी लागत असे. इतकी किचकट प्रक्रीया असली तरी न थकता श्री मोते यांनी पाठपुरावा केला. जवळपास एक ते दीड वर्षे पाहणी करुन आदिवासींना वाटप करण्यासाठी जमिनी शोधल्या. त्यानंतर गरजू शेतमजूरांची शोध मोहिम राबवून यादी तयार केली. त्यानंतर त्या जमिनी गरजूंना त्यांच्या नावावर करुन त्यांना जमिनीचे मालक बनविले. त्या तीन वर्षांच्या कार्यकाळात कैलाश मोते यांनी जवळपास १०९ एकर जमिन शासनामार्फत खरेदी करुन ती ३७ आदिवासी शेतमजूरांना लॉटरी पध्दतीने वाटून त्यांना स्वावलंबी बनविले. त्या जमिनी कसून ३७ आदिवासी बांधवांचे जीवन सुकर झाले. ही साधी गोष्ट नाही.

शासनाच्या असंख्य योजना आहेत. परंतु त्या राबविणारे अधिकारी सक्षम नसल्यामुळे त्या गरजू लोकांपर्यंत पोहचतच नाहीत. राज्यात कैलाश मोते यांच्यासारखे हाताच्या बोटावर मोजता येण्याइतके जरी अधिकारी तयार

झाले तरी राज्यातला आदिवासी बांधव गरीब रहाणार नाही याबाबत तीळमात्र शंका नाही.

श्री कैलाश मोते यांनी आपल्या कार्यकालात जिल्ह्यातील १५ आश्रमशाळांना क्रीडांगण आणि १३ आश्रमशाळांना व्यायाम शाळा उपलब्ध करुन दिल्या. त्यासाठी एकूण निधीत ४३ टक्के वाढ करुन आदिवासी मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून त्यांनी जाणिवपूर्वक प्रयत्न करुन या सुविधा उपलब्ध करुन दिल्या. समाजातील मुलांचे हित लक्षात घेऊन त्यांनी प्रयत्न केले. आश्रम शाळांमधील मेस पध्दतीत देखील त्यांनी जाणिवपूर्वक बदल केले. श्री मोते आपल्या विद्यार्थी दशेत असताना स्वत: वसतिगहांमध्ये राहिलेले असल्यामुळे गोरगरिब विद्यार्थ्यांना कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते याची जाणिव त्यांना होती. त्यामुळेच इतक्या तळमळीने काम करण्यासाठी त्यांची धडपड सुरु असते. आश्रम शाळांमधील मेसमध्ये आमुलाग्र बदल त्यांनी घडवून आणले. अनेक वसतिगृहांमध्ये विद्यार्थी जेवण ताटात वाढून घेऊन आपापल्या खोलीत नेऊन जेवत असत. ताट वाट्या धुताना खरकटे बेसिनमध्ये टाकून दिल्यामुळे अन्न सडून दुर्गंधी पसरुन मुले आजारी पडत असत. तसेच भांडी धुण्यातही वेळही वाया जात असे. परंतु श्री मोते यांच्या नवीन धोरणानुसार वसतिगृहात जेवणासाठी स्वतंत्र डायनिंग हॉल बनवण्यात आला. त्यात टेबल खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली. मेसचे टेंडर देतानाच त्यात ताट, वाटी व ग्लास यांचा पुरवठा करण्याची अट ठेकेदारांना घालण्यात आली होती. जेवणामध्ये पौष्टिकता वाढविणारे पदार्थ असावेत अशीही अट घालण्यात आली. त्यामुळे वसतिगृहातील जेवण अगदी घरातील जेवणाहून रुचकर कसे होईल याची पुरेपूर काळजी घेण्यात आली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाचून तो वेळ अभ्यासाला देता आला. पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा देता यावी यासाठी नाशिकमधील वसतिगृहात वाचनालय सुरु करण्यात आले. त्यात आवश्यक असणारी सर्व प्रकारची पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली. अशा प्रकारे कोणी सांगितले म्हणून नाही तर स्वत: अभ्यास करुन आदिवासी

विद्यार्थ्यांसाठी काय काय करता येऊ शकेल ते ते सर्व त्यांनी केले. त्यामुळे आदिवासी विकास विभागतील ते एकमेव क्रियाशील अधिकारी आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ति ठरणार नाही. त्यांच्या इतका स्वत:ला झोकून देऊन काम करणारा अधिकारी दुसरा सापडणार नाही.

जिल्ह्यातील अनेक आश्रमशाळा पत्र्यांच्या शेडमध्ये चालविल्या जात होत्या. परंतु कैलाश मोते यांनी अशा सर्व आश्रमशाळांची माहिती घेऊन जागेची उपलब्धतता लक्षात घेऊन अनेक ठिकाणी सिमेंटच्या सुसज्ज अशा इमारती उभ्या केल्या आहेत. महाराष्ट्रातील अनेक ठिकाणच्या आश्रमशाळांना आणि वसतिगृहांना कार्यकारी अभियंता श्री तायडे यांच्यासह भेटी देऊन पहाणी केली आणि त्या ठिकाणी गरजेनुसार आराखडा तयार करुन सिमेंटच्या इमारती बांधल्या. काही ठिकाणी जुन्या इमारती दुरुस्त करुन त्यांना रंगरंगोटी करुन चकाचक करुन नव्या कोऱ्या बनविल्या. जवळपास ५.६० कोटी रुपये खर्चून २८ आश्रमशाळांची दुरुस्तीची कामे त्यांनी पूर्ण केली आहेत. ज्या ज्या ठिकाणी मोकळ्या जागा आश्रमशाळा परिसरात असल्या की तिथे पेविंग ब्लॉक बसविण्यात आले. १९६४ आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिरांतर्गत डोळ्याची तपासणी करुन पाच विद्यार्थ्यांचे मोफत ऑपरेशन देखील मोफत करुन दिले. त्यामुहे अनेक पालक खूपच सुखावले.कारण त्यांच्या पाल्यांची पुर्ण जबाबदारी प्रकल्प कार्यालयाने पार पाडली होती.

अशा प्रकारे कैलाश मोते यांनी स्वत:ला झोकून देऊन काम केल्यामुळे राज्यभरात त्यांचे नाव झाले. राज्यातले अनेक मंत्री, सचिव, आमदार, खासदार आणि अधिकारी मंडळी त्यांना ओळखू लागले आणि त्यांच्या कामाचे कौतुक करु लागले. असा अधिकारी आपल्या खात्यात असावा असे सर्वांनाच वाटू लागले. तात्कालिन कृषिमंत्री बाळासाहेब थोरात आणि तात्कालिन उपमुख्यमंत्री ना.छगन भुजबळ यांनी तर सांगूनच टाकले की तुम्हीच आमच्या जिल्ह्यात शेवटपर्यंत काम करा. त्यामुळे सहाजिकच त्यांची किर्ती शासनात सर्वत्र पसरली. अंग मोडून काम करणारा अधिकारी कधी लपून रहात नाही. त्याचा प्रामाणिकपणा , सचोटी आणि त्याग कधी

ना कधी समोर येतोच आणि त्याच्या कर्माचे फळ त्यांच्या पदरात पडतेच.

न्युक्लियस बजेट योजनेत देखील आदिवासी शेतकऱ्यांसाठी भात मळणी यंत्र, युरिया ब्रिकेट मशिन, युरिया ब्रिकेट ॲप्लिकेटर, प्लास्टीकचे क्रेट्स, ताडपत्री वाटप, तुषार सिंचन योजना, राबविल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी अत्यंत दिलासादायक बाब ठरुन त्यांच्या शेती उत्पादन वाढीसाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केले आहेत.

शासकीय आश्रमशाळेवर इमारतींची झालेली दुरवस्था व गोडाऊन बांधकाम देखील योग्य गुणवत्तेचे नसल्याने स्वयंपाकासाठी येणारे धान्य तांदूळ, डाळवर्गीय कडधान्य इ. ठेवण्यासाठी पुरेशी जागा नसल्याने प्रत्येक शाळेवर उंदीर घुशींचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे धान्याची मोठ्या प्रमाणावर नासाडी होत असे. तसेच होणाऱ्या घाणीमुळे अस्वच्छता मोठ्या प्रमाणावर दिसून येत असे. तसेच मुलांसाठी आलेल्या धान्यासही कीड लागून त्याचे पीठ होण्याच्या अवस्थेत होते.तेव्हा कृषि पदवीधर म्हणून शिकलेले तंत्रज्ञान जसे मेथाइल ब्रोमाइडचे धुरीकरण तंत्रज्ञान वापरुन सर्व कीड मरुन जाईल अशा पध्दतीचे प्लास्टीक ताडपत्रीचा उपयोग करुन धुरीकरण केले. नाशिक येथील जिल्हा कारागृहातून पोते ठेवायचे स्टँड विकत घेऊन शाळेला पुरवठा केला. धान्याची पोती त्या स्टँडवर ठेवल्याने सुरक्षितता वाढून मुलांना उत्कृष्ट दर्जाचे जेवण मुलांना मिळू लागले.

आदिवासी लाभधारकांना एकाच ठिकाणी सर्व योजनांची माहिती मिळावी, विद्यार्थ्यांची बेरोजगार म्हणून नोंदणी व्हावी यासाठी राज्यात पहिल्यांदाच माहिती सुविधा केंद्राचे उदघाट्न डॉ. विजयकुमार गावीत यांच्याहस्ते करण्यात आले.अशा प्रकारे डॉ. कैलाश मोते यांनी प्रकल्प अधिकारी असताना आदिवासी बांधवांच्या सर्वांगिण विकासासाठी जे जे करणे गरजेचे वाटले किंवा ज्या काही योजना आहेत त्यात त्रुटी आढळल्या तर त्या त्यांनी त्वरीत दूर केल्या. आदिवासींच्या लहान मुलांपासून ते युवक आणि वृध्दांसाठी जे जे काही करता येण्यासारखे होते ते ते त्यांनी अगदी मनापासून केले. त्यामुळे त्यांच्यासारखा प्रकल्प अधिकारी दुसरा झाला नाही

असे म्हटल्यास अतिशयोक्ति ठरु नये. कैलाश मोते जरी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पात काम करीत असले तरी त्या ठिकाणी काम करीत असताना त्यांनी शासनाच्या सर्व खात्यातील अधिकाऱ्यांचा मोठ्या सफाईदारपणे वापर करुन घेतला आणि आदिवासी समाजाच्या उत्थानासाठी काम केले. त्यात मग सार्वजनिक बांधकाम खाते असेल, महसूल खाते असेल, कृषि खाते असेल किंवा आदिवासी विकास खाते असेल अशा सर्व खात्यातील अधिकाऱ्यांचा उपयोग करुन घेऊन त्यांनी आदिवासी बांधवांसाठी शासकीय योजनांचा पुरेपूर उपयोग करुन दिला. या कालावधीतील त्यांचे कार्य म्हणजे त्यांच्या कारकिर्दीतील सुवर्णकाळ होता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

प्रकरण सहावे

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नाशिक

श्री कैलाश मोते आदिवासी विकास विभागात प्रकल्प अधिकारी म्हणून किंवा कृषि खात्यात उपसंचालक म्हणून कार्यरत असताना त्यांनी केलेल्या कामाचा झपाटा नाशिकचे तात्कालिन पालक मंत्रीद छगन भुजबळ यांनी पाहिला होता. तसेच राज्याचे तात्कालिन कृषि मंत्री बाळासाहेब

थोरात यांनाही त्यांच्या कामाची कल्पना आली होती. आदिवासी विकास विभागातील प्रकल्प अधिकारी पदांचा कार्यकाल संपत आला असताना त्यांना पदोन्नतीवर बदलीवर जावे लागणार होते. त्यावेळी पालकमंत्री छगन भुजबळ यांनी त्यांना बोलावून सांगितले की तुम्ही बदली करुन दुसऱ्या जिल्ह्यात जाऊ नका. येथेच तुम्हाला नियुक्ति देण्यासाठी कृषिमंत्री बाळासाहेब थोरातांना सांगतो. बाळासाहेब थोरातदेखील कृषि खात्यातील अधिकाऱ्यां विरुध्दच्या लोकांच्या तक्रारींना कंटाळले होते. त्यावेळी अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचाराविरुध्दचे आंदोलन शिखरावर होते. अण्णांच्या आंदोलनाचा भाग म्हणून अनेक सामाजिक कार्यकर्ते माहितीच्या अधिकाराचा वापर करुन कृषि खात्यातील अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणत होते. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या चौकशीचा रोजचा रतिबच सुरु झाला होता. अनेक चौकशांच्या फेऱ्यांमुळे नाशिक जिल्ह्यातील कृषि खात्यातील अधिकारी वैतागले होते. अनेक अधिकाऱ्यांनी मंत्र्याकडे वशिला लावून बदल्या करुन घेतल्या होत्या. कृषि खात्यात नवीन अधिकारी दाखल झाली की चार दोन महिन्यात पळून जायचा किंवा बदली तरी करुन घ्यायचा. अशा रितीने नाशिक जिल्ह्यात सर्वांत जास्त तक्रारी कृषि खात्याबाबत होत्या. त्यामुळे प्रचंड कामे रखडली होती. पालकमंत्री छगन भुजबळ यांचे मंत्रालयात चांगले वजन होते. निधीची काही कमतरता नव्हती. परंतु अधिकारीच टिकत नव्हते. अर्थात जिल्ह्याचा विकास खुंटला होता. अशावेळी जिल्ह्यातील कृषि विभागाची धुरा कैलाश मोते यांनी घ्यावी अशी सुचना छगन भुजबळ यांनी केली. एवढेच नव्हे तर त्यांनी ताबडतोब बाळासाहेब थोराताना फोन करुन कैलाश मोते यांना जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी म्हणून नाशिकला पोस्टींग द्यावी असे सुचविले. बाळासाहेब थोरातांनाही अशाच अधिकाऱ्याची गरज होती. त्यांनी लगेचच श्री मोते यांच्या पोस्टींगचा आदेश काढला आणि कैलाश मोते नाशिकचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी म्हणून रुजू झाले.

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी म्हणून रुजू होताच श्री मोते यांनी कामाचा धडाका सुरु केला. त्यावेळी रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग

लागवड योजनेचे काम खूप मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आले होते. या योजनेला त्यांनी असा काही वेग दिला की काही महिन्यातच फळबाग लागवडीखालील क्षेत्र ४६८३ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करुन १३८४ लाखाचे अनुदान शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. इतक्या वेगाने काम करणारा अधिकारी आल्याने शेतकऱ्यांच्या तक्रारींचा ओघ कमी झाला. बाळासाहेब थोरातांना खूप बरे वाटले. त्यांनी कैलाश मोते यांना प्रोत्साहन द्यायला सुरुवात केली. निधीच्या बाबतीत पालकमंत्री छगन भुजबळ यांनी शब्द दिला होता त्याप्रमाणे निधीची कमतरता पडू दिली नाही. फळबागांसाठी कलमी रोपे तयार करण्यासाठी सात साखळी रोपवाटिका आणि ११ तालुका बीज गुणन केंद्रात विविध कलमांचे बीजोत्पादन कार्यक्रम राबवून आस्थापना खर्चासह नफ्यात आणण्याची किमया श्री मोते यांनी काही दिवसातच करुन दाखविली. तालुका बीज गुणन केंद्र मुसळगाव तर सिन्नर येथील हायटेक नर्सरी स्थापना, डाळींब पिकांच्या मातृवृक्षाची लागवड करुन कलमे उपलब्ध करुन दिली. त्यामुळे शेतकरी भलते खूश झाले. बीजगुणन केंद्रात बीज प्रक्रिया केंद्र स्थापन करुन जवळपास ४००० क्विंटल बीज निर्मिती करण्यात आली. या केंद्रावरील सर्व सुविधा विचारात घेऊन प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण सुरु केले. सहा महिन्याच्या आत प्रशिक्षण विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करुन त्यांच्यामार्फत वेगवेगळ्या जिल्ह्यात शेती शाळेचे आयोजन करुन प्रबोधन करण्यात आले. कृषि विभागातील नवीन तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा याचे प्रात्याक्षिकासह नियोजन करण्यात आले.

प्रत्येक गावासाठी सुपिकता निर्देशंक नकाशे तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले. त्यासाठी गावोगावी जाऊन मातीचे नमुने, पाण्याचे नमुने, काढून प्रयोग शाळेत नेऊन तपासणी करुन त्या आधारे गावातील जमिनीची सुपिकता तपासली जाऊ लागली. त्यानुसार खताचा वापर सुरु झाला. सुपिकता नकाशे तयार करुन गावागावात लावले जाऊ लागले. त्यामुळे शेतकऱ्यांना कळू लागले की आपल्या शेतीतील पिकांसाठी कोणते खत उपयुक्त आहे? कोणते पाणी द्यावे लागेल ही सर्व माहिती गावातल्या

गावात उपलब्ध करुन देण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंद पसरला. सुपिकता नकाशे गावागावात लावण्यासाठी एक १०० दिवसांची मोहिमच आखण्यात आली. एका दिवसात एका गावातील सुपिकता नकाशा तयार करुन लावण्यात येत होता. अशाप्रकारे १०० दिवसात नाशिक जिल्हयातील १३००० मातीचे नमुने तपासण्यात आले तर जवळपास २३६५ पाण्याचे नमुने तपासण्यात आले. तसेच १४० विशेष माती नमुने तपासण्यात आले. या कामाचा वेग इतका होता की नियोजनाच्या १३१ टक्के मातीचे नमुने तपासण्यात आले तर ८० टक्के विशेष माती नमुने तपासण्यात आले. पाण्याचे नमुने तर ४७४ टक्के तपासण्यात आले. या सुपिकता नकाशाची दखल राज्य पातळीवर तात्कालिन कृषि संचालक (विस्तार आणि प्रशिक्षण) यांनी घेतली. त्यांनी श्री कैलाश मोते यांच्या कार्याचे तोंड भरुन कौतुक केले आणि ही योजना राज्यभर राबविण्याचा निर्णय घेतला.

अशा प्रकारे कैलाश मोते यांनी अल्पावधीतच आपल्या कार्यशैलीची झलक अवघ्या राज्याला करुन दाखविली. अशा प्रकारे श्री कैलाश मोते यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी म्हणून राज्यभर आपला ठसा उमटविला.

प्रकरण सातवे

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धुळे

नाशिक मध्ये चार वर्षे सेवा झाल्यानंतर धुळे येथे त्याच पदावर म्हणजे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी या पदावर श्री कैलास मोते यांची बदली झाली. या ठिकाणी कार्यरत असताना त्यांनी शासनाच्या योजनांचा पुरेपूर लाभ शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे यासाठी प्रयत्न केले होते. शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करून योजनांचा लाभ मिळवून दिला. ठिबक सिंचनाच्या

योजनेमध्ये ५७७२ शेतकऱ्यांना ७२२७ हेक्टर क्षेत्रासाठी२१.३६ कोटी रुपये थेट आधार लिंक बँक खात्यात वाटप करण्यात आले. धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कांदा पिकाचे क्षेत्र वाढीसाठी व्यापक प्रसिद्धी देऊन कांदा चाळीसाठी मोहीम स्वरूपात अर्ज प्राप्त करून जिल्ह्यात १७ हजार ३८५ मेट्रिक टन एवढ्या प्रचंड मोठ्या प्रमाणावर साठवण क्षमता करण्यासाठी ७८१ कांदा चाळी तयार करण्यात आल्या. त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर कांदा लागवड करून कांदा साठवणूक केली. कांदा दरामध्ये बाजारामध्ये वारंवार चढ-उतार होत असतो हे लक्षात घेऊन कांदा चाळीची उभारणी करण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने कांदा विक्री करता येऊ लागला आणि चार पैसे जास्तीचे मिळू लागले. सर्वसामान्य जनतेला देखील बारमाही कांदा उपलब्ध होऊ लागला.

राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत सुपीकता निर्देशक नकाशे तयार करण्यासाठी आवश्यक मातीचे नमुने हजार ५८१९ एका दिवसामध्ये टार्गे ट पूर्ण केले. संपूर्ण जिल्ह्यात तातडीने माती तपासणी पूर्ण करून सर्व निर्दे शक नकाशे तयार केले. कृषी पणन समन्वय सभांचे आयोजन धुळे मार्केट कमिटी भाजीपाला पिकासाठी, सिंदखेडा येथे पपई, शिरपूर बाजार समितीत केळी, साक्रीसाठी डाळिंब या पिकांचे बाजार समितीतून लिलावाद्वारे विक्री होण्यासाठी प्रयत्न केले गेले. धुळे जिल्ह्यातील कडधान्याची लागवड आणि उत्पादन वाढवण्यासाठी १०० हेक्टरचे १० प्रकल्प, मूग पिकासाठी दोन प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी करून शेतकऱ्यांचे व्यक्तिगत रित्या मूल्यमापन करून १००टक्के राबविले. धुळे जिल्ह्यातील कडधान्याच्या उत्पादन वाढीस चालना मिळाली. जिल्ह्यातील केळी पिकावरील करपा रोग नियंत्रणासाठी ३५० हेक्टर क्षेत्रावर रोग निर्मूलन मोहीम राबवून शेतकरी प्रशिक्षण व पीक संरक्षण बाबी वेळीस पूर्ण करून घेतल्यामुळे करपा रोगामुळे होणारे शेतकऱ्यांचे नुकसान टळले. अर्थातच त्यामुळे केळीचे उत्पादन वाढण्यास चांगली मदत झाली. कैलास मोते असे कृषि अधिकारी आहेत की ते सर्व छोट्या-मोठ्या योजना प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत

असा त्यांचा कटाक्ष असतो. स्वतःला कितीही त्रास सहन करावा लागला तरी चालेल परंतु योजनेची अंमलबजावणी योग्य रीतीने झाली पाहिजे असे मत आहे.

धुळे जिल्ह्यात कार्यरत असताना अशा अनेक योजनांची त्यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी केली आहे. शासनाच्या गतिमान वैरण विकास योजनेअंतर्गत चार प्रकल्प राबवून त्यावर ४३.३० लाख रुपये खर्च करुन प्रकल्प यशस्वी करुन दाखविले आहेत. त्यामुळे दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर शेतकऱ्यांना मात करता आली. ज्या भागात भाताची लागवड मोठ्या प्रमाणावर होते त्या ठिकाणी एसआरआय तंत्रज्ञान व चारसूत्री भात लागवड पद्धतीचा अवलंब करून उत्पादकता वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. त्यामुळे शेतकऱ्यांना श्री मोते यांच्या बद्दल नेहमीच आपुलकी वाटत आली आहे. एवढेच नव्हे तर ते जेथे जातील तेथे शेतकऱ्यांच्या गळ्यातील ताईत बनत राहिले आहेत. त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीत प्रचंड मोठ्या प्रमाणावर काम झाले आहे. त्याचबरोबर कामाची गती ही वाढली

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानात प्रथमच नाविन्यपूर्ण प्रस्ताव पाठपुरावा करून प्राप्त करून घेतली आणि ती यशस्वी यशस्वीपणे राबविले. कडधान्य १९ प्लस योजनेत पुर्व विदर्भात आणि कोकणात भात पिकानंतर दुसरे पीकच घेतले जात नव्हते. या ठिकाणी दुबार पीक घेण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करून पेरणीसाठी ५५५० क्विंटल बियाणे उपलब्ध करून दिले. या भागात दुबार पीक कडधान्याचे घेऊन त्यात मोठ्या प्रमाणावर वाढ केली. अशा प्रकारे श्री मोते यांनी धुळे जिल्ह्यात कार्यरत असताना कृषी खात्याच्या सर्व योजनांची अंमलबजावणी अतिशय योग्य रितीने करून शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला. नंतर त्यांची बदली पुन्हा नाशिक येथे सहसंचालक कृषि विस्तार व प्रशिक्षण या पदावर झाली.

प्रकरण आठवे

विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक

नाशिक येथील विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाचा पदभार घेतल्यानंतर श्री कैलास मोते यांनी आपले लक्ष शासनाच्या मृद आरोग्य पत्रिका अभियानाकडे वळविले. या अभियानांतर्गत त्यांच्या विभागाला २ लाख ५१ हजार ४६८ इतके मातीचे नमुने तपासणीचे उद्दिष्ट दिले गेले होते.

त्यापैकी त्यांच्या मार्गदर्शनाखाली या विभागाने २ लाख ४६ हजार ७२३ इतके मातीचे नमुने तपासून ९ लाख ३१ हजार ४८६ गावात आरोग्य पत्रिका वाटप करून राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. श्री कैलास मोते हे लहानपणापासूनच हुशार विद्यार्थी होते. आपण मेरिटमध्ये उत्तीर्ण व्हावे असे त्यांना नेहमी वाटायचे. प्रत्येक वर्गात त्यांचा पहिल्या तीन क्रमांकामध्ये समावेश असायचा. ते स्वतः कष्ट करायचे व मेरिटमध्ये यायचे.ही सवय त्यांच्या आयुष्याचा भाग बनली होती. काम कोणतेही असो ते दर्जेदार आणि वाखाणण्याजोगे झाले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असायचा. कोणतेही काम मनापासून केले की ते स्वतःला आवडते आणि जे काम स्वतःला आवडेल असे केले की ते जगालाही आवडतेच.

शासनाच्या कृषि विभागाच्या योजनांचा प्रसार आणि प्रसिद्धीसाठी एम-किसान नावाचे ॲप तयार करण्यात आले होते. त्यामध्ये शेतकऱ्यांची नोंदणी करायची होती. श्री कैलास मोते यांनी येथे देखील ५ लाख २१ हजार ६२४ इतक्या विक्रमी शेतकऱ्यांची नोंदणी करून राज्यात उच्चांकी कामगिरी केली आहे. ज्या ठिकाणी आपण काम करतो ते काम चोख रीतीने बजावणे हा त्यांचा नेहमीच प्रयत्न असायचा. त्यांचे काम नेहमीच विक्रमी होत असे. नाशिक विभागात ३२९१ कांदा चाळीची उभारणी करून ५०,९३० मेट्रिक टन कांदा साठवणूक क्षमता निर्माण करून शेतकऱ्यांना १५.७६ कोटीचे अनुदानही त्यांनी मिळवून दिले.

नाशिक विभागात संरक्षित शेतीस चालना देण्यासाठी १२३ शेडनेटची उभारणी करून ४१ हेक्टर क्षेत्रावर संरक्षित लागवडीखाली भाजीपाला व फुलशेती लागवड करून कमी क्षेत्रात जास्त उत्पादन काढण्याचा एक नवा पॅटर्न तयार करण्यात आला. यासाठी ८.३८ कोटी रुपये अनुदान शेतकऱ्यांच्या आधार लिंक बँक खात्यात जमा करण्यात आले. सध्याच्या परिस्थितीत कृषी क्षेत्राला भेडसावणारी आणखी एक समस्या म्हणजे शेतमजुरांची टंचाई! यावर मात करून शेतीविषयक कामे यंत्राद्वारे करण्यासाठी शासनाने आणलेल्या कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत नाशिक जिल्ह्यात ६८९ ट्रॅक्टर आणि ३३७

रोटावेटरचे विक्रमी वाटप करण्यात आले. शासकीय अनुदानातून अनेक अवजारे शेतकऱ्यांना पुरविण्यात आली. त्याचप्रमाणे लोकसहभागातून ४०१५ वनराई बंधारे नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन महिन्यात बांधण्यात आले. या बंधाऱ्यांमुळे परिसरातील ६६२९ हेक्टर अधिकचे क्षेत्र सिंचनाखाली आल्याने रब्बी हंगामात हरभरा आणि मक्या सारखी पिके मोठ्या प्रमाणात घेतली गेली.

या नाशिक विभागात कीड रोगापासून पिकांचे संरक्षण व्हावे मराठी ९ लाख ८५ हजार ९४८ हेक्टर क्षेत्रावर सर्वेक्षण करून त्यात प्लॉटधारक, शेतकरी, ग्रामस्थ, पोलीसपाटील, व सरपंच यांच्या उपस्थित प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यात आला. त्यामुळे गावागावात जनजागृती होऊन पिकांचे संरक्षण होऊन उत्पादनात वाढ झाली. उत्पादन खर्चात देखील मोठ्या प्रमाणावर बचत होऊ लागली. नाशिक विभागात सूक्ष्म सिंचन योजनेला अधिक चालना देण्यासाठी कैलास मोते यांनी वैयक्तिक लक्ष देऊन अंमलबजावणी सुरू केली. सुमारे ५९०७ लाख रु. अनुदानातून ५१८४ लाख रकमेचे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात वाटप करून २१,४१६ हेक्टर क्षेत्रावर सूक्ष्म सिंचनाचा अवलंब करण्यास प्रवृत्त केले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यात प्रथमच रासायनिक खताचे वितरण ई – पास १४२० मशीनचा वापर करून २४००० मेट्रिक टन खताचे वितरण शेतकऱ्यांना करण्यात आले.

श्री कैलास मोते यांनी सुरू केलेला हा पॅटर्न पुढे राज्यभर राबविला गेला. तसेच नाशिक विभागात कृषी सहाय्यक या पदाची ज्येष्ठता सूची करताना विभागीय लेखापरीक्षा पास न करता देखील ज्येष्ठता सूचित नावे समाविष्ट झाल्याने मात्र कृषी सहाय्यक पदोन्नती झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर श्री मोते यांनी ७२ कृषी पर्यवेक्षकांना पदावनत करत ६४ कृषी सहाय्यकांना पदोन्नती देऊन वंचितांना न्याय मिळवून देण्याचे काम पार पाडले. कैलास मोते यांच्या निर्णयाच्या विरोधात काही पदावनत झालेले कृषी पर्यवेक्षक मॅट कोर्टात गेले. तेथेही विभागाचा निर्णय योग्य ठरवून संपूर्ण राज्याला दिशादर्शक असा न्याय निवाडा झाला.

शासनाच्या मागेल त्याला शेततळे या योजनेअंतर्गत ३२३१ शेततळी उभारून ६४६२ टीसीएम पाणीसाठा निर्माण केला गेला. त्यामुळे ६४६२ हेक्टर क्षेत्र संरक्षित सिंचनाखाली आणले. त्याचप्रमाणे या नाशिक विभागातील १७ रोपवाटिकांपैकी ९ रोपवाटिका आस्थापना खर्चासहित तर आठ रोपवाटिका आस्थापना खर्चा शिवाय नफ्यात आणून किमिया केली. ही किमया श्री कैलास मोते यांनी आपल्या कारकिर्दीत वारंवार करून दाखवली आहे. त्याचप्रमाणे नाशिक कृषि विभागात क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचे काम देखील श्री मोते यांनी अतिशय जाणीवपूर्वक केले आहे. कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढून कार्यक्षमते मध्ये देखील मोठी वाढ झाली असल्याचे दिसून आले आहे. शासनाच्या एनएमओडीपी अंतर्गत मोहरी या पिकाची जिल्ह्यात जवळपास ४९ हेक्टर क्षेत्रावर लागवड पूर्ण करून एक विक्रमच केला आहे. त्याचप्रमाणे गुण नियंत्रण विभागातर्फे १०० लाखाचे बोगस बियाणे जप्त करून पाच पोलीस केस करण्यात आल्या. त्यामुळे चांगल्या प्रतीचे बियाणे उपलब्ध होऊन शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ झाली. तसेच बाह्य लेखा परीक्षण ७३ पैकी ७३ परिच्छेद निकाली काढले व ८२५ उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले. अशा प्रकारे शासनाच्या योजनांचा अतिशय बारकाईने अभ्यास करून तळागाळातल्या शेतकऱ्यांपर्यंत योजना पोहोचविण्याचे काम श्री कैलास मोते यांनी नाशिक येथे विभागीय सहसंचालक असताना केले आहे. त्यामुळे यां ठिकाणीदेखील श्री मोते यांनी आपल्या कार्यशैलीची छाप सोडली आहे. श्री कैलाश मोते यांच्या शासकीय सेवेतील कारकिर्दीचा जास्तीत जास्त कार्यकाल नाशिक जिल्ह्यात गेला असल्याने एक कष्टाळू, प्रामाणिक आणि जबाबदार अधिकारी अशी त्यांची प्रतिमा बनली आहे.

प्रकरण नववे

संचालक, मृद संधारण,पुणे

नाशिक येथे विभागीय सहसंचालक कृषी या पदावर अतिशय चांगल्या प्रकारे काम केल्यानंतर श्री कैलास मोते यांची पदोन्नतीने संचालक मृद संधारण या पदावर पुणे येथे बदली झाली. या ठिकाणी कार्यरत असताना संपूर्ण महाराष्ट्र हे त्यांच्यासाठी कार्यक्षेत्र होते. त्यांच्या कर्तृत्वाला आणखी एक वाव मिळाला. या ठिकाणी रुजू होताच त्यांनी मोठ्या जोमाने आपल्या कामाला सुरुवात केली. मागेल त्याला शेततळे या शासनाच्या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी त्यांनी आपल्या कार्यकाळात केली. इसवी सन २०१७-

१८ या वर्षात त्यांनी २१८ कोटी रुपये खर्च करून ४६३६४ शेततळ्यांचे काम पूर्ण केले. तसेच या शेततळ्यांचे मूल्यमापन रामभाऊ म्हाळगी या संस्थेमार्फत करून घेतल्याने रब्बीच्या पिकात वाढ झाल्याचे दिसून आले. तसेच जनावरांसाठीच्या चारा पिकांच्या उत्पादनातही वाढ झाल्याचे दिसून आले. इतक्या मोठ्या प्रमाणावर शेततळ्याची निर्मिती झाल्यामुळे संरक्षित सिंचनाची सुविधा मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. साहजिकच रब्बी पिकांचे उत्पादन देखील वाढले. राज्य शासनाचा अतिशय महत्त्वकांक्षी असलेला प्रकल्प म्हणजे जलयुक्त शिवार अभियान होय! या प्रकल्पाची अतिशय प्रभावीपणे अंमलबजावणी झाल्यामुळे इसवी सन २०१५-१६ या वर्षात ६ ०९० तर २०१६-१७ या वर्षात ४९०६ गावे तर २०१७ -१८ या वर्षात १४० अशा एकूण १११३६ गावात जलयुक्त शिवार अभियान प्रभावीपणे राबविल्याने ही गावे जलयुक्त होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले.

जलयुक्त शिवार अभियानात आयआयटी पवई व इतर शासकीय संस्थांच्या मदतीने गावनिहाय पाण्याचे ताळेबंद संदर्भात मार्गदर्शक सूचना निश्चित करून राज्याला दिशा दिली. या ताळेबंदामुळे यामुळे राज्यातील गावागावांमध्ये आवश्यक त्या प्रमाणात जनावरांसाठी व माणसांसाठी पिण्यासाठी पाणी तसेच पिकांसाठी पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्याने शेतीच्या उत्पन्नात वाढ झाली.

श्री कैलास मोते हे ज्या ज्या ठिकाणी कृषी अधिकारी म्हणून कार्यरत राहिले त्या त्या सर्व ठिकाणी त्यांनी उपलब्ध स्त्रोतांचा उपयोग करून घेऊन योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. त्यानुसार श्री कैलास मोते यांनी राज्यात महा वॉटर शेड हे नवीन पोर्टल अपडेट करून मृदा संधारणासाठी निगडित सर्व शासन निर्णय व परिपत्रके अपलोड केल्याने जलसंधारण संदर्भात काम करणाऱ्या जल प्रेमींना आवश्यक सूचना मिळाल्याने या अभियानातील लोकसहभाग मोठ्या प्रमाणावर वाढला. महात्मा फुले जलभूमी संधारण अभियानात ९८२ जलसंधारणाच्या विविध कामांची दुरुस्ती व १६८७ जलसंधारण प्रकल्पातील

५३.५३ लाख घनमीटर गाळ काढण्यात आल्याने प्रकल्पातील पाणी साठवण क्षमता वाढली. परिणामी शेती उत्पादनात देखील मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असल्याचे दिसून आले आहे. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत मृद व जलसंधारण विभाग, लघुपाटबंधारे विभाग, स्थानिक स्तर विभाग, वन विभाग व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या समन्वयाने राज्याचा सिंचन आराखडा तयार करून सर्व यंत्रणांना तो उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामध्ये श्री कैलास मोते यांचा मृद संधारण विभागाचे संचालक म्हणून मोठा वाटा आहे. या सिंचन आराखड्यानुसार कामाचे नियोजन करून राज्यातील ५० लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठीचे नियोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे आदर्श गाव संकल्प व प्रकल्प योजनेत निवडलेल्या ९१ पैकी २५ गावे पूर्ण केली व ती गावे स्वयंपूर्ण केली. त्याचप्रमाणे जीआयएस सेल मार्फत पाणलोट उपचार नकाशा पुरवून गावे स्वयंपूर्ण केली. तसेच राज्यातील मागेल त्याला शेततळे या योजनेअंतर्गत १४२६०७ शेततळी पूर्ण करून ९३% फोटो पोर्टल वर अपलोड करण्यात त्यांचा मोठा सहभाग आहे. राज्यातील ५४०६ गावे जल परीपूर्ण करण्यासाठी तांत्रिक सहाय्य करण्याची जबाबदारी श्री कैलास मोते यांनी संचालक म्हणून अतिशय प्रामाणिकपणे पार पाडली.

याच दरम्यान श्री कैलास मोते यांच्याकडे महासंचालक कृषी व संशोधन शिक्षण परिषद या पदाचा अतिरिक्त भार देखील सोपविण्यात आला होता. त्यामुळे त्यांनी लोकसेवा हक्क अधिनियम व सेवा हमी कायद्यासाठी यादी चारही विद्यापीठात तयार नसल्याने स्वतः पाठपुरावा करून सेवा हमी कायद्यांतर्गत २६ सेवा निश्चित करून प्रस्ताव शासनाकडे पाठवला. त्यामुळे विद्यार्थी, शेतकरी, उत्पादन कंपन्यांना आवश्यक सेवा वेळेवर मिळायला मदत झाली, महाडीबीटी अंतर्गत राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेसाठी असलेली तरतूद अल्पावधीत खर्च करून विद्यार्थ्यांना लाभ मिळवून दिला. सीसीटी या उपचाराचे शासनाकडील मंजूर मॉडेल ३,४,८ हे सद्यस्थितीत उपयुक्त ठरत नसल्याने ते रद्द केले. त्याचप्रमाणे नानाजी देशमुख कृषी संजीवनी

प्रकल्प पोखरा योजनेत मृदसंधारण कामासाठी राज्यस्तरावर समन्वयकाची जबाबदारी श्री मोते यांनी घेतल्याने वैयक्तिक लाभार्थींच्या संख्येत निव्वळ वाढ ४७७०९ इतकी करून १४७.५० कोटी रु. अनुदान लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. श्री मोते यांचे प्रशासकीय कौशल्य अतिशय वाखाणण्याजोगे आहे. त्यांनी प्रत्येक ठिकाणी अधिकारी म्हणून कार्यरत असताना उपलब्ध स्त्रोताचा आणि तंत्रज्ञानाचा चपखल वापर करून प्रशासन गतिमान करून जनतेला त्याचा लाभ मिळवून दिल्याचा अनेकदा प्रयोग केला आहे. राज्यातील वेगवेगळ्या खात्यांना उपयुक्त वेब बेस जियो पोर्टल करून घेतले त्यामुळे मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्यामुळे कामाचे डुप्लिकेटशन टाळून आवश्यकतेप्रमाणे जलसंधारणाच्या गावनिहाय झालेल्या कामाची माहिती ग्रामस्थ आणि विस्तार कार्यकर्ते यांना मिळाल्याने व पाण्याचा ताळेबंद योग्य रीतीने केल्यामुळे पीक पद्धतीत आमूलाग्र बदल घडून आल्याचे दिसून येते. त्याबरोबर शेतीच्या उत्पादनातील वाढ झाल्याचे दिसून येते.

प्रकरण दहावे

संचालक कृषी फलोत्पादन

श्री कैलास मोते यांची २०२० मध्ये संचालक कृषी फलोत्पादन पुणे या ठिकाणी बदली झाली. ते त्यांच्या प्रशासकीय सेवेचे शेवटचे आणि महत्त्वाचे पद होते. त्यांच्या स्वभावानुसार त्यांनी पदभार स्वीकारताच जोमाने कामाला सुरुवात केली. पहिल्याच वर्षी त्यांनी सतत पाठपुरावा करून महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीस प्रोत्साहित करून

राज्यात जवळपास ३४२२५ हेक्टर इतक्या मोठ्या प्रमाणावर फळबाग लागवड केली. फळबाग लागवडीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढले पाहिजे हा त्यांचा ध्यास बनला होता. त्यासाठी त्यांनी उपयुक्त आणि गरजेच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले. त्यानुसार १४६ शासकीय रोपवाटिका नफ्यात आणण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना अंमलात आणल्या. जातिवंत व गुणवत्तापूर्ण रोपे तयार करून योजनेत त्या रोपांचे वाटप करून शासनाला त्याद्वारे २२ कोटीचा उच्चांकी महसूल मिळवून दिला. त्याचप्रमाणे तयार झालेल्या गुणवत्तापूर्ण रोपांमुळे राज्यातील ३४२२५ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड झाली आणि त्यांचा राष्ट्रीय पातळीवर गौरव देखील झाला. त्यांच्या पिकावरील सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प अंतर्गत नऊ फळे व भाजीपाला पिकांचे सर्वेक्षण करून त्यात प्रथमच शेतीशाळा घटकाचा समावेश करून प्रकल्प राबविल्याने कीड व रोग ओळखणे, नुकसान पातळीच्या वर प्रादुर्भाव झालेल्या ठिकाणी वेळीच काळजी घेतल्याने खर्चात बचत झाली आणि उत्पन्नही वाढले.

श्री कैलास मोते यांना आपल्या कार्यक्षेत्रात नवनवीन प्रयोग करायला आणि संधीचे सोने करून द्यायला खूप आवडते. त्यांनी परदेशातील लागवड साहित्य आयात करण्यासाठी २४ आयातदारांना वेळीच ग्रोव्हर प्रमाणपत्र देऊन नवीन पीक व वाण आयातीसाठी प्रोत्साहन दिले. त्याबरोबर वाण बदलाची कामे केली. त्यामुळे फळबागांच्या उत्पादनात भरघोस वाढ झाली. राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत राज्यातील प्रत्येक तालुक्यात भाजीपाला पीकाचे क्षेत्र वाढावे या उद्देशाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना नव्याने मंजूर करून २७० रोपवाटिका संपूर्ण राज्यभरात निर्माण करून भाजीपाल्याची रोपे तयार करून ती वाटप केली. त्यासंदर्भातील १६४ कामे प्रगतीपथावर असून त्यामुळे राज्यातील भाजीपाला पिकाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढले आहे.

आपल्या राज्यात मोठ्या प्रमाणावर द्राक्ष लागवड केली जाते. द्राक्षाला नगदी पिक असे म्हटले जाते. परदेशात द्राक्षाला चांगली मागणी असते. द्राक्ष निर्यातीसाठी आवश्यक शेतकऱ्यांची ग्रेपनेट वरील नोंदणी

४५१५२ पर्यंत वाढवून विक्रमच केला. द्राक्ष निर्यातीच्या बाबतीत देशात महाराष्ट्राचा वाटा मोठा आहे. रशिया आणि इतर देशांमध्ये द्राक्ष आणि आंबा निर्यातीसाठी आवश्यक असलेले फळ माशी मुक्त क्षेत्र घोषित करण्यासाठी तांत्रिक समितीचे गठन करून विविध योजनेत फेरोमन ट्रॅप चे ट्रेसीॲबिलिटी वाटप केले. महाराष्ट्र राज्याची विक्रमी नोंदणी झाली आहे. राज्यातून सुमारे ७३५७३ शेतकऱ्यांची नोंदणी करून देशातील एकूण नोंदणीच्या ९२ टक्के वाटा महाराष्ट्राने उचलला आहे याचे श्रेय कैलास मोते यांनाच जाते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

भौगोलिक मानांकन प्राप्त अशा एकूण २७ पिकांचे एआय टॅग खाली देशात व परदेशात माल विकता यावा म्हणून अधिकृत वापर करता नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून ८७९२ शेतकऱ्यांना नोंदणी करून दिली आहे. देशातील अशा नोंदणी पैकी ८० टक्के नोंदणी महाराष्ट्राची आहे. ही अभिमानाची गोष्ट आहे. काम करायचे तर सर्वोच्च पातळीवर जाईल अशा पद्धतीने करायचे अशी श्री मोते यांच्या कामाची पद्धत आहे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक छोट्या-मोठ्या कामाची देखील देशपातळीवर दखल घेतली गेली आहे. त्याचप्रमाणे अपेडाकडे वारंवार पाठपुरावा करून सन २०२२ -२३ या वर्षात बोरे, अंजीर, कवठे, जांभूळ, पेरू, सीताफळ, ड्रॅगन फ्रुट, चिकू, स्ट्रॉबेरी या पिकांच्या नोंदणीकरिता आदर फ्रूट नेट वेगळी प्रणाली विकसित करून ट्रायसॅबिलीटी वर नोंदणी पहिल्यांदाच यांच्या प्रयत्नामुळे सुरू झाली.

सन २०२३ २४ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत जिल्ह्याचा सातत्याने पाठपुरावा करून ४००९६ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड पूर्ण केली.त्याबरोबर रोजगार निर्मितीही झाल्याने राज्य शासनामार्फत माननीय राज्यपाल महोदय, राज्याचे मुख्यमंत्री, राज्याचे फलोत्पादन मंत्री यांच्या हस्ते कृषी विभागाचा गौरव करून कार्यक्रमात प्रशस्तीपत्रक कृषी विभागास देण्यात आले.

राज्यात पहिल्यांदाच सर्व खाजगी रोपवाटीकांची तपासणी करून महाराष्ट्र रोपमळे अधिनियम १९६९ अंतर्गत विविध कलमांचे उल्लंघन

केल्याने १०७ खाजगी रोपवाटिका यांचे परवाने रद्द करण्यात आले. केंद्र शासनाच्या धोरणानुसार १९५ रोपवाटिका एनएचबीची अधिस्वीकृती व ३२८ रोपवाटिका नॅशनल नर्सरी पोर्टलवर नोंदणी करून राज्यात उज्वल कामगिरी करून दाखवली. राज्यात प्रथमच केळी पिकांची नोंदणी अपेडाच्या ट्रेसीअॅबिलिटी नेटवर करून २.७३ लाख मेट्रिक टन केळीची निर्यात करून राज्याला परकीय चलन मिळवून दिले. या रीतीने कृषी क्षेत्रात सर्वच बाबतीत राज्याला आघाडीवर नेण्यासाठी ज्या ज्या अधिकाऱ्यांनी आपले योगदान दिले, त्यात कैलाश मोते यांचे नाव शीर्षस्थानी घ्यावे लागेल. महाराष्ट्र राज्य हे एसएनए सिस्टीमची अंमलबजावणी डीबीआय द्वारे अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मिळवून देण्यातही त्यांनी मोठे यश मिळवले. त्याचप्रमाणे सूक्ष्म सिंचन योजनेत देशात केंद्र शासनाच्या नवीन नियमावलीनुसार चार टप्प्यात निधी मिळवून देण्यात पहिला मान महाराष्ट्र राज्याचा आहे. या सूक्ष्म सिंचन योजनेत अनुसूचित जाती व जमातीसाठी येणाऱ्या निधीचा विनियोग व्हावा म्हणून विशेष मोहीम राबवून ६५०० नवीन अर्जदार वाढवले. आलेला निधी जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा अतिशय प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला आहे.

श्री कैलास मोते यांनी आपल्या संचालक पदाच्या कार्यकाळात सन २०२२ मध्ये राज्यातील निर्यातीला चालना मिळावी म्हणून सर्व जिल्ह्यात निर्यात सुविधा कक्ष स्थापन केले. साहजिकच देशातील द्राक्षे, आंबा, केळी डाळिंब, कांदा या पिकांची निर्यात करणारे महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य म्हणून एमआयडीएच अंतर्गत क्षेत्र विस्ताराच्या बाबतीत ड्रॅगन फ्रुट हे पीक ९३ हेक्टर क्षेत्रावर तर स्ट्रॉबेरी हे पीक २१ हेक्टर क्षेत्रावर प्रथमच लागवड करून यशस्वी करून दाखवले. एमआयडीएच अंतर्गत उत्पादकता व जास्त वयाचे असलेल्या पिकात जुन्या फळबागांचे पुनर्जीवन कार्यक्रम आंबा, संत्रा, मोसंबी या पिकांच्या ७२३ हेक्टर क्षेत्रावर पुनर्जीवनाचा कार्यक्रम राबवून उत्पादकता वाढीसाठी प्रयत्न केले. याच कार्यक्रमांतर्गत ४९७ सामूहिक शेततळी मराठवाडा व विदर्भात प्रथम प्राधान्याने राबून १४९७

हेक्टर क्षेत्रावरील दुष्काळ सदृश्य भागातील फळबागा वाचवण्यातही त्यांची महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. तसेच ४८८४ ट्रॅक्टर १०३७ पावर टिलर ४४२ पीक संरक्षण उपकरणे वाटप करून ५४५४ लाखाचे अर्थसहाय्य डीबीआय प्रणालीतून शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले. अशा प्रकारे संचालक कृषी फलोत्पादन श्री कैलास मोते यांनी आपल्या प्रशासकीय सेवेतील क्षणाक्षणाचा सदुपयोग करून शासनाच्या कृषी योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून त्यांना त्याचा लाभ मिळवून दिला आहे. शेतकऱ्यांचा फायदा झाला पर्यायाने देशाचे कृषी उत्पन्न वाढले. श्री मोते यांनी कर्तव्यात कधी तसूभरही कसूर न करणारा हा कर्तव्यदक्ष अधिकारी आपली दीर्घ सेवा देऊन सेवानिवृत्त झाला.

श्री कैलाश मोते यांनी राज्याच्या कृषि विभागात वेगवेगळ्या पदांवर कार्य केले आहे. ज्या ज्या पदावर त्यांनी कार्य केले आहे त्या त्या ठिकाणी त्यांनी आपल्या कौशल्यपूर्ण कार्यशैलीचा ठसा उमटविला आहे. त्यामुळे शासनाचे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. अनेकदा परदेशात जाण्याची संधी उपलब्ध झाली आहे. एकंदरीत आपल्या प्रशासकीय सेवेत मनाचे समाधान होईल अशा प्रकारचे कार्य केले आहे.

...तयाचा वेलू गेला गगनावरी

माणूस आपल्या आयुष्यात यशस्वी झाला की नाही हे ठरवण्यासाठी काही ठोकताळे ठरवले आहेत, त्याचे काही मापदंड ठरवले गेले आहेत. त्यानुसार माणसाच्या आयुष्याचे सर्वसाधारण मुल्यमापन केले जाते. त्यापैकी ढोबळमानाने मानला जाणारा मापदंड म्हणजे एकाद्या व्यक्तिची पुढची पिढी काय करते ? ती योग्य मार्गावर आहे की नाही यावरुन ती व्यक्ति आयुष्यात यशस्वी झाली की नाही हे ठरविले जाते. त्याप्रमाणे श्री कैलाश मोते यांनी आपल्या आयुषयात तीन संसार यशस्वी केले असल्याचे दिसून येते. पहिला संसार हा त्यांचा स्वत:चा ! त्यांचा दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. त्यांची तिन्ही मुले उच्चविद्या विभूषित असून पहिली मुलगी सौ. संजना हिने एम.टेक. केले असून तिचा विवाह झाला आहे. तिचे पती श्री कुणाल पटले हे कॉँप्युटरमध्ये बी.टेक,एमबीए आहेत. दुसरी मुलगी डॉक़्टर असून तिने बीडीएस केले आहे. ती देखील विवाहीत असून तिचे पती डॉ. पुष्कर मोहन पाटील हे देखील डॉक्टरच आहेत. श्री मोते यांचा एकुलता एक मुलगा प्रद्युम्न हा देखील उच्चशिक्षित असून त्यानेही एमबीए केले असून तो त्याचे स्वत:चे स्टार्टअप आहे. एकंदरीत त्यांची तिन्ही मुले उच्चशिक्षित, सुसंस्कृत आणि आपल्या आयुष्याच्या मार्गावर व्यवस्थित मार्गक्रमण करीत आहेत. श्री मोते यांनी स्वत:च्या संसाराबरोबरच समाजाचाही संसार नेटाने केला आहे. आपल्या संपुर्ण सेवा काळात जेथे जेथे त्यांना सरकारी नोकरीत सेवा करण्याची

संधी मिळाली. त्या त्या ठिकाणी त्यांनी दलित, वंचित आदिवासी, भटका समाज या घटकातील लोकांना प्राधान्याने शासकीय योजनांची मदत देऊन अनेकांच्या संसाराला हातभार लावला आहे. त्याप्रमाणे त्यांनी प्रशासनात राहून सरकारचा संसार उत्तम रितीने पार पाडला आहे. सरकारने अधिकारी म्हणून त्यांच्यावर ज्या जबाबदाऱ्या दिल्या त्या त्यांनी अतिशय जबाबदारीने पार पाडल्या. म्हणूनच सरकारचाही संसार केला. परंतु आयुष्याची जोडीदार सौ. सारिका यांचे आकस्मिक जग सोडून जाणे त्यांच्या जीवनात पोकळी निर्माण करणारे आहे. पुढील आयुष्य सुखाचे जावे या शुभेच्छा !

जयहिंद!